**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – २५**

**सभावृत्तांत**

दिनांक – २०.०१.२०१४ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे जानेवारी २०१४ ची मा.महापालिका सभा शनिवार दि.२०.०१.२०१४ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

1. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
2. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
3. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
4. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
5. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
6. मा.भालेकर अरुणा दिलीप
7. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
8. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
9. मा.सायकर अजय शंकरराव
10. मा.जाधव साधना रामदास
11. मा.जाधव राहुल गुलाब
12. मा.आल्हाट मंदा उत्तम
13. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
14. मा.काळजे नितीन प्रताप
15. मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर
16. मा.जगदीश शेट्टी
17. मा.बाबर शारदा प्रकाश
18. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
19. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
20. मा.उल्हास शेट्टी
21. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
22. मा.पवार संगीता शाम
23. मा.तानाजी विठ्ठल खाडे
24. मा.बो-हाडे शुभांगी संजय
25. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर
26. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
27. मा.भारती फरांदे

28. मा.आर.एस.कुमार
29. मा.जावेद रमजान शेख
30. मा.चारुशीला प्रभाकर कुटे
31. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
32. मा.पांढरकर निलेश शंकरराव
33. मा.नंदा विकास ताकवणे
34. मा.तरस बाळासाहेब जयवंत
35. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
36. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
37. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
38. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
39. मा.लोंढे गणेश नारायण
40. मा.शमीम पठाण (पठाणबाई)
41. मा.†›।.संदीप गुलाब चिंचवडे
42. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
43. मा.अपर्णा निलेश डोके
44. मा.अनंत सुभाष को-हाळे
45. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
46. मा.जयश्री वसंत गावडे
47. मा.पवार मनीषा काळूराम
48. मा.प्रसाद शेट्टी
49. मा.अविनाश (दादा) टेकावडे
50. मा.काळभोर वैशाली जालिंदर
51. मा.सौ.साळुंके सविता सुरेश
52. मा.शेख अस्लम शौकत
53. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
54. मा.वाबळे संजय मल्हारराव
55. मा.मडिगेरी वर्षा विलास
56. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
57. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडूरंग
58. मा.सुपे आशा रविंद्र
59. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
60. मा.अजित दामोदर गव्हाणे
61. मा.गोफणे अनुराधा देविदास
62. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
63. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
64. मा.महेशदादा किसन लांडगे

65.मा.श्रध्दा बाजीराव लांडे
66.मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
67.मा.लोंढे शुभांगी संतोष
68.मा.विश्वनाथ विठोबा लांडे
69.मा.ननवरे जितेंद्र बाबा
70.मा.सावळे सिमा रविंद्र
71.मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
72.मा.भोसले राहूल हनुमंतराव
73.मा.पालांडे सुजाता सुनिल
74.मा.बहल योगेश मंगलसेन
75.मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
76.मा.कदम सदगुरु महादेव
77.मा.गिता सुशिल मंचरकर
78.मा.कैलास महादेव कदम
79.मा.छाया जगन्नाथ साबळे
80.मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास
81.मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव
82.मा.वाघेरे सुनिता राजेश
83.मा.आसवाणी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम
84.मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
85.मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
86.मा.काळे विमल रमेश
87.मा.पाडाळे निता विलास
88.मा.विनोद जयवंत नढे
89.मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
90.मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
91.मा.विमलताई सुरेश जगताप
92.मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
93.मा.बारणे निलेश हिरामण
94.मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
95.मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे
96.मा.बारणे माया संतोष
97. मा.ओव्हाळ शेखर अशोक
98.मा.यमुनाताई रमणनाना पवार
99.मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
100.मा.कलाटे स्वाती मयुर
101.मा.नांदगुडे विलास एकनाथ

**102.**मा.चौंधे आरती सुरेश
**103.**मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
**104.**मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
**105.**मा.बोकड रामदास गेणभाऊ
**106.**मा.जवळकर वैशाली राहुल
**107.**मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
**108.**मा.जगताप राजेंद्र गणपत
**109.**मा.शितोळे शैलजा बाबुराव
**110.**मा.जगताप नवनाथ दत्तु
**111.**मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
**112.**मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
**113.**मा.जम सोनाली पोपट
**114.**मा.प्रशांत शितोळे
**115.**मा.काटे रोहितअप्पा सुदाम
**116.**मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
**117.**मा.शेंडगे आशा सुखदेव
**118.**मा.मोटे किरण बाळासाहेब
**119.**मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
**120.**मा.संजय केशवराव काटे
**121.**मा.गावडे हनुमंत बाळासाहेब
**122.**मा.बो-हाडे अरुण तुकाराम
**123.**मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.तानाजी शिंदे-अति.आयुक्त, मा.झुरे-सह आयुक्त, मा.खांडकेकर, मा.गायकवाड, मा.गावडे, मा.माने, मा.कुलकर्णी, मा.टेकाळे, मा.दुरगुडे - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.चव्हाण - सहशहर अभियंता,मा.भोसले-मुख्यलेखापाल,मा.डॉ.रॉय-प्र.आरोग्य वैद्य.अधिकारी,मा.डॉ.मनोज देशमुख-वैद्यकिय अधिक्षक,मा.भदाणे-उपसंचालक (नगररचना), मा.निकम, मा.सवणे, मा.काची, मा.चव्हाण,मा.शरद जाधव, मा.चिंचवडे, मा.काची, मा.साळवी,मा.पठाण, मा.लडकत,मा.कुलकर्णी, मा.पिरजादे, मा.बरशेट्टी, मा.भोसले - कार्य.अभियंता, मा.उबाळे-प्रशा.अधिकारी(शिक्षणमंडळ), मा.कांबळे-प्र.शिक्षणाधिकारी(माध्यमिक),मा.शिंपी-नगररचनाकार हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

-----------

(१) मुंबई-पुणे महामार्गावर नाशिक फाटा चौकात बांधण्यात आलेल्या दुमजली उड्डाणपूलास जे.आर.डी.टाटा असे नामकरण करण्याबाबतचा मा.आयुक्त यांचे प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देणेबाबत सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल - ९०                    प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(२) के एस बी चौकात उड्डाणपूल बांधणेच्या कामाबाबत मा.आयुक्त यांचे प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देणेबाबत सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल - ९०                    प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(३) भक्ती शक्ती चौक ते मुक्ताई चौक ४५ मी.रस्त्यावर निसर्ग दर्शन सोसायटीजवळ रेल्वे लाईनवर (आरओबी) उड्डाणपूल बांधणेच्या कामाबाबत मा.आयुक्त यांचे प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देणेबाबत सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता –

अनुकूल - ९०                    प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(४) दापोडी ते निगडी, सांगवी ते किवळे, नाशिक फाटा ते वाकड व काळेवाडी फाटा ते देहू आळंदी रस्त्यावर बीआरटीएस बस सेवा सुरु करणेसाठी स्थापत्यविषयक व इतर अनुषंगिक कामे करणेस मा.आयुक्त यांचे प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देणेबाबत सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल - ९०                    प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(५) सांगवी फाटा येथे ग्रेड सेपरेटर व फ्लाय ओव्हर बांधणेच्या कामास मा.आयुक्त यांचे प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देणेबाबत सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल - ९०                    प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.अपर्णा डोके** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, उपस्थित सभागृहाला विनंती करतो, बंगाली व हिंदी चित्रपटसृष्टीतील ख्यातनाम अभिनेत्री सुचित्रा सेन, सामाजिक कार्यकर्ते जगन्नाथ दगडू साठे (दिशा फाऊंडेशनचे कार्याध्यक्ष), शरद वामन बगाडे, सहा.उद्यान अधिक्षक यांचे वडील वामन अर्जून बगाडे, ज्ञानोबा तुकाराम गवारे, संभाजी मोहिते यांना श्रध्दांजली अर्पण करावी अशी विनंती करते.

**मा.सुजाता पलांडे -** मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** - सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

---------------

मा.महापालिका सभा क्र.२३ दि.२०.११.२०१३ चा. सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**प्रश्नोत्तरे**

(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ४४ अन्वये)

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, प्रश्नोत्तरांचा तास सुरु करण्यात यावा.

**मा.महापौर** - तीन जणांचे (सदस्यांचे) प्रश्नांना एक तास देण्यात येत आहे.

**मा.सिमा सावळे** - मा.महापौर साहेब मला मान्य आहे की, तुमची शिस्त मोडते. मा.महापौर साहेब बाळासाहेब ठाकरे वारले तेंव्हा या सभागृहात त्यांचे तैलचित्र लावण्याचे मान्य केले होते. जवळपास एवढे महिने झाले असून अजून आपण तैलचित्र लावले नाही.

**मा.महापौर** - तैलचित्र वेगळे आहे आणि नावाचे वेगळे आहे.

**मा.सिमा सावळे** - मा.महापौर साहेब, तुम्ही या सभागृहात मान्य केले होते का नव्हते. मग अजून का लावले नाही.

**मा.महापौर** - आज आयुक्त नाही ते आल्यावर बोलू.

**मा.प्रशांत शितोळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मा.महापालिका सभेमध्ये काही प्रश्न विचारले होते. पण मला या प्रश्नांबाबतीत स्वतःला एक शंका आहे. मला महापालिकेत आल्यानंतर १५ मिनिटांपूर्वी उत्तरे प्राप्त झाली आहेत. आपल्याकडे राजा बोले दल हाले. मला या सगळया प्रश्नांची उत्तरे आयुक्तांकडून मिळणे अपेक्षित होते. त्याबाबत संबंधित विभागाने खुलासा केला आहे. त्यामुळे आज आयुक्त नसल्यामुळे ज्यावेळी मा.आयुक्त साहेब असतील त्यावेळी तुम्ही प्रश्न विचारायची संधी दयावी अशी या निमित्ताने विनंती करतो आहे. ज्यादृष्टीने प्रश्न आहे, माहितीच्या बाबतीत मांडलेली उत्तरे यात मला फक्त आकडेवारी दिसत आहे ती योग्य आहे की नाही. ती कशा पध्दतीने योग्य आहे याबाबत मी अजूनही संभ्रमात आहे. आयुक्तांच्या

मार्गदर्शनाखाली कामकाज होते. ते नुसते सांगतात, कामे होतात. स्थापत्य विभागाचा प्रत्यक्ष खर्च पहा. २००८ पासून २०१३-२०१४ पर्यंत खर्चाबाबत डिटेल्स् दिलेले आहेत. अंदाजपत्रकीय तरतूद किती, जुन्या कामांची किती, नवीन कामांची किती व एकूण किती. २०१२-२०१३ मध्ये रु.४२९ कोटी अंदाजपत्रकीय रक्कम होती. उदा. म्हणून हे सांगतोय. सदस्यांनी यात गांभिर्याने लक्ष द्यावे. सन २०१२-१३ आधी निविदा झाल्या त्यावर २४३ कोटी खर्च केला होता. जेव्हा नवीन लोक निवडून आले, तेव्हा २०१२-१३ मध्ये खर्च फक्त ८३ कोटी होता. यानंतर २०१३-१४ चे अंदाजपत्रक आले. डिसेंबर २०१३ अखेर संपूर्ण अंदाजपत्रकीय तरतूद रु.४८२ कोटी होती. जुन्या कामावरील खर्च रु.१०८ कोटी व नवीन कामावर खर्च १ कोटी रुपये आहे हे बघा. आपण उगाच कामाचा गवगवा करतो. त्यामुळे आपण प्रत्यक्ष लोकांवर, नागरीकांना ज्या कामाचा उपयोग होत असतो त्यावर किती खर्च केलात याचे उदाहरणासहित सांगितले. किती दिवस अगोदर ही माहिती मिळाली पाहिजे. काहीच लक्षात आले नाही. अजून नीट आकडेवारी बघितली नाही. उत्तर कधी देता येतील. नेमके आयुक्त नाही. त्यामुळे प्रत्यक्ष आयुक्त आल्यावर ते असताना पुन्हा मला चर्चेला वेळ दयावा अशी विनंती आहे.

**मा.महापौर** – आत्ता या प्रश्नांना उत्तरे द्यावी लागतील. ते शेवटी ठेवता येणार नाहीत.

**मा.प्रशांत शितोळे** - मा.महापौर साहेब, आत्ता दहा मिनिटांपूर्वी मला उत्तरे देण्यात आली आहेत.

**मा.महापौर** – याबाबत मा.नगरसचिव खुलासा करतील.

**मा.नगरसचिव** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,महापालिका सभा कामकाज नियमावलीच्या नियम ९९ नुसार, जर प्रश्नाची सूचना देणारा महानगरपालिका सदस्य पीठासीन प्राधिका-याने नाव पुकारले असता हजर नसेल तर त्याने रीतसर लेखी प्राधिकार दिलेल्या अन्य कोणत्याही महानगरपालिका सदस्यास तो प्रश्न विचारता येईल. मात्र असे प्राधिकारपत्र प्रश्न विचारण्यापूर्वी महानगरपालिका नगरसचिवाच्या स्वाधीन करण्यात आले असले पाहिजे. जर सूचना देणा-या महानगरपालिका सदस्याने प्रश्न विचारला नाही किंवा त्याने लेखी प्राधिकार दिलेल्या अन्य महानगरपालिका सदस्यानेही तो विचारला नाही किंवा जर प्रश्नाची सूचना देणारा महानगरपालिका सदस्य पीठासीन प्राधिका-याने प्रश्न विचारण्यास आवाहन केले त्यावेळी गैरहजर असेल तर तो प्रश्न वगळला असल्याचे समजले जाईल अशी तरतूद आहे.

**मा.प्रशांत शितोळे** - मा.महापौर साहेब, मा.नगरसचिव यांनी सांगावे की, दिलेल्या प्रश्नांची उत्तरे किती दिवस अगोदर दिली पाहिजेत. किती दिवस अगोदर मिळाली पाहिजेत.

**मा.महापौर** – पुढील मिटींगमध्ये सगळे प्रश्न घेऊ. तीन जणांचे प्रश्न पुढील मिटींगला घेऊ या.

**मा.प्रशांत शितोळे** - मा.महापौर साहेब, आम्हाला पाच दहा मिनिटांपुर्वी मिळाली. अजून आकडेवारीच बघितली नाही. उत्तर कधी देतील. मा.महापौर साहेब हे जे मी प्रश्न विचारले ते सर्व सदस्यांचे प्रश्न होते.

**मा.नगरसचिव** - मा.महापौर साहेब, सभा कामकाज नियमावलीच्या नियम १०६ प्रमाणे सदस्याने जे प्रश्न विचारले आहेत, त्यांची उत्तरे महापालिका सभेच्या पहिल्या दिवशीच देण्यात येतील.

**मा.प्रशांत शितोळे** - मा.महापौर साहेब, तुम्ही कायद्यानुसार प्रश्नांची उत्तरे दिली आहेत. आपल्याला काही बोलता येणार नाही. मला एकच सांगायचे आहे, आयुक्त म्हणून जबाबदारी स्विकारल्यापासून आयुक्त साहेब आपण कोणकोणत्या गोष्टी केल्या आणि केल्या नाहीत याच्या आकडेवारीसहित खुलासा पाहीजे. हे मी सांगत नाही, तुम्ही सांगत नाही, हेच सांगत आहेत. तुम्ही आज व्यवस्थित पाहिले तर कितीतरी कामांचा पाठपुरावा सदस्यांनी केला असेल, अधिका-यांनी केला असेल किंवा आवश्यक संबंधित व्यक्तीने केला असेल. पण आल्यानंतर काही दिवसांत कमिशनरसाहेबांनी कुठल्याही फाईलवर कामाची आवश्यकता आहे का, गरज आहे का, आर्थिक तरतूद आहे का, महापालिकेची आर्थिक परिस्थिती खराब आहे तूर्तास करु नये असे शेरे लिहायला सुरुवात केली. २/३ महिन्यांत नक्की केले काय? कुठल्या वॉर्डातली फाईल बघा. या शहरात काय फक्त मोठमोठी कामेच आहेत का? आयुक्तांच्या चांगल्या कामाला आमचा शंभर टक्के पाठिंबा आहे. जे केले नाही त्याला मात्र रोख लावला पाहीजे. त्यांच्या बदलीचे वावटळ निघाले तर अनेक लोक त्यांना पाठिंबा देतात. आमच्यासारखा सुध्दा त्या शंभर टक्के सामील होईल. आम्ही सांगितलेली लोकाभिमुख कामे नागरीकांची कामे त्यांनी केली पाहीजेत. नुसती सारथीसारखे उपक्रम राबवून तुम्ही यशस्वी झालात असे म्हणणे योग्य नाही. सारथीमध्ये तक्रारी आल्या ४,०००. आपली शहराची लोकसंख्या किती आहे? ४ लाख मिळकती ५ लाख झाल्या. रेशियो काढा. आणि सारथीवर खर्च केला २० लाख रुपये. काय काय तक्रारी आल्या तर डॉ.गोरे यांच्या कुत्र्यांच्या व डुकरांच्यात निम्म्या तक्रारी आहेत. आपण या साध्या साध्या तक्रारी सोडवू शकत नाहीत. साहेब हाईट सांगतो जी मी पाहिलेली आहे. आपल्या व्हिजिलन्स विभागाकडे एका वॉर्डची फाईल गेली. त्यावर व्हिजिलन्सवाल्यांनी काय लिहावे, गटाराची जागा ताब्यात आहे का? मी कमिश्नर साहेबांना विचारले, शहरातील किती गटारांच्या जागा आपल्या ताब्यात आहेत? हे मनपाने लिहून द्यावे. पूर्वी रस्त्याच्या दूतर्फा गटर असायचे. गल्लीबोळात फार अडचणी असायच्या. आम्हाला हौस नाही आली. तुम्ही काय काम करता, लोकांसमोर काय ठेवता हे सुद्धा आयुक्तांना कळाले पाहीजे. तुम्ही काम करत नसाल, ते दाखवत नसाल तर तुम्ही चुकताय. जाहीर सांगायचे, ३०० ते ४०० कोटी डिप्रेसिएशन आहे. २५ कोटी कोणाचे वाचतात. बांधकाम परवानगीतून अपेक्षित नसताना गेल्या महिन्यात १०० कोटी मिळाले, ते कुठे गेले? शंभर वेळा तेच तेच सांगायचे. न होणा-या नदी सुधार प्रकल्पाकरिता गेले २५ वर्षांत काही झाले नाही. त्यासाठी प्लॅनिंग लागते. अहमदाबादच्या धर्तीवर कशाला करताय, पिंपरी चिंचवडच्या धर्तीवर करा. म्हणजे पर्यटन खर्च किती, पाईपलाईनसाठी ७०० कोटी खर्च केला. म्हणून पैसे द्यायला जमणार नाहीत. आम्ही काय तुमच्या खिशातले मागतोय का? आमच्या हक्काचे आहेत. ७०० कोटी दोन दिवसांत खर्च होणार नाही. कुठल्याही नगरसेवकांनी विचारले तर त्यांना सांगितले जाते की, सर्व आवश्यक काम आहे का? सगळ्याच कामांचे महत्व शहरासाठी नसते. माझ्या गल्लीतले काम शहरात कुठेतरी दिसेल असे नाही. ते गल्लीतल्या माणसासाठी, माझ्यासाठी महत्वाचे आहे. इथे खर्च कशासाठी दिला आहे, याचसाठी

दिला आहे. तुम्ही खर्च करीत नाही. कायम लगेच विरोध करायचा. आयएएस ऑफिसर असून तुमचा ब्लेम असतो. आम्ही करतोय ते सगळे खराब व तुम्ही करताय ते सगळे चांगले हे तुमचे म्हणणे शंभर टक्के चुकीचे आहे. परवा मी तुमच्या तोंडावर आरोप केला. तुम्ही करताय ते चुकीचे आहे. त्याच भावनेशी मी आजही ठाम आहे. ज्या अडचणी येतात, त्या दूर करायची जबाबदारी तुमच्या एकट्याची हे तुमचे म्हणणे चुकीचे आहे. आम्ही सुद्धा या संस्थेचे विश्वस्त आहोत. इथे नुसते राष्ट्रवादी नाहीतर काँग्रेस आहे, आरपीआय आहे, शिवसेना आहे, मनसे आहे, इतरांची जबाबदारी नाही का. आयुक्त साहेब, तुम्ही तीन वर्षांसाठी इथे येता. तेव्हा ठराविक कालावधीसाठी तुमच्याकडून चांगले काम अपेक्षित आहे. तुम्ही प्रशासन सुधरवले यात शंका नाही. परंतू ही लोकांची संस्था आहे. तुमच्यासारख्या आयएएस अधिका-याला लोकशाहीची व्याख्या सांगावी लागत असेलतर ती लाजिरवाणी गोष्ट आहे. माझा बोलण्याचा अर्थ तुमच्या लक्षात येत असेल. मी प्रत्येक कागदाबद्दल बोलायला गेलोतर प्रत्येक अधिका-याला इथे यावे लागेल. त्यांना माझ्या प्रश्नाचे उत्तर देता येणार नाही. कोणत्याही एचओडीला बोलवा, त्याला फक्त कारण विचारा, तुमचे बजेट का संपले नाही. काय सांगणार, एकही व्यक्ती अशी नाही, एकही विभाग असा नाही की, त्यांनी त्यांचे बजेट शंभर टक्के संपवले हे सांगू द्या. ५० टक्के सुद्धा संपवलेले नाही. चेअरमन मा.नवनाथ जगताप इथे आहेत. १८० कोटींच्या वर नवीन कामासाठी खर्च केले नाहीत. १२०० कोटींचे बजेट आहे. ३०० कोटी कमी उत्पन्न अपेक्षित धरले तरी ९०० कोटी शिल्लक आहेत. कमीत कमी ५०० कोटी संपले पाहिजे होते. उद्याच्या काळात आचारसंहितेला सामोरे जावे लागणार आहे. प्रत्येक विभागाचा स्थापत्य विभागाशी संबंध येत असतो. एका वॉर्डसाठी ४ कोटी दिले, त्याची तरतूद २ कोटी, दीडपट खर्च करा म्हणून सांगितले होते. काही ठिकाणी ४ कोटी खर्च करताय, खर्च किती करणार? प्लॅनिंग काय करणार? आज शंभर/दोनशे कोटींचा विषय आलातरी मा.महापौर साहेब त्यांचे म्हणणे असे की, रंगरंगोटी करीता सुध्दा खर्च करायचा नाही. याचे लॉजिक आहे का. पैसे वाचवण्यासाठी मग काय काय करायचा खर्च? रंगरंगोटीसाठी खर्च करायचा नाही. लाईटची काय गरज आहे? रात्री लाईट लावू नका. आपण नको त्या गोष्टी लोकांसमोर ठेवायच्या व लोकांना भुरळ पाडायची. हे राजकारण आम्ही करायचे असते. कमिश्नर यांनी करायचे नसते. माझा शंभर टक्के रोष फक्त आयुक्तांवर आहे. संबंधित विभागातील कर्मचा-यांना देणे-घेणे नाही. हे सगळे जण ते सांगतात तसे ऐकतात. काम करत नाही काय माहित नाही. हे सुद्धा काम करत नाहीत. एक दिवस बदलीची अफवा आलीतर किती लोकांनी त्यांना पाठिंबा दिला होता. काम करत नाहीत त्यांचे काय? माझ्या गल्लीत रोड करायचा तर त्याची आवश्यकता तुम्ही ए.सी.त बसून ठरवायची का? इथे येऊन बघा. किती खालपर्यंत जावे याला मर्यादा असते. त्यामुळे माझे सरळसरळ म्हणणे आहे, प्रशासनाबाबत स्पष्टवक्तेपणा, कायदेशीर कामे झाली पाहीजेत. चौकशी करुन नियमबाह्य कामे झाली नाही पाहीजेत. याबाबती आम्ही तुमच्या पाठिशी आहोत. आवश्यक कामांना त्यांनी नाही म्हणायचे, हा अधिकार तुमचा नाही. तुम्ही तुमच्या मर्यादेत रहायचे, आम्ही आमच्या मर्यादेत राहतो. नाहीतर तुम्ही खुर्चीला पात्र नाही. तुम्हाला काम करण्यासाठी खुर्ची दिली आहे. संविधानाने तुम्हाला काम करण्यासाठी अधिकार दिला आहे. काम न करण्यासाठी दिलेला नाही. एका बाजूला अनधिकृत बांधकामासाठी नाव होत आहे. पाठिंबा आहे. त्यांच्यावर प्रेशर आहे. शहरवासियांना सुद्धा वळण लागले आहे. कामे सुद्धा झाली पाहीजेत.

मला जी.बी.ला विचारायचे आहे. पत्रकारांना सुध्दा विनंती आहे की, बघा, किती कामे केली आहे? संबंधित विभागाच्या टक्केवारीवरुन दिसते आहे. टक्केवारी मुद्दाम दिली नाही. मी मागितली आहे. जुन्या कामावरील खर्च जास्त, नवीन कामांना ठोसा. आम्हाला एवढेच दाखवून द्यायचे आहे. जर चांगले काम करायचे असेल, नागरीकांसंबंधी त्याच्या उपयोगी पडणारे काम करायचे असेलतर अडवणूक करु नका, पिळवणूक करु नका. तुम्हाला शंभर टक्यांपेक्षा जास्त यश मिळते आहे. ही आमची सुद्धा महापालिका आहे. माझा एकच साधा प्रश्न आहे, माझे वॉर्डबाबत सारथीमध्ये कंप्लेट आली तर ती मला कळाली पाहिजे. ६४ वॉर्डातील १२८ नगरसेवक यांना एमएमएस गेला पाहीजे. संबंधित अधिका-यांना कसा जातो. आम्ही पाच वर्षासाठी निवडून आलो आहे. आम्हाला पाच वर्ष कायद्याने अधिकार दिला आहे. ते तुम्हाला सुध्दा माहित आहे. जसा माहिती अधिकार लागू करता. आम्ही सुद्धा त्यातीलच आहोत. तो आम्हाला सुद्धा लागू आहे. त्यांनी उत्तर दिले तुमच्या वॉर्डातले मला माहित नाही. असे होत नाही. आपला काय इंटेलिजन्स ब्युरो आहे चौकशी करायला. आज आरटीआयमुळे नागरीकांमध्ये एक चांगले वातावरण झाले आहे. कोणत्याही परिस्थिती माझे काम होईल फक्त थोडा उशीर होईल. एका बाजुला नागरिकांची सनद दयायची नंतर काम काढायचे नाही, काय करणार आहोत? हे खरेतर बोलणे रुचत नाही. कमिशनर नाही म्हणून माझ्या मनावर ताण आला आहे. ते आजे पाहीजे होते. त्यांनी अशी काही गोष्टींची नकारात्मक उत्तरे दिली आहेत ती या सभागृहासमोर आणायची होती. यावरुन तुम्ही जेवढे चांगले आहात तेवढेत दुस-या बाजुला नकारार्थी भावनेने काम करता ते करु नका. मी त्यांना स्पष्ट बोललो आहे. तुमच्या एकट्यावर बर्डन आहे असे समजू शकतो. तुम्ही आम्हाला सांगा. आम्ही आहोत, शहराचे नेते आहेत. या शहरातील प्रमुख लोकांशी बोलत जा. तुम्हाला मित्र नाहीत, ही आमची चूक आहे का. महापालिकेच्या अडचणी समजून घ्याव्यात. एकही अधिकारी त्यांच्याशी बोलत नाही. ही त्यांची वैयक्तीक बाब आहे. तुम्ही शहाराचा प्रमुख म्हणून काम करता तर चार लोकांशी बोलावे. कलेक्टर यांच्याबरोबर जावे, अति.आयुक्त यांच्याबरोबर बसावे. अडचणी सोडवण्यासाठी लक्ष दिले पाहीजे. पर्यटन विकास आराखडा एवढा मन लावून करायचा होता. मग शासन दरबारी का दिला नाही. आम्हाला एखादी जागा द्या म्हणून पेपरवाल्यांना जाहीर विचारायचे नाही. पेपरबाजी खर्च करुन मिळत नाही. वाढदिवस आलातर लाखो रुपये खर्च करावे लागतात. प्रसिद्धीची हाव का ठेवावी? मा.महापौर साहेब सांगायचे तात्पर्य एवढेच आहे, आपण ज्या पद्धतीने काम करायचा प्रयत्न केला त्याला अपयश आले नाही. काही प्रमाणात तरी यश आलेले आहे. परंतू नागरीकांच्या बाबतीत प्रत्यक्षात काम करायचे त्याबाबतीत सपशेल फेल आयुक्त ठरलेले आहेत असे माझे म्हणणे आहे. प्रसिध्दीची हाव कुणी ठेवावी. कुणी नाही ठेवावी. शहरात फार चांगले लॅण्ड मार्कस् करणार म्हणजे फार चांगले करताय असे नाही. शहरात लॅण्ड मार्कस् झाले पाहीजेत. कासारवाडी उड्डाणपूल, सायन्स टेक्नॉलॉजी पार्क यांनी केलेले नाही. ते आहेत म्हणून शहर चांगले झालेले नाही. बाकीसुद्धा लोक होते. पूर्वी मा.आशिष शर्मा यांना फायनान्शियल कंट्रोल कसा करायचा हे शिकवले. आज तशी परिस्थिती नसताना, पैसे असताना अशा प्रकारच्या उत्तरांना आम्हाला सामोरे जावे लागते आहे. परदेशी साहेबांकडे आम्ही काम घेऊन जातो तेव्हा एक चांगली गोष्ट शिकतो, त्यांच्याकडे फक्त चांगले व कायदेशीर काम घेऊन जावे. न होणारे काम घेऊन जाऊ नये. एकही सदस्य दाखवा ज्याने दोन नंबरचे काम सांगितले आहे. सगळे

नागरीकांचीच कामे सांगतात. ही कामे करताना तुमच्या नजरेत जे काम चुकीचे आहे ते चुकीचे ,जे चांगले ते काम चांगले आहे. तुम्हाला एकट्याला दिसत नाही आम्हाला सुद्धा दिसते. कधी कधी आमच्या नजरेतून बघा. तुमची नजर चांगली आणि आमची. आम्हाला सांगावे तुमची नजर कशी आहे. जसे चांगल्या व्यक्तींचे शहर आहे तसे अडचणींचे सुद्धा शहर आहे. कधी कधी झोपडपटटी वासियांचे नजरेतून, कधी मध्यमवर्गीयांच्या नजरेतून, कधी उद्योजकांच्या नजरेतून, कधी बिल्डरांच्या नजरेतून बघितले पाहीजे. प्रत्येक नजरेतून बघितले तर आपल्या शहरात नक्की काय पाहिजे नक्की कुठे खर्च केला पाहीजे हे तुमच्या लक्षात येईल. साहेब असते तर सर्व आकडेवारीनुसार मी त्यांना सांगितले असते. मा.महापौर साहेब माझ्या प्रश्नांबाबतीत एवढीच विनंती आहे, तुम्ही आदेश द्या. प्रशासनाने आपल्याला सांगितले पाहिजे, किती दिवसांत बजेट संपविणार आहेत. मला माहित आहे बजेट संपविण्यात शंभर अडचणी आहेत. मागील रेशियो शंभर टक्के खूप होता. जुन्या कामावरील खर्च धरला आहे. नवीन कामे काढली नाहीत. सदस्यांनी सांगावे नवीन कामे किती आहेत. माझे तुम्हाला एवढेच म्हणणे आहे, महापौर साहेब तुम्ही या शहराचे प्रमुख आहात. तुम्ही कमिशनरला आदेश द्या, अंदाजपत्रकातील तरतूदी कधी संपणार आहेत? महिनाभरात तरतूद खर्ची पडली पाहीजे. आमची सुद्धा कामे झाली पाहीजेत. अनावश्यक कामांना कात्री लावा. स्मशानभूमी, क्रिडांगण, उद्यान शहरातील मोठमोठे पूल असतील, झोपडपट्टीतील आमची कामे झाली पाहीजेत. पण केवळ पेपरबाजीसाठी चांगले काम करताय म्हणून पुढाकार घेऊन तसे न करता नागरीकांच्या सोयीसाठी प्रत्यक्षात उपलब्ध होतील अशी कामे प्रत्यक्षात ऑनसाईड करावीत अशी विनंती आहे. आकडेवारीवर बोलत नाही. एकाही विभागाने खर्च केलेला नाही. बजेट खर्च करु शकत नाही यात तो विभाग दोषी नाही. यांचे सगळयांचे प्रमुख आयुक्त आहेत. त्यामुळे या सर्वांची जबाबदारी आयुक्तांनी घेतली पाहिजे. त्यांनी आल्यानंतर याबाबतीत ज्या अडचणी आहेत, त्रुटी दिसतात, त्या सगळया बाजूला सारुन कामे मार्गी लावून दिली पाहिजेत असे प्रशासन प्रमुख म्हणून आयुक्त साहेबांना तुम्ही आदेश द्यावा अशी विनंती करतो.

**मा.राजेंद्र जगताप -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, दिनांक ३/१/२०१३ ला मी आयुक्तांना एक पत्र दिले होते. शहरामध्ये १८ मी. रस्त्याच्या साईडपट्टीचे काम करण्यासाठी अडचणी येतात असे पत्र दिले होते. त्यात २/३ विषय होते. त्यात माझ्या प्रभागातील साईडपट्टी करण्यासंबंधी मा.आयुक्त साहेब यांनी प्रभागामध्ये मिटिंग घेतली होती. त्यावेळी आयुक्तांसोबत माझ्या प्रभागातील दांगट साहेब व सर्व अधिकारीही तिथे होते. व मी एकटाच त्या मिटिंगला होतो. मिटिंग घेतल्यानंतर हा प्रश्न एक महिन्यात सोडवू म्हणून सांगितले होते. परंतू आपल्या अधिका-यांनी एका केसचा निकाल लागला नाही त्यामुळे कामे करता येत नाही असे सांगितले. १० तारखेला मे.अंबिके यांचा निकाल लागणार होता तो अजून लागला नाही. त्यांना काम दिले आहे. त्यामुळे दोन्ही बाजूंना साईड पट्टी करायचे काम करता येणार नाही. कायदा विभागाने त्या केसेस पाहील्या. मला माहिती मिळाली, त्या केसचा नंबर ६८५२ आहे. कायदा विभागाचे पवार साहेब यांनी सांगितले, या केसचा निकाल स्मॉल कॉझ दि.११ला लागलेला आहे. तसे असताना सुद्धा अधिकारी सांगतात, आम्हाला जर माहित झाले तर आम्ही त्या ठिकाणी काम करु. बारा महिने झाले तरी अजून त्याठिकाणी कुठेही काम झालेले नाही. अशी परिस्थिती

असताना प्रभाग अधिका-यांना सांगितले, नगररचना विभागाला सुद्धा सांगितले होते. मा.प्रशांत पाटील होते. डेप्युटी म्हणून मा.अनिल शिंदे होते. त्यांनी सांगितले, लगेच काम सुरु करु. १६ महिने झालेतरी अजूनही काम झालेले नाही. दि.११ ला केसचा निकाल लागून सुद्धा काम सुरु नाही. प्रभागातील बजेट पाहीलेतर ड प्रभागासाठी रु.५,४४,००,०००/- बजेट असताना माझा प्रभाग क्रमांक ५७ मध्ये रु.४९,००,०००/- चे काम होते. त्यात फक्त रु.७ लाखाचे टेंडर निघालेले होते. फक्त रु.७ लाखाचे काम झाले आहे. टेंडर का होत नाही. वर्कऑर्डर का निघत नाही. अजून कामे पेंडींग आहे. वर्कऑर्डर काढल्यावर ठेकेदार ती घेत नसेलतर आयुक्तांनी कारवाई केली पाहीजे. त्याला ब्लॅकलिस्टला टाकले पाहीजे. ठेकेदार वर्क ऑर्डर घेत नाही असे असताना या महापालिकेला बेस्ट सिटी पुरस्कार मिळाला आहे. महापालिकेच्या आयुक्तांना आर्य पुरस्कार मिळाला आहे. आयुक्तांना केंद्रीय कृषीमंत्री पवार साहेबांनी सारथी हेल्पलाईनवर चांगले काम केल्याबद्दल शाबासकीचे पत्र दिले आहे. आत्तापर्यंत ९८ टक्के कामे सारथी हेल्पलाईनवरुन केली जातात असे सांगितले जाते. परंतू अजूनही २ टक्के कामे बाकी आहेत. शहरात एवढे अनधिकृत टॉवर्स झाले आहेत ते आजपर्यंत काढले गेले नाहीत. मा.प्रशांत शितोळे यांनी सांगितले, शहरात कुत्र्यांचा सुळसुळाट झाला आहे. सांगवी भागात जवळजवळ ५० लोकांना कुत्री चावली आहेत असे पेपरला आले होते. माझ्या प्रभागात रात्री अपरात्री नागरीकांना झोप येत नाही. डॉ.गोरेंना मी प्रभागांच्या मिटिंगमध्ये ज्यावेळी बोललो त्यावेळी मी त्यांना विचारले असता त्यांनी सांगितले की आपल्याकडे कामगार कमी आहेत. पाच ते सहा हजार पेमेंट कामगाराला आपण देत आहोत. मी त्यांना सांगितले, रु.दहा/बारा हजार पेमेण्ट द्या. त्यांनी त्यावर फोन सुद्धा केलेला नाही. आजपर्यंत सुधारणा सुद्धा झालेली नाही. नागरीकांना रात्री झोप येत नाही याकडे कोणी लक्ष देत नाही. आपल्या या शहरात शहराचा विकास होत असताना विकास कामे झाली म्हणून पुरस्कार देतो. यात गांभिर्याने लक्ष दिले पाहीजे. बेस्ट सिटी अवॉर्ड मिळाला आहे. तर बेस्ट सिटीसारखी कामे झाली पाहीजेत.

**मा.विनोद नढे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, प्रशांत शितोळे यांनी प्रश्नोत्तराच्या वेळेस सभागृहासमोर जे प्रश्न विचारले आहेत, नगरसेवकांच्या अतिशय जिव्हाळयाचे प्रश्न सभागृहात मांडले आहेत त्याबद्दल त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. आपल्याकडे जरी या विषयांची आकडेवारी नसली तरी मी पंधरा दिवसापूर्वी प्रत्येक विभागाकडून, प्रत्येक प्रभागात किती प्रमाणात काम झाले आहे याविषयी माहिती मागविली होती. निश्चितच याठिकाणी फक्त स्थापत्य विभागाला अ प्रभागामध्ये २८ टक्के खर्च झाले आहेत. ब प्रभागासाठी १६ टक्के, क प्रभागासाठी १४ टक्के व ड प्रभागात २० टक्के अशी एकूण टक्केवारी पाहा. २० टक्के रक्कम खर्च झाली आहे. ज्या नागरिकांच्या जीवावर आम्ही या सभागृहात काम करीत आहोत, त्या नागरिकांना उत्तर देताना आम्हाला अतिशय अडचणी येत आहेत. कोणत्याही प्रभागात काम चालू नाही. एकूण या सर्व गोष्टींचा अभ्यास करता असे निदर्शनास आले आहे की, सुमारे १२०० कामांचे बीलो टेंडर दिलेले आहेत. मी हे विचारू इच्छितो की, ज्या पद्धतीने पुणे महापालिकेचा डिएसआर आहे, त्या पद्धतीने आपला डिएसआर आहे का. काही उपाययोजना केल्या आहेत का. रक्कम खर्ची होते त्यात निश्चितपणे लक्ष नाही. कामाचे दर किती टक्के बीलो असावे, त्याबद्दल नियम आहेत का? नगरसदस्यांनी सुचविलेली कुठलीही कामे याठिकाणी होत नाहीत. आताच

प्रशांत शितोळे यांनी सांगितलेच आहे की, अगदी किरकोळ स्वरुपाची कामे सुध्दा याठिकाणी होत नाहीत. परवा प्रभागात रस्ता करीत असताना केवळ अर्धा रस्ता केला. नंतर ठेकेदाराने सांगितले की, टेंडर बीलो आहे. तेवढ्या पैशांत तेवढेच काम होणार आहे. उर्वरीत कामाबाबत नागरीकांना काय उत्तर देणार. आयुक्तांचा अतिशय ढोबळ कारभार चालू आहे. किती ऑर्डर झाल्या, निविदा उशीरा निघाल्या. मागील आर्थीक वर्षात खर्च झाला नाही तो पुढील वर्षात फिरवला आहे का नाही याचे देखील आयुक्तांनी मला उत्तर दयावे. त्याचप्रमाणे काही कामांच्या निविदा पूर्ण झाल्या नाहीत, आयुक्त यांच्या मार्फत निविदा रद्द केल्या जातात. प्रत्येक फाईल मागवून घेतात, त्यावर शेरा देतात. दक्षता विभागाकडे तपासणीसाठी देतात. काम पूर्ण झाल्यानंतर तपासा. आधीच पाठपुरावा करत असाल तर ते अतिशय चुकीचे आहे. कामाची गुणवत्ता राखण्याबद्दल आमचा पाठिंबा आहे. परंतू कामे रोखली जातात ही खेदजनक बाब आहे. बीलो टेंडर असेलतर १५ टक्के पेक्षा कमी दर असेलतर २ टक्के घेतो. १५ टक्के पेक्षा जास्त बील असेलतर सिक्युरीटी डिपॉझिट घेतो. यात कामाच्या दर्जात फरक पडता कामा नये. शासकीय कामे पूर्ण करतो मग प्रभागातील कामांचे काय याचे देखील उत्तर द्यावे. संपूर्ण पिंपरी चिंचवड शहरात अनधिकृत बांधकामांवर कारवाई करत असताना सर्व अधिका-यांना त्या कामात गुंतवले जाते आहे. त्यांचे प्रभागातील कामात लक्ष नाही. कारवाई करणे, एफआयआर दाखल करणे या सर्व कामांसाठी त्यांचा वेळ जातो आहे. प्रभागातील कामांकडे त्यांचे दूर्लक्ष होते आहे. यासंदर्भात पोलिस चौकशी केंद्र स्थापन करावे किंवा वेगळे अधिकारी नेमावेत अशी मी विनंती करतो. त्याचप्रमाणे या वर्षीच्या बजेटवर विकास कामांवर खर्च करण्यात येतो आहे. महापालिकेने महसुली खर्चातून विकास कामांवर खर्च केला पाहीजे असे मला वाटत नाही. याचा अर्थ असा आहे की, आपण आस्थापनेवर ३४ टक्के खर्च होतो तो ४ टक्के गृहित धरला तरी यापुढे नोकरभरती होणार आहे का नाही? माझी कळकळीची विनंती आहे, प्रभागातली सर्व कामे मार्गी लावावीत. गेले ७/८ महिने यात कोणतेही काम झालेले नाही. यात आपण लक्ष द्यावे अशी विनंती करतो.

**मा.शत्रुघ्न काटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर माझा आयुक्तांना प्रश्न आहे की, ज्या बजेटला महापालिका सभेत मंजूरी घेतली असताना मंजुरीसाठी गेलोतर प्रत्येक फाईलवर कामाची आवश्यकता नाही, आवश्यकता नाही असे लिहून तुम्ही माझ्या चार फाईल कॅन्सल केल्या आहेत. हा अधिकार लोकनियुक्त प्रतिनिधींना आहे का आयुक्तांना आहे याचा खुलासा करावा. आतापर्यंत महापालिकेने २० टक्के बजेट खर्च केले. आयुक्तांच्या सांगण्याप्रमाणे २० टक्के लॉस झाला आहे. राहिलेले बजेट बँकेत डिपॉझिट ठेवले आहे. आवश्यकता नाही. लोकांच्या मागणीनुसारच काम करत असतो असे अधिकारी सांगतात. ड्रेनेज लाईन करायची, रस्ता करायचा, प्रत्येक कामाला आयुक्तांनी कात्री लावली आहे. याचा आयुक्तांनी खुलासा करावा अशी विनंती आहे.

**मा.महेशदादा लांडगे -**मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, प्रशांत शितोळे यांनी घेतलेला विषय तसा महत्वाचा आहे. अनेक मुद्दयांवर फार महत्वाचे बोलले आहे. बजेटला मंजूरी देऊन वर्ष संपले आणि आता दोन महिने राहिले आहेत. महापौर साहेब तुम्ही व मी एका प्रभागातील आहोत. महापौर आपण एका प्रभागातील आहोत. स्थापत्य विभागाचे बजेट क प्रभागासाठी ५६

कोटी होते. गेले १० महिन्यांत फक्त ९ कोटी खर्च केले आहेत. आता २ महिने राहिले आहेत. असे असेलतर मला वाटते, क प्रभागात काही कामच राहिलेले नाही. तसे असेलतर सभागृहाला मी आठवण करुन देतो आता माझ्या इथे जो रस्ता आहे तो एक फुटाचा आहे. याविषयी मी इथे कळकळीने बोललो होतो. आत्ता अस्तित्वातील रस्ता ४५ मी. आहे. डि.पी. ६१ मी. आहे. ४५ मी. चे टेंडर काढले आहे. पीडब्ल्यूडीची मान्यता ६१ मी. चा पूल करा अशी आहे. कोणत्या पुलाचा उपयोग होईल. या पुलाला आपल्या डि.पी.त सर्वीस रोड नाही. त्यात आपला ६१ मी.चा रस्ता पूर्ण होत नाही ही गोष्ट मी आयुक्तांना समक्ष नेऊन दाखवली होती. त्या स्पॉटवर होणारे ॲक्सिडंट, गाड्यांचा स्पीड हे मी रस्त्यावर उभे राहून दाखवले आहे. तुम्ही बघितले तुम्ही त्यावर काय कारवाई केली. माझेकडील लोक मला नाव ठेवायला लागले आहेत. एखादा माणूस गेल्यावर गाडी घेणार का? एवढे बजेट असताना पैसे आहेत, तुम्ही मंजूर करा. कोण करत नाही. नुसती एखादी व्यक्ती/माणूस सुंदर असून चालत नाही, त्याच्या अंगात गुणही तेवढेच सुंदर असावे लागतात. आम्ही बजेटला मंजुरी दिली आहे. बाकी कुणी विद्वान आहे का नाही? तुम्ही एकटेच विद्वान आहात का. आम्ही इथे गोटया खेळायला आलो आहोत का. जागेवर पाहायला सांगितले होते. तुमचा शिस्तपणा कामाला येणार नाही. एखाद्याचा जीव गेलातर त्याचातरी विचार करा. सीएमईवाल्यांनी आमचा रस्ता बंद केला, त्यावर तुम्ही काय कारवाई केलीत. आपण त्यांना सुविधा देतोय, टॅक्स घेतोय. आम्ही सांगतो तुम्ही तिथ जा आणि पाहा. आम्ही करु शकत नाही. माझ्यावर विश्वास ठेवू नका. जा आणि पहा. सारथीला पाण्याचे कनेक्शन पाहिजे म्हणून कम्पलेण्ट येते. पण कुत्री पकडायला या अशी कम्पलेण्ट आहे का. लोकांना कुत्री चावली तर लोक आम्हाला विचारतात, नगरपालिका काय करते? अहो करा, लोकांची काम करा. त्याची गरज आहे की नाही तुम्ही ठरवा. अहो असं कुठं असतं का? लोकांचा विचार करा. आम्ही काय करतो? १०० टक्के कायदा बघतो? हायकोर्टाचा निकाल आहे घरे ठेवायची, का पाडायची. काही तरी माणुसकी आहे का नाही? तुम्हाला खरच दुसरा अभ्यास शिकवला का नाही? करा लोकांची काम करा. एलबीटीमध्ये तीनशे कोटी रुपये होतात. आमचा जरा विचार करा. लोकांना आमचेकडून घ्यायचे असते. आम्हाला द्यायचे असते. लोक आमचेकडे येतात आम्हाला उत्तर दयावे लागते. रस्ता नाही, पाणी नाही. आवश्यक सुविधा पुरवित नाही. आम्ही त्या भागाचे नगरसेवक आहोत. आमची किती तरी तळमळ आहे. सारथीवर आमच्या ग्रामीण भागातील लोकांच्या काय तक्रारी जाणार. तुम्ही खर्च करा. आम्ही सांगत होतो खर्च करु नका. पोराचे लग्नाचे वय झाले तर काय करायचे? बुजवायला ठेवायचे काय?

**मा.जावेद शेख** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब व पत्रकार आपण ऐकत आहोत आमच्या सन्मा.सदस्यांच्या भावना किती तीव्र झाल्या आहेत. मनातून वेगवेगळ्या विषयी भावना उमटतात. वेगवेगळे सदस्य बोलत असताना प्रत्येकजण एकच विषय मांडतो. आयुक्त साहेब कायदयावर बोट ठेवून चालतात. परंतू आयुक्तांच्या कारकिर्दीत महापालिकेच्या वतीने आपल्या अधिका-यांच्या माध्यमातून अनेक गुन्हे घडत आहेत. सुप्रिम कोर्टाचा निकाल आहे. ड्रेनेजच्या काम किंवा साफसफाई त्याची स्वच्छता मॅन्युअली होता कामा नये. ड्रेनेजच्या काम करताना माणसाने ड्रेनेजमध्ये उतरता कामा नये. परंतू माझेकडे फोटो आहे. अजुनही आयुक्तांच्या टाईट कारभारामुळे प्रत्येक गोष्टीत याची आवश्यकता नाही, त्याची आवश्यकता नाही. गल्ली

गल्लीमध्ये माणसे ड्रेनेजमध्ये उतरतात. ही कळकळ आयुक्तांसमोर मांडली तर ते त्या अधिका-याला सस्पेण्ड करणार. कोणी स्वतःवर घेणार नाही. मा.प्रशांत शितोळे यांनी प्रश्न विचारले. त्यावर ड्रेनेजच्या कामासाठी शहरात किती खर्च झाला याबद्दल खुलासा का दिला गेला नाही. बजेटच्या मिटिंगमध्ये ठरलेले असताना पिंपरी चिंचवड शहरामध्ये ड्रेनेजची आकडेवारी का दिली गेली नाही. परदेशी साहेब आमच्यासमोर बसले होते. एकदा कडक आवाजात सांगितले होते, प्रत्येक प्रभागाला दीड कोटींची तरतूद दिली गेली आहे. महापालिकेच्या माणसांना ड्रेनेजमध्ये उतरुन तो मैला हाताने काढावा लागतो. मा.दत्ता सानेंचा वॉर्ड बघा, बापूंचा वॉर्ड बघा अजून अनेक ठिकाणी बघा ड्रेनेज लाईन पोचल्या नाहीत. तिथे एका वर्षाला कमीत कमी रु.६ कोटी खर्च केला पाहीजे. फक्त ४२ लाखांचे एक टेंडर निघाले आहे. हे टेंडरदेखील मागील आठवड्यापासून सुरु होते आहे. आता दोन महिने राहीले आहेत. त्याची लाईन कधी खोदणार, बुजवणार. त्यासाठी स्थापत्य विभाग कधी काम करणार याचा खुलासा हवा आहे. जी आकडेवारी विचारली होती त्यात ड्रेनेज विभागाने किती खर्च केला, आत्तापर्यंत किती खर्च झाला त्याची तरतूद किती आहे याचा खुलासा का केला नाही. सारथीवर बघा, ड्रेनेजच्या अनेक तक्रारी आहेत. पुणे महापालिकेत कुठल्या कुठल्या मशिन आहेत. त्यांच्याकडे गल्लीगल्लीत हॅण्ड मशीन आहे. याबाबत वेळोवेळी आम्ही आयुक्तांना विनंती केली की, मशीन खरेदी करा. पिंपरी चिंचवड शहरामध्ये ज्या-ज्या ठिकाणी दाट वस्ती आहे अशा ठिकाणी ड्रेनेजमध्ये माणसे उतरता कामा नये. कायदेशीर बोलताना आपण स्वतः गुन्हा करता आहात. यासाठी कोर्टात कोणी दाद मागीतली तर निश्चित महापालिकेवर गुन्हा दाखल होईल. सुप्रिम कोर्टाची ऑर्डर असताना देखील ड्रेनेज विभागात माणसांना उतरवून हाताने घाण भरावी लागते आहे. ड्रेनेजचे कामामध्ये जेवढे कमविले आहे तेवढा मशीनवर खर्च कधी करणार? ड्रेनेजमध्ये एक, दोन कामगार मेल्यावर करणार का? याचा खुलासा दया.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब एक दिवस अगोदर प्रश्नांची उत्तरे प्रत्येक सदस्यांच्या घरी आली पाहिजे. प्रश्नांची उत्तरे जी.बी.च्या कमीत कमी एक दिवस अगोदर यायला पाहिजेत. ती आत्ता टेबलवर दिली आहेत, काय अभ्यास करणार. याबाबत इन्स्ट्रक्शन्स द्या. स्थापत्य विभागाचा एकूण रु.२३७१ कोटींपैकी रु.५४३ कोटी खर्च झाला आहे. अजुनही दोन महिने बाकी आहे. शेवटच्या महिन्यात ठेकेदार त्यांची बिले काढण्यासाठी बिजी असतात. फक्त वीस टक्के काम झाले आहे, ८० टक्के होणार आहे का? पर्यावरण विभागासाठी तरतूद ३४ कोटी, आपण खर्च केले फक्त दोन कोटी रुपये. पालक मंत्री इन्स्पेक्शनसाठी आले होते. त्यांनी प्रोजेक्ट प्राधान्याने घ्यायला सांगितला. वर्क ऑर्डर देऊन काम सुरु व्हायला पाहिजे होते. वर्क ऑर्डर नोव्हेंबर डिसेंबर मध्ये दिली गेली होती. अजूनही वर्कऑर्डर बाकी आहे. प्रशासनाने लक्ष दिले होते. सप्टेंबर, ऑक्टोबरपर्यंत वर्कऑर्डर देणार. बाकी ६ महिन्यांत काम होणार. शेवटच्या दोन महिन्यात कसे काय बजेट खर्च करणार? ऑफिसर सेमिनार करण्यासाठी जातात. डिसेंट्रलायजेशन हा शब्द कुठेतरी शिकला असेलतर डेप्युटी इंजिनिअला २०,००० पर्यंतच्या पॉवर्स दिल्या आहेत. एकदा फाईल रिजेक्ट झालीतर परत वर जायला दोन महिने लागतात. सोळा लाखापर्यंतच्या पॉवर्स एक्झिक्युटीव्ह यांना का देत नाही. क्लास वन ऑफिसर्स यांना काही पॉवर्स नाहीत. डिसेंट्रलायजेशन बाबत निर्णय घ्यायला पाहीजे. २/३ महिने फाईल

वरच असते. काही निर्णय होत नाही. फाईलमध्ये काही शंका आलीतर अधिका-यांना समोर विचारुन निर्णय का घेत नाही. रिमार्क कोण करतो चर्चा करा. आपल्याकडे पूर्वी मा.प्रविणसिंग परदेशी साहेब होते त्यांनी कधीही चर्चा करा असा शब्द वापरला नाही. ताबडतोब एक्झिक्युटीव्ह इंजिनिअरला बोलवून येस किंवा नो करत असत. कामाची गरज आहे का, गरज आहे म्हणून काम काढले आहे. मा.विधी समितीत ठराव झाला आहे. गरज आहे म्हणून. स्थायी समितीत ठराव झाला आहे. टेंडर काढले आहे का, कशाला विचारायची गरज आहे का. आम्ही ग्रामपंचायती सारखे काम करतो आहोत. एक्झिक्युटीव्ह, सुपरवायजर, डेप्युटी, जे.ई. प्रत्येक स्ट्रक्चरमध्ये इन्फ्रास्ट्रक्चर आपल्याकडे आहे. तरी निर्णय मात्र एकाच माणसाने घ्यायचा. आत्तातरी सुधारा. हे लोक ८०,००० पगार घेतात तरी ते काही निर्णय घेऊ शकत नाही? पंधरा वीस वर्षे काम करुनही निर्णय घेऊ शकत नाही? काय फायदा आहे. परदेशात जाऊन कोर्स करुन येतात. त्यांना साधे डिसेंट्रलायझेशन समजत नाही? आम्ही काय करणार? कमीत कमी डेप्युटी, एक्सिक्युटीव्ह यांना पॉवर्स द्या. माझे दृष्टीने त्यांना निर्णय घेऊ दया. कुठलेही निर्णय घेताना तुम्ही अनेक मॅटर्सबाबतीत निर्णय घेता. आम्हाला विश्वासात घेत नाही. एका गोष्टीसाठी दोन जागा, एका जागी अधिकारी, एका जागी कॉर्पोरटर. कॉर्पोरटरला माहित नाही वॉर्डात काय चालते. माझ्या वॉर्डात डांबरीकरण सुरु झाले तेव्हा मी स्थापत्यला पत्र पाठवले, डांबरीकरण बंद करा. माझे लिकेजचे काम करायचे आहे. तुम्ही डेव्हलपरचे काम बंद करा. विकासाची कामे करताना कॉर्पोरेटरला विश्वासात घेतले जात नाही. आम्ही काय झक मारायला आलो नाही इथे.

आम्हाला सांगितले जाते, असे असे पत्र आले आहे, कशासाठी डांबरीकरण बंद करताय. या वर्षी बजेट लॅप्स झालेतर पुढील वर्षी मिळणार नाही. आत्ता उत्तर दिले, २० टक्के पैसे खर्च झाले. यात सुद्धा १५ टक्के गेल्यावर्षाच्या कामासाठी बजेट नव्हते. त्यांची कामे केली आहेत. माझी विनंती आहे की, कोणताही निर्णय घेताना त्या भागातील नगरसेवकांना विश्वासात घ्या. आम्ही सुद्धा या भ्रमामध्ये आहोत. टक्केवारी जास्त मिळते तिथे विश्वासात घेऊ नका. २०१२ मध्ये स्काडा म्हणून प्रोजेक्ट होता. स्थायी समितीत विषय आला. २०१२ला टेंडर काढायचे होते. महापालिका सभेत चर्चा झाली. काही सदस्यांनी विरोध केला असलातरी या प्रोजेक्टचे टेंडर रिजेक्ट केले. हा तुमचा अधिकार असे तुम्ही म्हणता. किती मॅटरमध्ये असे आहे. दीड कोटींचे टेंडर असून सुद्धा मंजूर केले होते. स्काडा सिस्टीम पाणी पुरवठ्यासंदर्भात आहे. तुम्ही बदलत नाही व रिकॉल करता हे सुद्धा चुकीचे आहे. मला जास्त वेळ घ्यायचा नाही. विकासाची कामे व्हायला पाहीजेत. आम्हाला गरज आहे. आम्हाला पब्लिकपुढे जायचे असते. अधिका-यांना १० वर्षे झाली की एक स्टार वाढणार. असे आमचे नाही. आम्ही जर डेव्हलपमेंट दाखवली नाहीतर आम्ही निवडून येऊ शकणार नाही. पब्लिकला सुद्धा डेव्हलपमेंट पाहीजे. आमचे आम पार्टीसारखे आहे. मा.अजित पवार यांच्या पार्टीत आहोत पण आमचे आम पार्टी सारखे आहे. आमच्यात मरगळ आली, आम्ही काही करु शकणार नाही असे समजू नका. आम्ही सुद्धा उपोषणासाठी बसू. जो अधिकारी बजेट खर्च करत नाही त्याच्यावर कारवाई होत नाही. बजेट एफ.डी. करण्यासाठी नाही. या वर्षी काम झाले नाहीतर पुढील वर्षाच्या बजेटमध्ये घेणार. जे काम व्हायचे ते होणार नाही. अधिका-यांना डेव्हलपमेंटचे इंजेक्शन द्या. टक्केवारी फिक्स करा. तेवढ्या टक्यांमध्ये काम व्हायला पाहीजे. बाकी गोष्टींत अधिका-यांवर कारवाई करता. मग रेकॉर्डवर एंट्री करा काम करता येत नाही. जे.ई. एक्झिक्युटीव्ह यांना पॉवर्स द्या. सारथीवर ज्या

वॉर्ड किंवा भागातून कंम्पलेण्ट येतात त्याची लिंक अधिका-यांना जोडली आहे. त्यांना माहित पडते मग आम्हाला का नाही. आम्ही सिस्टीममध्ये नाही का. आम्ही काय त्या माणसाला जाऊन मारणार का. आम्हाला अधिकार आहे. अधिका-यांबरोबर आम्हाला सुद्धा एक लिंक दिली पाहीजे. महापौर साहेब, महापालिकेत कोणतीही गोष्ट सिक्रेट नाही, कॉन्फिडेन्शियल नाही. डिपार्टमेंटमध्ये व्हिजिट द्या. बिल्डिंग परमिशनमधले जे.ई. सांगतात मला पेपर्स देता येत नाहीत. माहिती अधिकारात ॲप्लिकेशन द्या. कॉर्पोरेटरने माहिती अधिकारात ॲप्लिकेशन केले पाहिजे का. कॉर्पोरेटरने कोणत्याही विभागाची माहिती मागितली तर ती त्याने दिली पाहीजे.

**मा.अनिता तापकीर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब आमच्या वॉर्डमध्ये ड्रेनेजचे काम करताना अक्षरशः लोक पैसे मागतात. दोन दोन दिवस लोकांच्या दारात पाणी साठते. सातशे, आठशे रुपये अशी मागणी करतात. कुत्र्याचा  सुळसुळाट झाला आहे. लोकांना झोपू सुध्दा देत नाही. दहा, पंधरा कुत्रे रोज गाडयाखाली जाऊन बसतात. माझे वॉर्डमध्ये ड्रेनेजची समस्या आहे. वॉर्डात ब्लॉकचे काम अर्धे शिल्लक आहे. प्रभागांत बजेट शिल्लक नाही असे सांगतात. जे काम करुन झाले आहे त्या झालेल्या कामाची उरलेली घाण सुध्दा उचलली जात नाही. इतकी गंभीर समस्या आहे. आम्ही निवडून येऊन दोन वर्षे झाली तेंव्हापासून लोक आम्हाला विचारतात तुम्ही काय काम केले? तीन वर्षे झाले आहेत काही काम होईल का हे आम्ही सतत सांगत आहोत.

**मा.वसंत लोंढे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सगळयाच नगरसेवकांच्या याच समस्या आहेत. सगळ्यांच्या कामात काटछाट झाली आहे. आयुक्त साहेब नाहीत म्हणून बोलत आहोत असे नाही. बजेटला कात्री लावायची. ३० टक्के टेंडर काढले होते. ते कॅन्सल केले आहे. कासारवाडी मोशीपर्यंत साडेचार कोटींचे काम काढणार, तोपर्यंत आमचे नगरसेवक पद राहणार आहे का. अशी टेंडर काढायचा धडाका आयुक्तांनी लावला आहे. फूटपाथ रोडवाईडींगकरीता दोन टेंडर काढले होते. वर्क ऑर्डर झालेली असताना ठेकेदार कामे करीत नाही. महापौर साहेब आम्हाला आयुक्तांनी ४ महिन्यांपूर्वी शब्द दिला होता. रेडझोनमध्ये जमिन लेवलचे काम करायला परमिशन मिळाली होती. त्यांनी सांगितले होते. रस्त्यांचे डांबरीकरण, पाण्याची पाईप लाईन करुन देण्यात येईल. परंतू आयुक्तांनी दिलेला शब्द पाळला नाही. आयुक्तांनी पत्र दिले, तसे काम करता येणार नाही. आपल्या महापालिकेतील माझ्या वॉर्डातली आरोग्य खात्याची कर्मचारी महिला आहे तिने बेकायदेशीर मजले बांधले म्हणून  तिच्या घराचे बांधकाम पाडायला सुरुवात केली. पंचवीस टक्के पाडले. दुर्दैवाने तिच्या पतीच्या पायाला गँगरीन झाले. त्यावेळी त्यांनी आयुक्तांना विनंती केली, पती हॉस्पिटलमध्ये असल्यामुळे बांधकाम पाडायला मुदत द्यावी. परंतू आयुक्तांनी अजिबात मुदत दिली नाही, अधिका-यांना पाडायला लावले. त्या टेंशनमध्ये त्या महिलेला अँटॅक आला. व तिला वाय.सी.एम.हॉस्पिटलमध्ये अँडमिट केले. किती निर्दयी मनुष्य आहे. अशा परिस्थितीत सुध्दा आयुक्त ऐकत नाही. कोर्टाच्या निर्णयानुसार सांगायचे, करायचे. कायदा करणारे सुद्धा असे करु शकत नाहीत. थोडा समजूतदारपणा पाहीजे. कायदा विभागाचा अभिप्राय घेतला. कायदा गाढव आहे. तसेच माझ्या भागात दोन फूट ड्रेनेजचे पाणी साचलेले आहे. त्या ठिकाणी खड्डा निर्माण झाला आहे. आयुक्त साहेबांना सांगितले, तेवढे खुले करुन द्या. त्यांना काय उत्तर द्यावे, तुम्ही कोर्टात जा. बंड साहेबांनी अशाच प्रकरणात

स्वतः पोलिस डिपार्टमेंट लावून पाणी काढून दिले होते. शेतकरी हा कोणाच्याही शेतीतून पाणी घेऊ शकतो हा कायदा आहे. असे नसेलतर शेती होऊ शकणार नाही. ड्रेनेजचे पाणी चालू असताना अडवले होते. बोलायची ही पद्धत झाली का. जुन्या नगरसेवकांना अशी उत्तरे देत असालतर नवीन नगरसेवकांना काय उत्तर मिळत असेल. सगळ्या नगरसेवकांना अडचणी आहेत. सगळ्यांना विकास कामे व्हायला पाहिजे आहेत. बजेटला कात्री लावायचे काम सुरु केले आहे. टेंडर काढायचे, खर्च करायचा, नंतर ते कॅन्सल करायचे. मग टेंडर काढूच नका. हे सुद्धा विचारपूर्वक केले पाहीजे. सगळ्याच नगरसेवकांच्या अडचणी आहेत. सगळ्यांचा आयुक्तांवर आक्षेप आहे. मा.प्रशांत शितोळे यांनी मांडलेले प्रश्न योग्य आहेत. बजेटला कात्री लागली आहे.

**मा.राजेंद्र काटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, बजेटच्या मानाने पाहिलेतर आमच्यासुद्धा भागात अनेक कामे प्रलंबित पडलेली आहेत. प्रत्येकजण म्हणतो विषय झाला. आता वर्क ऑर्डर मिळणार आहे. मी सहा महिन्यांपासून हेच ऐकतोय. यापलिकडे जाऊन वर्कऑर्डर नाही परंतू एखादे काम बीओटी तत्वावर एखाद्या बांधकाम व्यावसायिकाला हाताशी धरुन करु इच्छितो. तुम्हाला मघाशी म्हटल्याप्रमाणे अशा कामांना काय अडचण येते. बजेट कमी आहे, ते मिळत नाही. खर्च करायला पैसा नाही सगळे मान्य आहे. एखादा बिल्डर सर्कल डेव्हलप करत असेलतर त्याला विभागाकडून साधे पत्र सुद्धा जाऊ नये. पेपर मिळाले आहेत, ड्रॉईंग सबमिट केले आहे. अनेक गोष्टी करत असाल तर अशी कोणती परिस्थिती आहे की, कामच करायचे नाही असे ठरविले आहे का? बीओटीवर द्यायला काय हरकत आहे. यातून झिरो बजेट होते. जाहिरात माध्यमातून बीओटीवर त्यांची काम करायची इच्छा असली तरीसुद्धा तुम्ही काम करायचे नाही असे ठरवले आहे का? जवळजवळ सात वर्षापुर्वी संपवेलचे टेंडर काढले होते. भूमीपूजन ५ वर्षापूर्वी झाले होते. हे टेंडर कॅन्सल करुन नवीन काढले होते. त्याची वर्कऑर्डर अजून येते आहे. पाच/सहा वर्षात वर्कऑर्डरच निघाली नाही. मग पाण्यासारखी महत्वाची गरज सुद्धा तुम्ही पुरवायची नाही का? आत्ताच मा.नाना लोंढे यांनी सांगितले आहे. माझे म्हणणे आहे, कायद्याप्रमाणे घेतातर सरळ तसे घ्या. याच भागात २० मी. रस्ता संपादन करताना जागा मालकाची ३ १/२ मी. जागा त्यात गेली आहे. आज पन्नास लाख भाव चालला आहे. त्याचे साडे तीन/चार कोटींचे नुकसान झाले आहे. तुमच्यावर कोणी गुन्हा दाखल करायचा. कुठेही लाईन टाका. नगररचना विभागाच्या प्रमुख भदाणे मॅडम यांना मी कळवले होते. ॲक्शन का घेता. असा मनमानी कारभार चालणार असेल तर आम्ही दाद कुठे मागायची? या ठिकाणी आपले भागात जो रस्ता आहे, साडे आठ मीटर जागा पडलेली आहे. साडे तीन मीटरचा रस्ता आहे. जवळपास पन्नास लाख भाव चालला आहे. त्याठिकाणी डांबरीकरण करायचा आदेश दिला होता. खोदायला परवानगी दिलेली आहे. पाईप लाईन टाकून झालेली आहे. चार पाच महिने झाले त्याठिकाणी गुडघाभर खड्डे आहेत. डांबरीकरणाचे काम झालेले नाही. पावसाळयात कामे करणार का? कशा प्रकारची कामे करताय? हे. तरी कृपया तुम्ही केलेले, महापालिकेने केलेले अतिक्रमण ताबडतोब काढून घ्यावे अशी आपली सूचना आहे. २० मी.चा रस्ता टेप लावून, मोजून घ्या. ज्या जागा मालकाच्या जागेत अधिका-यांनी पाईपलाईन टाकली आहे, त्याच्यावर काय कारवाई करणार. तो तुमचा भाग आहे. पण जागा मालकावर अन्याय होता कामा नये ही माझी मागणी आहे.

**मा.झामाबाई बारणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मा.प्रशांत शितोळे यांनी प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून सर्वच वॉर्डांतला खरोखरच जिव्हाळयाचा प्रश्न उपस्थित केला आहे. आत्तापर्यंत अनेकांनी सांगितले कितीपट खर्च झाला. प्रत्येकाच्या वॉर्डमध्ये किती खर्च झाला? शिल्लक असेल तर बँकेमध्ये ठेवणार का? नागरीकांचे प्रश्न सोडवत नसालतर नगरसेवक म्हणून आमचे सभागृहात येण्याचे काही कारणच नाही. प्रत्येक गोष्टीसाठी कायद्यावर बोट ठेवत असला, त्यांच्या म्हणण्याप्रमाणे काम करत असालतर नागरीकांच्या तक्रारी नगरसेवकांपर्यंत यायला नाही पाहीजेत. सारथीमधून सगळ्या गोष्टी उपलब्ध करुन दिल्या आहेत. प्रश्न मार्गी लागला नाहीतर नगरसेवक पदाचा उपयोग काय आहे? अनेक नगरसेवकांची कामे थांबली आहेत. प्रत्येक वॉर्डातले बजेट खर्च झाले नाही. दोन महिन्यांनी आचारसंहिता लागेल तर कामे कुठली होणार आहेत. पुढील बजेटमधून काम करायचे असेल तर आत्ता माझ्या सहकारी भगिनींनी आयुक्तांना पत्र दिले होते. आयुक्त साहेबांनी त्यांना सांगितले तुम्ही सारथीवर तक्रार दया. नगरसेवकांनी सारथीवर तक्रार द्यायची असेल तर नगरसेवकांना इथे कशाला यायचे, कशाला सभागृहाचा वेळ घ्यायचा? ज्या किरकोळ गोष्टी आहेत त्या सारथीवर सांगायच्या. सारथीद्वारे आयुक्त साहेबांनी चांगली सुविधा उपलब्ध करुन दिली आहे त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करते. आजच पेपरमध्ये बातमी आली होती, आता अधिका-यांना विनवण्या करायला नको, नगरसेवकांचे उंबरे झिजवायला नको. चांगल्या कामाला चालना दिली आहे. रस्त्यांची दूरावस्था, कचरा गाड्यांची अवस्था पहा. माझ्या वॉर्डमध्ये चांगली सोसायटी आहे. तेथे कचरा ठेवण्यास सुरुवात केली आहे. कच-याच्या गाडया अडवून त्याठिकाणी कचरा टाकतात. येथे कचराडेपो झाला आहे. कच-याची विल्हेवाट कुठे लावायची ते सांगा. पावसाळयात डास, मच्छरांचा त्रास होत आहे. नगरसेवकांनी सांगितल्यावरही काम होत नाही. लोकांच्या घरांत पाणी जाते आहे. लोकांच्या आरोग्याला धोका आहे. तशा घाणीत मुलाबाळांना रहावे लागते. लोकांना जेवण जात नाही. अर्जंट काम होत नाही. मग आपला काय उपयोग आहे. श्रीमंत महापालिका म्हणून त्याठिकाणी कोणती कामे होतात. महापौर साहेब, नागरिकांचे प्रश्न सुटले पाहिजेत एवढीच माझी विनंती आहे.

**मा.धनंजय आल्हाट -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आत्ता चर्चा, विषयाच्या अनुषंगाने निर्णय झाला आहे, मा.प्रशांत शितोळे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून मागविलेली माहिती पाहून सर्वांत जास्त चिंता, सर्वांत जास्त परिणाम कशावर झाला आहे तर, ग्रामिण भागावर झाला आहे. एवढे मोठे बजेट पास करताना नवीन गावातील नगरसेवक खुष होतो. मी आयुक्तांना म्हणालो, तिथे १५ वर्षे झाली विकास झाला नाही. सभागृहामध्ये काम करीत असताना आयुक्तांनी आम्हाला याठिकाणी चांगल्या प्रकारचे भरीव असे बजेट देऊ असे सांगितले होते. त्यांनी सुद्धा दिले. प्रत्यक्षात काय झाले. सर्व नगरसेवकांनी याठिकाणी सांगितले, ९ महिने झालेतरी वर्कऑर्डर मिळत नाही. फक्त १५ टक्के काम झालेले आहे. ब-याच ठिकाणी शेरा मारला गेला, याची गरज नाही, रस्ता ताब्यात नाही, हा होणार नाही. म्हणजे बजेटमध्ये नवीन गावांसाठी प्रत्यक्षात बजेटला जी रक्कम दिली, त्यातील फक्त १५ टक्के कामे होणार आहेत. आयुक्तांनी जे स्वप्न दाखवले, विश्वास दाखवला त्याचा अर्थ म्हणजे राजा उदार झाला आणि भोपळा हाती दिला अशी अवस्था झाली आहे. आयुक्त साहेब डॅशिंग आहेत, सिंघम

आहेत. त्यांना नागरीकांबद्दल आपुलकी आहे. लोक त्यांच्यासाठी रस्त्यावर उतरतील. परंतू जसे वर्गात एखादा विद्यार्थी खूप हुशार असतो, पण मार्कस् मात्र ३५ टक्के पडतात अशी अवस्था झाली आहे. शहरात सगळे म्हणतात, आयुक्त साहेब चांगले आहेत. आमच्या ग्रामिण भागातली जनता न्याय मिळण्यासाठी आसुसलेली आहे. त्यांच्या पदरी निराशा आली आहे. महापौर साहेब आपण नगरसेवकांच्या प्रतिनिधी आहात, शहराच्या प्रथम नागरीक आहांत. महापौर साहेब आपण चांगल्याप्रकारे सभागृह चालवता. महापौर साहेब आपल्याला याठिकाणी कणखर भूमिका घ्यायला हवी. आपण रणरागिनी झाले पाहिजे. जिजामाता झाले पाहिजे, सावित्री झाले पाहिजे, दुर्गा झाले पाहिजे. झाशीची राणी झाले पाहिजे. पुढील बजेटमध्ये सुद्धा २० टक्के कात्री मिळणार आहे. आपले आयुक्त काय कारण देणार माहित आहे. एलबीटी, अमुकअमुक. चौकशी करु. महापौर साहेब आपली जबाबदारी अतिशय महत्वाची आहे. करुन घेतले पाहीजे. खडसावून सांगितले पाहीजे. आत्ता याठिकाणी अपेक्षाभंग पूर्णपणे झाला आहे. अतिशय वाईट अवस्था आहे. अजूनही कामे सुरु नाहीत. नवीन गावांना ५ वर्षांत न्याय मिळेल असे वाटत नाही. आमचे बजेट फेल होत चालले आहे. तुम्हाला ही जबाबदारी घ्यावी लागणार आहे. नवीन गावांसाठी येणारे बजेट अतिशय चांगले मिळेल असे वाटते. मी दुसरी सूचना करतो, राज्याचे बजेट आमच्या नगरसेवकांचे बजेट ठरू नये. प्रत्येक वेळी नगरसेवक बोलतात. मा.प्रशांत शितोळे यांनी अतिशय विदारक माहिती दिली आहे. महेश दादांनी तर रुद्रावतार घेतला. त्यांची एवढी तळमळ कशासाठी आहे हे सर्व सभागृहाने समजून घ्यावे. महापौर साहेब, आपली सत्ता आहे. आपले बहुमत आहे. आपल्याला अवघड वाटत असेल तर तसा ठराव ठेवा, मतदान करा. आपल्या हातात ताकद आहे. प्रत्येक वेळेस नगरसेवक बोलतात. त्यांना त्यांच्या प्रश्नांची उत्तरे मिळत नाहीत. प्रश्न सुटत नाहीत. त्यांच्या समस्या पुन्ही एकदा पुढील महापालिका सभेत मांडल्या जातात. येरे माझ्या मागल्या अशी अवस्था झाली आहे. इथे सर्व अधिकारी बसतात, एक्झिक्युटीव्ह बसतात. इथे व्हिडिओ रेकॉर्डींग आहे. त्या-त्या भागातले नगरसेवक ज्या समस्या मांडतात, त्यांच्या कामाचे नंतर काय झाले, नंतर झाले का, काय अडचणी आहेत, होणार आहे का, याचा खुलासा पत्राद्वारे त्या नगरसेवकाला मिळणे गरजेचे आहे. एकाही नगरसेवकाचा त्याने प्रश्न मांडला व खुलासा झाला असे झालेले नाही. आम्हाला काम नाही म्हणून आम्ही इथे येतो अशातला भाग नाही. काहीतरी आऊटपुट मिळाले पाहिजे. आपण आदेश द्या. प्रत्येक नगरसेवकाला त्याने विचारलेल्या प्रश्नांची लेखी उत्तरे दिली गेली पाहीजेत अशी सूचना करतो. महापौर साहेब, आपल्याला २/३ महिन्यांत कठोर भूमिका घ्यावी लागणार आहे. नाहीतर पुढील वर्षी सुद्धा आमच्या पदरी निराशा पडणार आहे. सगळ्यांच्या भावनांची दखल घ्यावी.

**मा.दत्ता साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मा.प्रशांत शितोळे यांचे प्रथम मनापासून अभिनंदन करेन. हा विरुद्ध विषय म्हणालातरी चालेल. सत्ता आमची आहे. बहुमत पण आहे. पण आम्हाला खेद वाटतो, सत्ताधारी असून सभागृहात बहूमत असताना या महापालिकेत बजेटच्या बाबतीत हा विषय सभागृहापुढे यावा हा खरेतर दुर्दैवाचा विषय आहे. खरेतर या पाठीमागचे कारण शोधले गेले पाहीजे. खरेतर अनधिकृत बांधकाम या माध्यमातून स्थापत्य विभागाचे जे अधिकारी असतील, त्यांना आयुक्तांनी कामाला लावले आहे. सध्या हे काम जलद

गतीने चालू आहे. त्यांचे महत्वाचे काम आहे. एकतर फौजदारी, त्याच्या पाठिमागे कोर्टाच्या तारखा अशी परिक्रमा त्या पाठिमागे लावल्यामुळे खरेतर बजेटची इतकी बोंबाबोंब चालू झाली आहे. माझ्या अ प्रभागामध्ये जवळपास १६९ कोटी टाकले होते. फक्त १७ कोटी खर्च झाले होते. अ प्रभागात जवळपास ४१३ कोटी बजेट शिल्लक आहे. मला प्रश्न विचारायचा आहे, या पाठिमागचे कारण काय? याचे उत्तर सभागृहाला दिलेतर सभागृहाचे समाधान होईल. दोन/तीन तास एकाच प्रश्नावर सभागृह चालू आहे. प्रत्येकाला हे बोलायचे असते. आम्ही ज्या भागातून निवडून येतो, आमची आशा अपेक्षा असते. नागरीकांच्या आमच्याकडून अपेक्षा असतात, नगरसेवकाकडून कुठेतरी चांगले काम व्हावे. तो भाग चांगला व्हावा. सुंदर व्हावा. आम्हाला निवडून देतात ते आवश्यक सोयी सुविधा नागरिकांना दयावेत. व त्याचा नागरिक टॅक्स भरतात. पैसे देत असतात. आपण त्यांना फुकट सुविधा देत नाही. त्यांच्यावर उपकार करत नाही. असे असताना बजेट राखून ठेवताय का, थांबवताय का याची शंका यायला लागली आहे. आमची कोणी सुपारी घेतली आहे की काय? मी परत निवडून येऊ नये अशी सुपारी कोणी घेतली आहे का? ही पाशवी सत्ता संपवायची असेलतर काम केले नाहीतर लोक आमचा विचार करणार, यांना पुन्हा कशाला निवडून द्यायचे, असे या निमित्ताने आम्हाला सांगावेसे वाटते. मा.धनंजय आल्हाट यांनी बोलल्याप्रमाणे ग्रामिण भागात सगळ्या नगरसेवकांना एकत्र घेऊन आयुक्त साहेब, महापौर साहेब, पक्षनेते, सर्व नेते असताना मिटींग झाली होती. त्यावेळी गोड गोड सांगितले. खरोखरच आम्हाला वाटले, माझा वॉर्ड आता अतिशय सुंदर होणार आहे. १९९७ पासून १५ वर्षे झालीतरी आजही काही भागांत ग्रामपंचायतीचे रस्ते आहेत. ड्रेनेज ग्रामपंचायतीच्या काळातले आहेत. कोणीही परिस्थिती सुधारु शकले नाहीत. या ५ वर्षांमध्ये शहरात कुठेतरी काम करुन शहरासारखे दाखवून देऊ. असे असताना हे बजेट नक्की का राखून ठेवले आहे. आपण आदेश द्यावा. दोन महिने राहिले आहेत. मा.प्रशांत शितोळे म्हणाले त्याप्रमाणे आज आयुक्त साहेब डायसवर पाहीजे होते, ते इथे नाहीत. आत्ता जे कोणी बोलत होते, आयुक्तांना थांबवा, ठेवा, जाऊ द्या. म्हणणा-यांना माझी विनंती आहे की, आम्ही आयुक्त साहेबांच्या चांगल्या कामाच्या पाठिशी आहोत, पाठिशी राहणार आहोत. नगरसेवक या नात्याने विरोध का करत आहेत, आमदार का विरोध करत आहेत. आत्ता मा.प्रशांत शितोळे यांनी प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून विषय मांडला आहे. माझी पत्रकारांना विनंती आहे की, हे जनतेसमोर आणावे. नगररचना खात्याला काम करायचेच नाही. ज्या-ज्यावेळी प्रभागात वॉर्डातले कामे करण्यास सांगितले तेंव्हा बजेट नाही असेच सांगितले जाते. आम्ही पाच-सात नगरसेवक मा.शहर अभियंता यांच्याकडे गेलो असताना आम्ही त्यांना जीव तोडून सांगितले. वॉर्ड क्र. १ ते ५ मधील सगळे नगरसेवक त्यांच्याकडे गेलो होतो तेव्हा त्यांनी आम्हाला आश्वासन दिले होते. त्यांना खासदारकी द्यायची का आमदारकी द्यायची, आश्वासने देतात. आम्ही सुद्धा टेंडर प्रोससला असलेल्या प्रत्येक फाईलचा सर्वे केला आहे. आयुक्तांच्या बदलीमुळे फाईलवर रिमार्क लावला जात होता, कामाची आवश्यकता आहे का? काम केले पाहीजे का? त्या माध्यमातून फाईल पाठिमागे आली. नंतर ३ ते ६ महिने फाईल गेली नाही. आम्ही या पदावर आहोत तोपर्यंत आम्ही आमच्या वॉर्डात सगळ्या सुविधा करु असे वाटत नाही. मा.धनंजय आल्हाट यांनी सांगितले होते, महापौर साहेब खरतर तुम्ही अवतार घेतला पाहिजे. तुम्ही खरेतर अधिकारांचा वापर करा. आम्ही चर्चा करतो, बोलतो पण धारेवर धरायचे, त्यांना आदेश देण्याचे काम तुमचे

आहे. ते तुम्ही करावे. प्रत्येक नगरसेवकांच्या भावनेचा विचार करा. १२८ नगरसेवकांचा हा खरेतर विषय आहे. या विषयाच्या माध्यमातून खरेतर हे बजेट राखून ठेवले आहे. याचे पहिले उत्तर द्यावे. किती दिवसांत बजेट खर्च होईल. फाईल पेंडींग आहेत. त्या माध्यमातून सगळ्याच वॉर्डांत बजेट शिल्लक आहे. जवळपास रु.४१ कोटी शिल्लक आहेत, ते २/५ दिवसांत खर्च करावेत अशी विनंती करतो. मा.महापौर साहेब, आपण आयुक्तांना आदेश दयावेत.

**मा.अजित गव्हाणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, इथे मा.प्रशांत शितोळे यांनी जे प्रश्न विचारले ते प्रत्येकाच्या मनातले आहेत. ते त्यांनी इथे मांडले आहेत. मागील २ वर्षांपासून महापालिकेमध्ये आपण नगरसेवक झाल्यानंतर खूप मोठया अपेक्षा घेऊन या ठिकाणी आलो आहे. नागरिकांच्या सुध्दा अपेक्षा आहेत. वॉर्डातली कामे व्हावीत या दृष्टीकोनातून सर्वांचाच प्रयत्न आहे. परंतू तुलनात्मकदृष्ट्या विचार केला तर मी १२ वर्षे झाली नगरसेवक आहे. मागील १० वर्षांत पिंपरी चिंचवडमध्ये खूप मोठ्या प्रमाणात काम झाले आहे. प्रशासनाने चांगल्या पध्दतीने काम केले. परंतू या दोन वर्षात महापालिकेत सांगितलेले कुठलेही काम होत नाही. मा.प्रशांत शितोळे यांनी विचारलेल्या प्रश्नांतील नेमके बजेट किती खर्च झाले? एवढे खर्च झाले. एवढी वर्कऑर्डर झाली. आयुक्त खरेतर इथे पाहिजे होते. निश्चितपणे त्यांचे सुद्धा लक्षात आले असते. आमच्या भावना काय आहेत? मागच्या दोन वर्षात आपल्या महापालिकेच्या अधिका-यांनी काय काम केले? विशेष म्हणजे स्थापत्य विभागाच्या अधिका-यांनी काय काम केले? अनधिकृत बांधकामाचे संदर्भात अनधिकृत बांधकामावर बैठका, मिटिंग, सभा, पोलीस कंप्लेट, अनधिकृत बांधकामावर कारवाई या सगळया दोन वर्षात स्थापत्य विभागाने काम केले. दोन वर्षांत कोणत्याही प्रकारची विकास कामे झालेली नाहीत. प्रशासनाच्या, सर्व पिंपरी चिंचवडच्या वैभवात भर टाकणारे एकही काम प्रशासनाकडून झाले नाही. या दोन वर्षात आयुक्तांच्या नेतृत्वाखाली कारभार चालला आहे. यामुळे ही परिस्थिती उद्भवली आहे. या दोन वर्षामध्ये महापालिकेत आयुक्त आले तेंव्हापासून आपल्या अधिका-यांनी महापालिकेचे काम झाले नाही तरी चालेल, पण चुकीचे काम करायचे नाही, अडचणीत यायचे नाही. अनेक अधिकारी व्हिआरएस घेत आहेत. या सगळयाचा विकास कामावर मोठ्या प्रमाणात परिणाम झाला आहे. महापौर साहेब राहिलेल्या दोन तीन महिन्यात बजेट संपविण्याचे दृष्टीने टेंडर निघाली आहेत. वर्कऑर्डर दिल्या आहेत. कमीत कमी ही कामेतरी ताबडतोब चालू करावीत. टेंडर्स लवकरात लवकर पब्लिश करावीत. किमान दोन/तीन महिन्यांत राहिलेला बॅकलॉग आपण भरून काढावा असे प्रयत्न करावेत. मा.दत्ता साने यांनी अपेक्षा व्यक्त केली, महापौर साहेब, आपण ठोस आक्रमकपणे या विषयावर बोलले पाहीजे. पिंपरी चिंचवड महापालिकेतील नागरीकांना जी विकास कामे अपेक्षित आहेत ती विकास कामे आपण करावीत. नुसते आस्थापनेवर बजेट खर्च होऊन चालणार नाही. परंतू शहरातील नागरिक करदाते आहेत. त्यांची विकास कामे करण्यासाठी आस्थापनेवर खर्च व्हावा पण भांडवली खर्च वाढवा. पुढच्या वर्षात बजेटचे काम चालू झाले आहे. आगामी एक वर्षात बजेटमध्ये बॅकलॉगचे काम करायचा प्रयत्न करावा. मा.प्रशांत शितोळे यांनी खूप चांगल्या पद्धतीने ऑर्ग्युमेंट केले आहे. त्यांचा वॉर्डात खूप चांगले काम करायचा प्रयत्न होता. त्यांच्या फाईलला खिळ बसली. जकात बंद झाल्यामुळे, एलबीटीचे उत्पन्न कमी झाल्यामुळे प्रत्यक्ष काम करणे शक्य नाही. प्रत्येक प्रभागातली तरतूद

कमी केलीतर उर्वरीत काम करायला काहीच हरकत नाही. नागरीकांच्या आमच्याकडून अपेक्षा आहेत. त्या पूर्ण होतील या दृष्टीकोणातून आपण हे करावे अशी विनंती करतो.

**मा.श्रीरंग बारणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, गेली दोन तास चर्चा चालू आहे. प्रश्न उपस्थित केलेबद्दल खरे तर सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य मा.प्रशांत शितोळे यांचे अभिनंदन करतो. प्रामुख्याने सभागृहातील ज्येष्ठ सदस्य मा.आर.एस.कुमार यांच्या एका प्रश्नाकडे, एका गोष्टीकडे लक्ष वेधू इच्छितो. त्यांनी त्यांच्या भाषणात सांगितल्याप्रमाणे यांची छाप प्रशासनावर पडलेली नाही. ते स्वतः म्हणाले आमचा पक्ष आप आहे. गेले दोन तास यासंदर्भात चर्चा झाली आहे. त्या चर्चेत एक सदस्य मा.धनंजय आल्हाट विरोधी पक्षात असतील, सत्तेतील असणारे सदस्य यांनी सुद्धा चर्चा केली. प्रशांत शितोळे यांनी विचारलेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने जवळपास २२ ते २३ टक्के खर्च प्रशासनाकडून झाला आहे. मार्चची बिले पाहिली, त्याची चढाओढ पाहीलीतर हा खर्च जवळपास ९० टक्यांवर जाणार आहे. विषय १के खाली दाखल केला तरी त्याचा खर्च ३०० कोटींवर व उपसूचना १०० कोटींवर जाणार आहे. या सभागृहाने मंजूरी दिली असताना कोटींच्या उड्डाणपूलाच्या उपसूचना घेतो. कोटयावधी रुपयांचे काम काढतो. परंतू सामान्य सदस्यांच्या वॉर्डातील छोटी छोटी कामे, मुलभूत गरजा, आरोग्य, पाणी, प्राथमिक शिक्षण याकडे मात्र आयुक्तांचे दूर्लक्ष झाले आहे. हे या सभागृहाचे दुर्भाग्य आहे. मला वाटत नाही, जे आयुक्त रजेवर जातात ते परत येतील. पुन्हा सहा महिन्यांनी नवीन आयुक्त मिळवणार. आयुक्तांनी गेली दोन वर्ष जवळपास मिटींगमध्ये वेळ घालवला आहे. केवळ सर्वसामान्य माणसाच्या जीवावर वेळ घालवायचा आणि सरकारकडे बोट दाखवायचे काम आयुक्तांनी केले आहे. हा दोन तास वेळ वाया जात असताना, चर्चा होत असताना या सभागृहात अनेक जबाबदार अधिकारी उपस्थित आहेत. ब-याच सदस्यांनी सांगितलेली कामे होत नाहीत. वॉर्डातली कामे होत नाहीत. रोज उठून तिथे नागरीक येतात. गटरचे काम असेल, आरोग्यचे काम असेल, सदस्यांनी सूचवलेली कामे असतील ती ऐकून घ्यायची. एखादी निविदा प्रक्रिया होत असताना विशिष्ट रकमेची असलीतरी ते काम संपत होते. आता एकंदरच अधिकारी सांगतो, काम करायचे नाही. या बजेटच्या पुढे जाता कामा नये. मग ते काम अर्धवट राहते. त्याप्रमाणे सदस्यांना सातत्याने पाठपुरावा करावा लागतो. आयुक्त म्हणतात बजेटमध्ये तरतूद नाही. परत निविदा नाही, परत फेरनिविदा असेच गेली दोन वर्षे चालू आहे. या सगळ्या प्रक्रिया चालू असताना महापालिकेत आयुक्तांना पूर्वाभास झालेला नाही. आयुक्त सांगतात, बातमी लावा नंतर दुस-या दिवशी आदेश काढा. आयुक्तांना प्रामुख्याने प्रसिध्दीचा मोह असल्यामुळे स्वतःची प्रसिद्धी करण्यात वेगळा वेळ घालवला आहे. आरोग्य, पाणीपुरवठा असेल, खर्चाला कात्री लावली असेल तर निश्चितपणे चुकीचे काम होत असताना त्यांनी थांबवले त्याबद्दल त्यांचे सभागृहात अभिनंदन सुध्दा केले आहे. त्यांना उपमा देखील दिली आहे. केवळ उपमा देऊन चालणार नाही. सर्वसामान्य माणूस महापालिकेच्या तिजोरीत कररुपाने पैसे भरतो. त्यांना सुविधा देण्यात आपण कमी पडतो आहोत हे सगळ्या चर्चेवरुन निष्पन्न होते आहे. कोटयावधी रुपयांचे काम काढतो. बीआरटी मार्गाची कामे करतो, प्रोजेक्ट करतो. याचे नागरिकांना देणेघेणे नाही. पाणी मिळत नाही. आरोग्याच्या समस्या आहेत. सदस्यांनी सांगितले, कुत्र्यांचे उदाहरण दिले. फोन केल्यानंतर दोन दोन दिवस कुत्री पकडायला येत नाहीत. प्राथमिक सुविधा पुरविल्या जात नाहीत.

कोट्यावधींच्या उड्डाणांमुळे महापालिकेचा विकास बाहेरून जरी दिसला तरी आतमध्ये नागरीकांच्या समस्या तशाच आहेत. सारथी करा नाहीतर महारथी करा, शेवटी नागरीक हाच केंद्रबिंदू आहे. त्याला मात्र आपण दूर्लक्षित करतो. दोन तासांच्या चर्चेतून हेच निष्पन्न झाले आहे. मा.आयुक्त साहेब ही चर्चा निष्फळ ठरु नये. मा.प्रशांत शितोळे यांनी अतिशय चांगल्या प्रकारचे प्रश्न विचारले आहेत. यातून महापालिका प्रशासनाला पूर्वाभास झाला आहे. महेश दादा इथे बोलत असताना त्यांनी प्रशासनाला अनेक उपमा दिल्या. याआधी अनेक वेळा सभागृहात पोटतिडकीने प्रश्न मांडले आहेत. ही वस्तुस्थिती अधिका-यांना दोष देत नाही. अधिकारी नोकरी वाचवायचे काम करतात. नोकरी करायचे काम करत नाहीत. महापालिकेचे अधिकारी आयुक्तांच्या दबावाखाली काम करतात. म्हणून आपल्या पक्षाची सत्ता या महापालिकेत आहे. पक्षाची सत्ता असताना देखील, आयुक्तांच्या नावाने सगळा प्रकार होत असताना, आयुक्त साहेब गेल्यात जमा आहेत. त्यांची बदली झाल्यात जमा आहे. पहिल्या महिन्यात महापौर साहेब, तुमच्या कार्यालयात मिटींग झाली होती. त्यावेळी या महापालिकेत हे आयुक्त फायदेशीर नाही. कामे करा सांगणारे नाही. ते महापालिकेचे काम करणार नाही. हे मी सांगितले होते. जो आयुक्त मिडीयाला आदल्यादिवशी बातमी देऊन काम करतो. मा.आशिष शर्मासारखे अधिकारी या महापालिकेत काम करत होते. ते कधीही मिडीयापुढे जात नव्हते. यांनी काम कमी केले पण प्रसिध्दी जास्त केली. आज जे झाले त्यावर बोलण्यापेक्षा प्रश्नाच्या अनुषंगाने चर्चा झाली. त्या चर्चेवर आपण काय करणार आहे. मा.महापौर साहेब आपण प्रशासनाला आदेश दयावा छोटी छोटी कामे आहेत, छोटया तक्रारी आहेत, विकास कामे, पाण्याच्या अनेक तक्रारीकडे अधिका-यांनी लक्ष दयावे. अशाप्रकारचे तुम्ही आदेश दयावेत. एवढेच मी याठिकाणी सांगतो आणि थांबतो.

**मा.भाऊसाहेब भोईर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, या सभागृहात गेले दोन तास चर्चा चालू आहे. परंतू या सर्व चर्चेतून खरेतर विरोधी पक्षनेते यांनी १० दिवसांपूर्वी सर्व माहिती घेतली होती. संपूर्ण विदारक माहिती समोर आली आहे. जवळजवळ दोन तास चर्चा केल्यानंतर सत्य बाहेर आलेले आहे. परंतू या सभागृहात अशाप्रकारच्या चर्चा व अशाप्रकारच्या घटना अनेकवेळा घडलेल्या आहेत. प्रत्येकवेळी सभागृहात सदस्यांना त्यांच्या भावना व्यक्त करायचा अधिकार असल्यामुळे त्यांनी भावना व्यक्त केल्या आहेत. परंतू आजपर्यंत आक्रमकपणे चर्चा घडल्यानंतरही प्रशासनाने फार मोठा काटेकोर बदल केला असे घडलेले नाही. या गोष्टीवर खेद व्यक्त करत बसण्यापेक्षा, विचार मांडत बसण्यापेक्षा प्रत्येक वर्षी बजेटच्या वेळी मी सांगत असतो, महापौर साहेब एक समग्र समिती करावी. त्यात सर्व पक्षांतील गटनेते असावेत. मला वाटत नाही, ३० टक्के तरी कामे निघतील. असा कोणताही सभागृहातील मोठ्या चर्चेने मोठी जबरदस्त घटना घडेल, फार मोठी इतिहासात नोंद होईल असे समजण्याचे कारण नाही. म्हणून ही चर्चा व्यर्थ, वाया आहे. तुम्हीही याचे साक्षीदार असल्यामुळे तुम्हीही त्या चर्चेत होता. हे करायचेच असेलतर महापौर साहेब तुम्ही तुमचा अधिकार वापरा. सर्वांच्या भावना इथे व्यक्त झाल्या. इथे सर्वांची भाषणे झाली. खरेतर प्रशासनाला आव्हान द्यायचे असेल तर आजची सभा तहकूब करा. प्रशासनाचा निषेध करा. सगळ्यांचे हेच मत आहे. तर यापासून का पळून जायचे. आमचे रोड, गल्लीबोळ घ्या. तुम्ही कोटी कोटींचे पूल करता. विकासाची २० टक्केच कामे होत

असतील तर ही लाजीरवाणी घटना आहे. सभागृहात विचारांची तीव्रता आहे, जो उद्रेक आला तो व्यक्त करायचे साधन किंवा माध्यम तुम्ही आहात. तुम्ही सर्वपक्षीय कार्यकर्ता असलात तरी तुम्ही तुमचा ठोसा दाखवा. त्यांना काहीतरी आव्हान द्या. कारण यांच्यावर परिणाम होणार नाही. सभा संपल्यानंतर काही केले नाहीतर यांना पनिशमेंट द्या. आयुक्त कोण हे त्यांच्या कामातून सिद्ध होत असते. आपण कोणत्या पद्धतीने कारभार करतो हे तुम्ही सांगत असता. बाहेर वातावरण वेगळे आहे. माझी द्यायची खूप इच्छा असली तरी जे प्रोसिडींगमध्ये येतील, याची नोंद होईल, तेवढाच आम्हाला आनंद असेल या पलिकडे काही होणार नाही. म्हणून महापौर साहेब, तुम्ही काही तरी भूमिका घ्या. तुम्ही ठोस निर्णय घ्या. अशी माझी मागणी आहे.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आताच भाऊसाहेब भोईर जे बोलले त्यांचे मताशी मी सहमत आहे. तुम्ही कधी तुटक भुमिकेला जात नाही. मी तुम्हा विनंती करेल की, पुढील महिन्यात आचारसंहिता लागणार आहे. आज आपल्यासमोर जवळजवळ सगळे विषय सगळयांनी बोलले आहेत. सभागृहात बोललेल्या सगळया गोष्टींशी मी सहमत आहे. आताच मा.आप्पा बारणे यांनी सांगितले,गेल्या दोन वर्षांत कमिशनर यांनी सारथीचा बोर्ड लावला त्याचे बील साडेतीन लाख आहे. एवढे पैसे लागतात का हा सर्वसाधारण प्रश्न आहे. साडेतीन लाख इतके पैसे लागू शकत नाहीत. स्पॉन्सरशिप आहे का. त्याच्यापुढे कोणाचेच नाव नव्हते. कोणाला कमी रेटमध्ये दिले गेले का. याचा अर्थ पर्सनल लेवलवर काही गोष्टी केल्या गेल्यात. आम्ही निवडून आलो त्यावेळी आम्ही सांगितले की शहरातील विकास झाला पाहिजे. शहरातील अनेक स्तरावरील प्रश्न आहेत. त्या दृष्टीकोनातून प्रश्नांचा विचार केला पाहिजे. कामे कधी होणार जी.बी.मध्ये होणार की नाही असे आहे. कारण आचारसंहिता लागल्यावर सर्वांच्या वॉर्डातील कामे होणार नाही. तुमच्या मताशी मी सहमत आहे. आजच्या जी.बी.मध्ये आपण एकी करणार आहेत. असा जर समजूतदारपणा असेल, तुम्ही जर समजूतदारपणाने सभागृहात सर्व एक होणार असाल तर चांगली गोष्ट आहे. तर महापौर साहेब विषयाला सुरुवात करावी.

**मा.भाऊसाहेब भोईर -** मा.महापौर साहेब, मी माझी मागणी मागे घेतो.

**मा.महापौर –** आत्ता मा.प्रशांत शितोळे यांनी प्रश्न विचारले. त्या प्रश्नांतून प्रत्येकाची इच्छा आहे, मी काहीतरी सांगावे. मागील वर्षी आयुक्त साहेबांना सांगितले होते, सगळ्या वॉर्डांत बजेट खर्च व्हायला पाहीजे. विकास कामे चांगल्या पद्धतीने व्हायला पाहीजेत. मी तसा आदेश मागील आठवड्यात आयुक्तांना दिला होता. टेंडर निघाली. आयुक्त साहेबांनी वर्क ऑर्डर कॅन्सल केल्या होत्या. मा.मंदाताई ठाकरे व मा.सुमन नेटके ताई माझ्याकडे आल्या होत्या. त्यावेळी आम्ही आयुक्तांना सांगितले होते, तसे करु नका. प्रत्येक नगरसेवकाला बोलवा. प्रत्येकाचे प्रश्न मार्गी लावा. बजेट खर्च करा. असा आदेश दिला होता. तुम्ही म्हणताय म्हणून आयुक्त साहेबांना व प्रशासनाला पुन्हा आदेश देते की, प्रशासनाने नगरसेवकांच्या वॉर्डांत जे काही प्रश्न आहेत, ते संपूर्ण मार्गी लावावेत असा आदेश देते.

**मा.उल्हास शेट्टी-** मा.महापौर साहेब,मला पुढच्या मिटिंगमध्ये बोलायला संधी दया. आचारसंहितेच्या काळात प्रश्नोत्तरे घेतली तरी चालतात. आयुक्त साहेब सुद्धा नाहीत.

**मा.महापौर –** मा.उल्हास शेट्टी यांची प्रश्नोत्तरे पुढील मिटींगमध्ये घेण्यात येतील.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, आज याठिकाणी बीआरटी कॉरिडॉरमध्ये विचारलेल्या प्रश्नांसंदर्भात प्रशासनाने उत्तर देताना खरेतर सभागृहात आल्यानंतर प्रश्नांची उत्तरे मिळाली आहेत. त्यामुळे वाचूनच सांगावे लागणार आहे. मा.महापौर साहेब, माझा प्रश्न क्र. १ होता की, बीआरटी कॉरिडॉरमध्ये विकसन करताना युटीएफ फंड यामध्ये दिनांक ३/३/२०१० पासून दिनांक ३/१/२०१४ पर्यंत महापालिकेच्या अंदाजपत्रकानुसार एकूण किती रक्कम जमा होणे अपेक्षित होते. व प्रत्यक्षात एकूण किती रक्कम जमा झाली? अपेक्षित व जमा रक्कमेचा तपशिल वर्ष व लेखाशिर्ष दोन्ही असेल तर दया. मुळात आज संबंधित विभागाकडून शनिवारी जी.बी.संपली तरी यांचे उत्तर तयार झाले नव्हते. आज सभागृहामध्ये दुपारी १.०० वाजेपर्यंत नगररचना विभागात उत्तर तयार नव्हते. त्यामुळे त्यांनी दिलेले उत्तर किती खरे व किती खोटे. किंवा आकडा बदलता येत नाही याची कुठलीही गॅरंटी नाही. हे जे आकडे आहेत, ते बांधकाम परवानगी विभागाचे आहेत. एकूण बांधकाम परवानग्या दिलेल्या आहेत त्यामध्ये बांधकाम परवानगीचे २०१० मध्ये एका महिन्याच्या आतमध्ये फक्त पाच बांधकामांना परवानगी दिली आहे. २०१० ते २०११ ला ४६ बांधकामाला परवानगी दिली आहे. २०११ ते २०१२ ला ६३ बांधकामाला परवानगी दिली आहे. २०१२ ते २०१३ ला ८५ बांधकामाला परवानगी दिली आहे. व २०१३ ते २०१४ मध्ये १४३ बांधकामाला परवानगी दिली आहे. मा.महापौर साहेब बीआरटी कॉरिडॉरमध्ये लोक बांधकामाला परवानगी घेत नाहीत, परवडत नाही अशी अनेक कारणे देऊन आपण या ठिकाणी कलम ३७ची प्रक्रिया राबवतोय. परंतू याठिकाणी भ्रष्ट राजकारणी व प्रशासन यांची हातमिळवणी कशी होते ते बघा. त्यांनीच दिलेली आकडेवारी आहे, त्यामध्ये आत्तापर्यंत ३४२ लोकांनी बांधकाम परवानग्या घेतल्या असतील मग लोक प्रतिसाद देत नाहीत असे तुम्ही कसे म्हणू शकता. मग प्रिमियम कमी करायचा विषय सभागृहापुढे कसा आणू शकतो. मा.महापौर साहेब डि.पी. व डि.पी.त बीआरटी कॉरिडॉरचे वर्ष २०१० पासून आजपर्यंत १६९.९९ कोटी अपेक्षित होते. जमा किती १४३.४ कोटी, अपेक्षित धरले त्यापेक्षा २६,००,९५,०००/- एवढे कमी मिळाले आहेत. अजून ३ महिने बाकी आहेत. ही तूट भरुन निघू शकते. एकिकडे बीआरटी कॉरिडॉरमध्ये बांधकाम परवानगी देता येत नाही असे सांगता. दुसरीकडे महापालिकेचे उत्पन्न मिळवण्याचे काम प्रशासनाकडून झाले आहे. वर्ष २०१३-१४ मध्ये बांधकाम परवानगी विभागाकडून अपेक्षित उत्पन्न रु.१५,००,००,२५६ धरले होते. आत्तापर्यंत साडे चौदा कोटी जमा झाले आहेत. जवळपास रु.२८,००,०००/- जमा होणे बाकी आहेत. अजून ३ महिने बाकी आहेत. त्यामुळे ते सहजपणे जमा होऊ शकतात. मी स्पष्ट सांगते, आपण ३७ची कारवाई करतोय. त्यात बीआरटी कॉरिडॉरमध्ये प्रिमियम कमी करण्याचा विषय आला आहे. कलम ३७ मध्ये तशी माहिती घेतली असता खोटी माहिती दिली असती, परंतू सभागृहात विचारल्यामुळे मोठ्या प्रमाणात का होईना खरे बोलावे लागले. बीआरटी कॉरिडॉरमध्ये आजपर्यंत ४०.९२ कोटी अपेक्षित होते. आजपर्यंत जमा उत्पन्न ३३.६१ कोटी रुपये आहे. जवळपास साडेसात कोटी जमवण्यासाठी अजून तीन महिने बाकी आहेत. तसेच

उपसंचालक भदाणे मॅडम यांनी वाढीव हद्दीचा रेट कमी केला नसतातर मागील वेळी दि.१४/२/२०१२ला मी एक पत्र दिले होते. काही ठराविक बिल्डरकडून टीडीआर कमी घेतला होता. झोनचा वाद निर्माण केला होता. म्हणून रु.३,७१,००,०००/- इतकी तूट आली होती. मला असे वाटते, त्यांनी हद्दीचा वाद निर्माण केला नसतातर आज जे उद्दीष्ट ठरले होते ते पूर्ण झाले असते. आजही रु.३,७१,००,०००/- चे काय केले, व्यवस्था केली का नाही हे मला कळवलेले नाही. बांधकाम क्षेत्रात असतानाही आपला उद्देश्य साध्य होतो आहे का. आपण कशी काय सदरची कारवाई कोणता नियम टाकून प्रस्तावित केली आहे. महापौर साहेब, याठिकाणी वाढीव हद्दीचा वेगळा दर आकारला जातो आहे. हे या चार्टमध्ये दिले गेले नाही. हेतूपुरस्सर दिले गेले नाही असेच म्हणावे लागेल. जवळपास १ तारखेला प्रश्नावली दिली होती. आपण तो ९ तारखेला स्विकारला. त्या दिवसापासून आजपर्यंत यांनी माहिती जमा केली नव्हती किंवा दिली नव्हती. वाढीव हद्दीचा जो विषय आहे, जे दर आहेत ते याठिकाणी जाणूनबुजून दिलेले नाहीत. खरेतर मला त्यांच्या कार्यक्षमतेवर शंका आहे. डीडीटीपी यांना एकतर दर द्यायचे नव्हते किंवा मुद्दाम टाळायचे होते. काय रेट करतो ते माहित नसावे. हा खरेतर सदस्याचा अपमान आहे. नगरसदस्याने प्रश्न विचारले त्याची अपेक्षित उत्तरे न देणे हा सन्मा. सभागृहाचा व त्या सदस्यांचा अपमान आहे. इतका बेडरपणा व निलाजरेपणा फक्त प्रशासनच करु शकते. कारण त्यांना माहित आहे की, काही लोक पाठिराखे आहेत. वेळ निभावून घेतील. सांभाळून घेतील म्हणून सदस्याने प्रश्न विचारल्यानंतर सुद्धा उत्तरे अपूरी देणे, चुकीची देणे, इतका बिनधास्तपणा करु शकतात. याठिकाणी सन २०१०-११ चे आकडे आले होते. दि.३/३/२०१० पासून दि.३१/३/२०११ पर्यंतचे जे आकडे कंम्प्यूटरवरुन मिळाले आहेत, ते का मिळाले आहेत. त्याचे कारण आहे, नियम होऊन साधारण महिना झाला होता. त्यात उपसूचना घुसडल्या होत्या. त्याच्या मागचे रामायण संपूर्ण शहराला माहित आहे. अवघ्या ३ महिन्यांत उपसूचना देऊन प्रिमियम कमी करायचा घाट घातला होता. उपसूचना देऊन विषय करायचा जो घाट घातला होता तो मी मा.उच्च न्यायालयात जाऊन हाणून पाडला आहे. २०१२ चा कोर्टाचा निकाल आला त्यावेळी आकडे किती जलद गतीने वाढले आहेत. एकिकडे आपण बजेटवर चर्चा करत असतो. एलबीटीत आलेली तूट खरेतर याठिकाणी डॉ.माने साहेब बसले आहेत, त्यांनी सांगायला पाहीजे होते. सभागृहात कोणत्या उपसूचना आल्या आहेत. एलबीटी कशी कमी येते आहे. उत्पन्न कसे कमी झाले. शून्य जाणीव असणा-यांना पाठिशी घालायचे, उत्पन्न कमी झाले म्हणून ओरड करायची आणि त्याचा आधार घेऊन प्रशासनाने वॉर्डातली कामे थांबवायची म्हणजे डबल ढोलकी. उपसूचना कशा आल्यात ते सांगावे म्हणजे दूध का दूध व पानी का पानी होईल. एकिकडे म्हणायचे नवीन मिळकतीचे सर्वेक्षण चालू आहे. शास्तीकर लावतोय. पाणीपट्टी वाढवतोय. आर्थिक स्त्रोत शोधतोय. दुसरीकडे मात्र काही लोक सभागृहाचा गैरवापर करत आहेत. त्याचा गैरवापर करुन महापालिकेचे उत्पन्न कमी करु पाहत आहेत. बीआरटी कॉरीडॉरमध्ये बांधकाम परवानग्या घ्यायला कोणी येत नाही. नाहीत? प्रिमियम जास्त आहे अशा अनेक वल्गना झाल्या आहेत. ही आकडेवारी पाहिलीतर सगळ्यांचे दात घशात गेले आहेत. आज जी अवस्था आहे व जमा झालेली रक्कम यात फारसा फरक नाही. याठिकाणी काही आकडे सांगते. बीआरटी कॉरीडॉरमध्ये एकंदरीत प्रशमन शुल्क , इमारतींचे परवाने शुल्क हे दर खालीलप्रमाणे आहेत. यात बजेट करताना दुसरी दुरुस्ती सांगितली होती. महापालिकेचे

प्रशमन शुल्क बांधकाम परवानगी घेऊन बांधकाम करत असताना व्यावसायिकाने मंजूर केलेल्या एफएसआयमध्ये येत नसेलतरी त्याचे वेगळे हेड केले पाहीजे. तर त्याची सत्य स्थिती बाहेर येईल. विकास शुल्क, प्रशमन शुल्क हे एकाच हेडखाली जमा करतो. त्यामुळे कुठे किती रक्कम जमा झाली ते कळून येत नाही. दि.३/३/२०१० पासून दि.२/३/२०१११ या कालावधीत रु.२,०६,३४,०००/- बांधकाम परवानगीचे जमा झाले होते. दि. १/४/२०१० ते ३१/३/२०११ मध्ये रु.११,३५,७७,०००/- रुपये जमा झाले. दि.१/४/२०११ ते दि.३१/३/२०१२ मध्ये टार्गेट होते रु.१९,७०,००,०००/-, जमा झाले रु.२०,६१,२६,०००/-ची बांधकाम परवानगी घेतली. दि.१/४/२०१२ ते दि.३१/३/२०१३ मध्ये उद्दीष्ट होते – रु.४०,०९,७९,०००/- जमा झाले रु.३२ ,६६,४७,०००/-. दि.१/४/२०१३ ते ३१/३/२०१४ मध्ये उद्दीष्ट होते रु.५९,२७,९०,०००/-, आज जमा झाले रु.४२,७३,६०,०००/- म्हणजे बांधकाम परवानग्या विकासक घेत आहेत. ज्या ज्या बीआरटी कॉरीडॉरमध्ये बिल्डींग परमिशन दिली, एफएसआय दिला, टिडीआर खर्ची टाकला. हे सगळे करत असताना रस्त्यांची अवस्था कधी पाहीली आहे का. रस्त्यांची दूरावस्था झाली आहे. याकडे कोणाचेच लक्ष आहे का. याकडे कोणाचे लक्ष नाही. फक्त आणि फक्त डबल एफएसआय मिळतो म्हणून बीआरटी कॉरीडॉरचा वापर करतो, यामध्ये आपण या नियमाचा वापर करतो. मी तुम्हाला एवढेच सांगेल. आपण जेव्हा जेव्हा मा.उल्हास शेट्टी यांचे प्रश्न घेणार आहोत, त्यावेळी नगररचना विभागाने यांच्याकडे अपूर्ण उत्तरे दिली आहेत. वाढीव हद्दीचे रेट आकारले जातात याची माहिती दिलेली नाही. त्याठिकाणी झालेला फ्रॉड, त्यात रु.३,७१,००,०००/- वसूल केलेले नाहीत. ए, बी, सी असे तीन प्रकारचे झोन आपण केले होते. डी झोनचा प्रस्ताव शासनाकडे कधीच पाठवणार नव्हतो. तरीसुद्धा डीडीटीपी यांना या प्रकरणात प्रश्न पडला होता. १२०० घ्यायचे का ९०० घ्यायचे. १२,००० चौ.मी. घ्यायचे का ९,००० चौ.मी. घ्यायचे. अत्यंत भ्रष्टपणे काम केले आहे. तीन कोटी उत्पन्न कमी आले. शासनाकडे पत्र पाठवले आहे. गेले १ वर्ष झालेतरी हे पत्र शासन दरबारी पडले आहे. यावर शासनाकडून उत्तर दिले नसताना रु.३,७१,००,०००/- त्या बिलात पडून आहेत. ते भरलेले नाहीत. हेतूपूरस्सर कमी करुन दिलेले रेट आहेत. ही रक्कम त्यांच्या पगारातून वसूल केली पाहीजे. शासन वर्ष वर्ष पत्राचे उत्तर देत नसेल, यातून नियम काढून, पळवाट काढणार असू तर अशा अधिका-यावर कारवाई सुद्धा झाली पाहीजे.

**मा.अजित गव्हाणे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, या ठिकाणी मा.सिमा सावळे व मा.उल्हास शेट्टी यांनी बीआरटी संदर्भात जे प्रश्न विचारले होते. यातून एक चांगला खुलासा सभागृहापुढे निश्चितपणे आला आहे. अपेक्षित उत्पन्न या बीआरटीच्या माध्यमातून मिळालेले दिसते आहे. महापौर साहेब त्याचाही खुलासा मिळाला पाहिजे. नगररचना किंवा बांधकाम परवानगी विभागाकडून जे काही आर्थिक उत्पन्न अपेक्षित धरले आहे त्याचे बायफरकेशन, बांधकाम परवानगी विभागाकडून किती बांधकामाची परवानगी घेतली आहे किंवा घेत आहेत, टिडीआर व इतर शुल्क भरले गेले आहेत, ज्या काही बांधकाम परवानगी दिल्या गेल्या आहेत, एक एफएसआय एक्स्ट्रा मिळतो आहे त्याचा बेनेफिट घेऊन या परवानग्या दिल्या गेल्या आहेत का, अरेंजमेंट एफएसआय घेऊन दिली गेली आहे का याचा खुलासा प्रशासनाकडून करण्यात यावा. सुरुवातीला बीआरटीचा विषय सभागृहात मंजूर केला त्यावेळी घाईघाईने विषय

मंजूर केला नंतर त्यात खूप त्रुटी राहील्या. दोन सदस्यांनी हा विषय मांडल्यानंतर या विषयाचे ज्ञान सर्वांना व्हावे. पिंपरी चिंचवड शहरात नेमके बीआरटी कॉरीडॉर किती आहेत, किती उत्पन्न अपेक्षित आहे याचा खुलासा प्रशासनाने नक्की द्यावा. पुढील काळात यातून नक्की चांगला मार्ग निघेल हा विषय व्हावा या गोष्टीसाठी काही प्रत्यक्ष राहून गेले आहे. आपल्या सगळ्या सभागृहाला या बीआरटीचे ज्ञान दयावे. महापौर साहेब त्याचा खुलासा सभागृहाला सांगावा. पुढच्या काळात उपयोग होईल.

**मा.महापौर** – संबंधित अधिका-यांनी खुलासा करावा.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, बीआरटी कॉरीडॉर, बिल्डींग परमिशन मधून अपेक्षित उत्पन्न, झालेली डेव्हलपमेंट या अनुषंगाने हा प्रश्न याठिकाणी सभागृहासमोर आला आहे. वास्तविक पाहता आकडेवारी आली आहे. मा.आशिष शर्मा आयुक्त असताना बीआरटी कॉरिडॉर ही कन्सेप्ट राबवायची ठरले होते. त्यामागील हेतू खरोखर साध्य झाला नाही. बीआरटी कॉरिडॉरसाठी लागणारी ट्रॅफीक लेन, तिथे असणारी युटीलिटी, अधिक डेव्हलपमेंट व्हावी म्हणून यासाठी हा प्रयत्न होता. हे करत असताना ए,बी,सी व डी असे झोनिंग केले. प्रिमियम टाकला गेला त्यासाठी, पार्कींगसाठी अटी आल्या त्याचा एरिया, सेट बॅकचा प्रश्न होता. तो ९ मी. एवढ्यासाठी ठेवला होता की, जेव्हा वाहन पार्क करतो, तसे न करता नंतरच्या काळात २५ टक्के पार्किंग आरक्षित करावे. महापालिकेने हे विनामोबदला द्यावे अशी जाचक अट त्यात आली होती. वास्तविक पाहता कोणतीही सोसायटी किंवा प्रिमायसेस अशा प्रकारे अनसिक्युअर होतील. प्लॅन बसत नव्हता. कोणताही बिल्डर, कोणतीही सोसायटी अशा प्रकारे पार्किंग देण्यासाठी तयार नव्हते. म्हणून त्यात दुरुस्ती व्हावी. सेट बॅक मध्ये, फ्रंट मार्जिनमध्ये, प्रिमियममध्ये दुरुस्ती व्हावी म्हणून हा विषय सभागृहासमोर आणला. ही आकडेवारी पिंपरी चिंचवड शहरात अधिक बांधकामे होत असताना मा.अजित गव्हाणे यांनी खुलासा केला. नेमक्या कोणत्या झोनमध्ये अधिक परवानग्या मिळाल्या असत्यातर ही डेव्हलपमेंट झाली. या फिगर दिसतात त्या आपल्याला दिसतात. पहिल्या वर्षी ५ बांधकाम परवानग्या दिल्या गेल्या. नंतर पुढील वर्षी ४६, नंतर ६३, त्यानंतर २०१३-१४ मध्ये १४३ बांधकाम परवानग्या दिल्या गेल्याचे दिसून येते. यामध्ये कोणकोणत्या गोष्टींचा अंतर्भाव केला गेला आहे. सिंगला एफएसआय कन्झम्प्शनमध्ये आहे का. त्याची त्याला गरज नाही. टीडीआर वापरला असलातरी त्याला नवीन नियम लागू आहेत का. हे प्रिमियम जाचक आहे म्हणून आपण ३७ चे मॉडिफिकेशन करु. अशाप्रकारे आर्थिक बाबींत कलम ३७ चे मॉडिफिकेशन करायचा अधिकार महापालिकेला आहे, महासभेला आहे. त्या अधिकारांतर्गत अधिकार राबविला आहे म्हणून अपेक्षित डेव्हलपमेंट व्हायला पाहीजे होती ती झालेली नाही. दुसरी गोष्ट, हा प्रश्न विचारात घेत असताना त्याअनुषंगाने बीआरटीवर खर्च करतोय. त्याची युटीलिटी पाहीली आहे का. आज आपण बीआरटी कशीतरी राबवित असताना प्रायोगिक तत्वावर चालू केली पाहीजे. नेमकी रिस्पॉन्स कसा येतो आहे. एक गोष्ट लक्षात ठेवली पाहीजे, या पिंपरी चिंचवड शहरात ऑटोमोबाईल इंडस्ट्रीजचा मोठा भाग आहे. पुणे जिल्ह्यात सर्वात जास्त वाहने पुण्यात रजिस्टर्ड झाली आहेत. त्यात दुचाकींची संख्या अधिक आहे. पिंपरी चिंचवड शहरात दुचाकी वाहनांच्या

रजिस्ट्रेशनचे प्रमाण सर्वात जास्त असल्यामुळे या वाहनांची वर्दळ लक्षात घेता जो कॉरिडॉर केला आहे तो डेडीकेटेड केला आहे, तो करत असताना तितकीच अधिक वाहने रजिस्टर्ड होतात. तितकीच वाहने रोडवर येतात. याचा अंतर्भाव कलमामध्ये होणे गरजेचे आहे. एखाद्या रोडवर ऑलरेडी कन्जक्शन जास्त आहे, वाहने जास्त आहेत. तो रुट आधी पाहीला पाहीजे. नंतर बीआरटी राबविली पाहीजे. १०० मी. पूर्वी केला होता. यातून उत्पन्नात लॉस व्हायला नको म्हणून तो १०० चा कॉरीडॉर २०० मी. केला. जेणेकरुन प्रिमियम कमी झाल्यानंतर त्याचे २०० मी. करायचे म्हणजे उत्पन्न वाढेल. त्याचा बोजा न वाटता आपण त्याला मिनिमाईज करुन त्याची युटीलिटी वाढली पाहीजे, त्याचा जंक वाढला पाहीजे. अपेक्षित डेव्हलपमेंट वाढली पाहीजे. आपण कमर्शियल असो, रेसिडेन्शियल असो, ज्या बीआरटी तत्वावर नागरीकांना सुविधा उपलब्ध होईल. स्वतःचे वाहन न घेता बीआरटीच्या कॉरीडॉरचा उपयोग करावा हा त्यामागे हेतू व उद्देश्य होता. मी ज्यावेळी महापौर होतो, त्यावेळी कंपनी फॉर्म करायची असे ठरले होते, तो उद्देश्य साध्य व्हावा म्हणून हा प्रयत्न केला आहे. म्हणून मेट्रो डबल केली. जास्त लोकांनी परमिशन घ्यावी हा मूळ हेतू त्या मागचा होता. हे लवकर इम्प्लिमेण्ट व्हायला पाहीजे. परमिशन आधीच दिलेली आहे. हे करत असताना या सर्व गोष्टींचा अंतर्भाव होणे तितकेच गरजेचे आहे. ज्या जाचक अटी होत्या, त्या कमी करण्यासाठी मा.महापालिकेच्या माध्यमातून मॉडीफीकेशन केले आहे. एवढा मोठा कॉरीडॉर संपूर्ण शहरभर आहे. जो डेव्हलप व्हावा, जास्तीत जास्त युटिलिटी व्हावी हे करत असताना दुसरा प्रश्न, ज्या स्टँडींग कमिटीने हे केले नाही. एखाद्या बिल्डरने/ माणसाने फ्लॅट घ्यायचा झालेतर ५०/१०० रुपयांची स्पर्धा असलीतरी परत चौरस फुटाचा फरक आहे. ९००-१२०० घेताय. १०० मी.च्या रोडवर तिथे ट्रॅफिक जास्त आहे, वर्दळ खूप आहे तिथे कोणी फ्लॅट घेणार नाही. जिथे गार्डन आहे, शांतता आहे, १०० मी. आज जाऊन तो तिथे रेटमध्ये नऊशे रुपयांचा फरक असेलतर कोणीही फ्लॅट घेणार नाही. फुटाला १२०० ते १९०० रेट घेतो. त्यावेळी दुसरा बिल्डर १०० मी. सोडून डेव्हलपमेंट करत असेलतर ५०० फूटाला कमी रेट मिळालातरी ९ लाखात स्वस्त फ्लॅट मिळत असेल तो माणूस तो फ्लॅट घेईल. मग या भागाची डेव्हलपमेंट कशी होईल. त्या कॉरीडॉरची युटीलिटी शंभर टक्के होणार नाही. त्यामुळे त्याचा यूज व्हावा, त्याच्या पर्पजचा वापर व्हावा. नागरीकांनी तिथे डबल एफएसआय भरावा. महापालिकेकडे या मार्गाने पैसा यावा हा यामागे उद्देश्य आहे. पण आपण या उद्देश्यापासूनच दूर जातो आहोत. म्हणून या नियमात मॉडीफीकेशन करावे. हा प्रस्ताव शासनाकडे लवकरात लवकर जावा ही अपेक्षा आहे. म्हणून मा.उल्हास शेट्टी यांनी जे प्रश्न विचारले ते याच संदर्भातील आहेत. त्याची उत्तरे आली नसतीलही. मा.उल्हास शेट्टी यांच्या पत्राचे उत्तर दिलेतर पुढील सभेमध्ये यावर अधिक चर्चा करता येईल. प्रिमियम कसा घेतला, प्रशमन शुल्क घेताना कसे घेतले. मघाशी बोलताना सांगितले, मी १ तारखेला प्रश्न दिले होते, ते ९ तारखेला घेतले गेले, उत्तर द्यायला कमी वेळ मिळाला. हे याचे कदाचित उत्तर असेल. अधिक पारदर्शकता यावी. शहराचा विकास व्हावा हा स्थूल हेतू त्यामागे आहे. पुढील मिटींगमध्ये यावर उत्तर दिले तरी चालण्यासारखे आहे.

**मा.महापौर -** प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे. विषयाला सुरुवात करण्यात यावी.

---------

**मा.भारती फरांदे-** मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १

दिनांक - २०/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ **– १)** मा.सुषमा तनपुरे व मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव.

**२)** मा.स्थायी समिती सभा ठ.क्र. ५४८० दि.३१/१२/२०१३

"नादब्रम्ह परिवार" ही संस्था संगीताचा प्रचार प्रसार करीत असून १९ वा वार्षिक मास्टर दिनानाथ मंगेशकर संगीत नाटय महोत्सव दिनांक २ ते ५ जानेवारी २०१४ दरम्यान आयोजित करण्यास व त्याकामी र.रु. २,९५,०००/- अनुदान मंजूर करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.आशा सुर्यवंशी** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते –

नादब्रह्म परीवार या संस्थेस १९ वा वार्षिक मास्टर दिनानाथ मंगेशकर नाट्य महोत्सव करण्यास व त्याकामी र.रु.२,९५,०००/- अनुदान र.रु.३०,००,०००/- लाखाच्या व्यतिरीक्त मंजुर करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.भारती फरांदे** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर** – हा विषय उपसूचनेसह मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक -४४९ विषय क्रमांक - १

दिनांक - २०/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.सुषमा तनपुरे व मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव.

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र. ५४८० दि.३१/१२/२०१३.

"नादब्रम्ह परिवार" ही संस्था संगीताचा प्रचार प्रसार करीत असून १९ वा वार्षिक मास्टर दिनानाथ मंगेशकर संगीत नाटय महोत्सव दिनांक २ ते ५ जानेवारी २०१४ दरम्यान आयोजित करण्यास व त्याकामी र.रु.२,९५,०००/- अनुदान र.रु.३०,००,०००/- लाखाच्या व्यतिरीक्त मंजुर करणेस मान्यता देण्यात येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.भारती फरांदे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - २
दिनांक - २०/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ – १)** मा.सुषमा तनपुरे व मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव.
**२)** मा.स्थायी समिती सभा ठ.क्र. ५४८२ दि.३१/१२/२०१३

साने गुरुजी कथामाला ४७ वे अधिवेशन फुलगांव येथील लोकसेवा प्रतिष्ठान संचलित नेताजी सुभाषचंद्र बोस सैनिक विद्यालयाच्या प्रांगणात होणार असून मनपा तर्फे सदर अधिवेशनास र.रु.२,९५,०००/- (अक्षरी र.रु.दोन लाख पंच्याण्णव हजार) अनुदान मंजूर करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.आशा सुर्यवंशी** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते –

साने गुरुजी कथामाला ४७ वे अधिवेशन फुलगांव येथील लोकसेवा प्रतिष्ठान संचलित नेताजी सुभाषचंद्र बोस सैनिक विद्यालयाच्या प्रांगणात होणार असून मनपा तर्फे सदर अधिवेशनास र.रु.२,९५,०००/- (अक्षरी र.रु. दोन लाख पंच्याण्णव हजार) अनुदान र.रु.३०,००,०००/- लाखाच्या व्यतिरीक्त मंजूर करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.भारती फरांदे** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर** – हा विषय उपसूचनेसह मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक -४५० विषय क्रमांक - २
दिनांक - २०/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.सुषमा तनपुरे व मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव.
२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र. ५४८२ दि.३१/१२/२०१३

साने गुरुजी कथामाला ४७ वे अधिवेशन फुलगांव येथील लोकसेवा प्रतिष्ठान संचलित नेताजी सुभाषचंद्र बोस सैनिक विद्यालयाच्या प्रांगणात होणार असून मनपा तर्फे सदर अधिवेशनास र.रु.२,९५,०००/- (अक्षरी र.रु.दोन लाख पंच्याण्णव हजार) अनुदान र.रु.३०,००,०००/- लाखाच्या व्यतिरीक्त मंजूर करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -४५१ विषय क्रमांक - ३
दिनांक - २०/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.शैलजा शितोळे, मा.साधना जाधव यांचा प्रस्ताव
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.१८५ दि.३/१/२०१४

मनपाच्या ड प्रभागातील उद्यानांची किरकोळ दुरुस्ती विषयक व लहान मोठी विकासाची कामे करणे या कामासाठी मनपाच्या सन २०१३-१४ च्या भांडवली खर्चाच्या अंदाजपत्रकामध्ये पान क्र.४५४, अनु.क्र.३० वर स्थापत्य उद्याने या लेखाशिर्षकाअंतर्गत र.रु.१५,००,०००/- तरतूद आहे. पिंपळे गुरव येथील आरक्षण क्र.३५२ राजमाता जिजाऊ उद्यानासाठी बुरुज व तटबंदीचा समावेश असलेले मुख्य प्रवेशद्वार बांधणेसाठी अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १,००,००,०००/- अपेक्षित आहे. या कामासाठी आवश्यक र.रु.१,००,००,०००/-(अक्षरी र.रु.एक कोटी फक्त) च्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -४५२ विषय क्रमांक - ४
दिनांक - २०/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.शैलजा शितोळे, मा.साधना जाधव यांचा प्रस्ताव
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.१८६ दि.३/१/२०१४

पिंपळे गुरव येथील हॉटेल सृष्टी समोरील जागेत उद्यान विकसीत करणे या कामासाठी मनपाच्या सन २०१३-१४ च्या भांडवली खर्चाच्या अंदाजपत्रकामध्ये पान क्र.४६५, अनु.क्र.११४ वर स्थापत्य उद्याने या लेखाशिर्षका अंतर्गत र.रु.४५,००,०००/- तरतूद आहे. या कामासाठी स्थापत्य विभागामार्फत र.रु.१,८०,००,०००/- ची निविदा काढणेत आली आहे. तथापि ३ एकर जागेवर संपूर्ण उद्यानाचे आरक्षण विकसीत करणेसाठी अंदाजे र.रु.५,००,००,०००/- चा खर्च अपेक्षित आहे. या कामासाठी आवश्यक प्रशासकीय मान्यता र.रु.५,००,००,०००/- मधून र.रु.१,८०,००,०००/- वजा जाता उर्वरित र.रु.३,२०,००,०००/-(अक्षरी र.रु.तीन कोटी वीस लाख फक्त) च्या रकमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.अरुणा भालेकर** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -४५३ विषय क्रमांक - ५

दिनांक - २०/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/ड.मु./१/कावि/२४७६/२०१३, दि.०९/१२/२०१३

२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.१८८ दि.३/१/२०१४

थेरगाव गावठाण रस्ता विकसीत करणेकामी येणा-या र.रु.१,८७,५०,०००/- (अक्षरी र.रु.एक कोटी सत्याऐंशी लाख पन्नास हजार फक्त ) चे पुर्वगनणपत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ६

दिनांक - २०/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. नावियो/५/कावि/१७७/२०१३, दि.२६/१२/२०१३

२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.१९० दि.३/१/२०१४

नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत ज्या विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात त्यामध्ये काही योजना बंद करणे, काही योजनांमध्ये सुधारणा करणे व नविन योजना सुरु करणे प्रस्तावित असून अपंग कल्याणकारी योजनेतील विविध कल्याणकारी योजनेमध्ये सुधारित बदल करणेकामी प्रस्तावा सोबतचे प्रपत्र अ नुसार अ.क्र.१ ते २ योजनांना मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.शमीम पठाण** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, ही योजना, हा विषय वाचत असताना नागरवस्ती विकास योजना विभागाअंतर्गत विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. त्यामध्ये काही योजना बंद करणे याचा प्रपत्रात उल्लेख नाही. या योजना बंद करायला तुम्ही कोणाची परवानगी घेतली. योजना सुरु करायला महापालिका सभेपुढे आणता, मग योजनेत बदल करण्यासाठी, योजना बंद करण्यासाठी महापालिका सभेची परवानगी आवश्यक नाही का. एकतर इतका रद्दड असा तो विभाग आहे. काहीही कोणीही वर्षभरच काय तर ३/३ वर्ष, ५/५ वर्ष तिथले पेपरच हालत नाहीत. २००९ च्या ज्या योजना आहेत,त्या आत्तापर्यंत राबविता आलेल्या नाहीत. खरेतर ही अत्यंत शरमेची बाब आहे. आयुक्त साहेब, आपण खूप ॲक्टिव्ह आहात. शिक्षण विभागात जे काम चालू आहे. प्रत्येक शाळेला भेट देताय. खूप स्पृहणीय, अत्यंत वाखाणण्यासारखे काम आहे. तसेच यासंदर्भात आपण विभागात लक्ष घालावे. २००९ च्या कोणत्याही योजना चालू नाहीत. महापौरांनी शंभर पेक्षा जास्त वेळा बोलवले असेल, महापौरांनी विचारणा केली असेल, योजना राबवा, लोकांना माहिती करुन द्या, अजिबात नाही. तो विभाग हलतच नाही. फक्त ज्या योजना राबविल्या आहेत, मी याठिकाणी कौतुक करेल, मा.आशा शेंडगे यांनी माहिती मागवली आहे. एक लाख झेरॉक्स प्रति मागविल्या होत्या. यातून नक्कीच प्रशासनाचा गलथानपणा उघडकीस येणार आहे. अशा प्रकारच्या कोणत्या योजना बंद करणार आहात याची लिस्ट पाहिजे आहे. आपण कोणतीही योजना आमच्या समोर न आणता अशी परस्पर बंद करु शकत नाही. काय देणार आहोत. शासनाकडून जे काही येते, यात तुमचे काय कौशल्य आहे. तुमची कोणतीही बौद्धिक पातळी त्यात दिसत नाही. फक्त शासनाच्या योजनांची रि ओढताय. केंद्र शासनाच्या, राज्य शासनाच्या याही पेक्षा जास्त योजना आहेत. त्या सुद्धा अंतर्भूत करुन त्या राबविल्या पाहीजेत. त्या अजिबात राबवत नाहीत. त्यात बदल होत नाही. मी एक उपसूचना देणार आहे. अपंग कल्याणकारी योजनेत, मतीमंद मुले, गतीमंद मुलांना दरमहा अर्थसहाय्य देतो. ही योजना वर्षभर चालू असावी. आपण एकदा सुरु केल्यानंतर वर्षभर अर्थसहाय्य देतो. काही मुलांचे लाईफ सर्टिफिकेट एक महिन्यासाठी नसतात. त्यामुळे ही योजना वर्षभर चालू असावी. मी उपसूचना देते की, गतिमंद, मतिमंद, अपंगांच्या योजनांच्या अर्जाची मुदत ठराविक न ठेवता वर्षभर योजनांचे अर्ज स्विकारणेस मान्यता देणेत यावी.

**मा.प्रतिभा भालेराव** – मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, अपंगांसाठी ज्या योजना शासनाकडून राबविल्या जातात, त्यात पेंशनरांकडून जसा हयातीचा दाखला मागविला जातो, त्या पद्धतीने सर्टिफिकेट पाहिजे असेल तर ससून, केईएम, वायसीएम यांच्याकडून सर्टिफिकेट पाहीजे असेल तर तसे घ्या. एकदा डाटा तयार होतो त्यावेळी त्या अर्जदाराच्या हयातीचा दाखला घेतला गेला पाहीजे. नागरीकांनी तुमच्याकडे सारखे यायचे. सारखे तुम्ही त्यांना सांगायचे, हा पेपर सबमिट केला का, हा पेपर आणा, तो आणा. अपंग मनुष्य वारंवार येतो का. समाजातील उपेक्षित घटकांना उपेक्षित करु नका. ज्या लोकांना उच्च शिक्षणासाठी

अर्थसहाय्य दिले पाहीजे ते देणार आहोत. त्याची रक्कम रु.१५,०००/- दिली जाते. त्यांना शिक्षणासाठी जेवढा खर्च येतो तेवढा द्या. ही मुले शिकली पाहीजेत. एखाद्याची शिक्षणाचा खर्च करायची परिस्थिती नसेलतर एखादा अंध विद्यार्थी असेल, त्याला येणा-या ४ वर्षांचा खर्च द्यावा. डिग्री करायची असेलतर त्यासाठी खर्च द्यावा. मतिमंद मुले स्विमिंग खूप चांगले करतात. त्यांना मगर स्टेडियमवर स्विमिंग करायला परवानगी मिळत नाही. कशासाठी आपले स्विमिंग टँक आहेत. पालकांना अट घाला की बरोबर प्रशिक्षक असले पाहीजेत. विद्यार्थ्यांकडून, पालकांकडून अर्ज भरुन घ्यावेत की, दूर्घटना घडली तर त्यास आम्ही जबाबदार नाही. त्यांच्याबरोबर पालक व प्रशिक्षक असले पाहीजेत. पालक बरोबर असल्याशिवाय इथे यायचे नाही. इथे यायचे नाही,शिकविता येणार नाही. मतिमंद स्विमर किती आहेत याचा अभ्यास करा. असे जे कोणी आहेत त्यांना तिथे तिकिट काढावे लागते. तो उपेक्षित घटक असतो, मतिमंद असू द्या किंवा अपंग असू द्या, मानसिक दृष्टिने खचलेले पालक इतर खर्च इतके असतात. ते या मुलांवर खर्च करु शकत नाहीत. यांना बस फ्रि देतो तसे इथे सुद्धा फ्रि मध्ये दिले पाहीजे. फ्रि शिक्षण दिले पाहीजे. ऍकॅडमीमध्ये त्याला जावू दे. उपेक्षित घटकांसाठी मी ठराव दिला होता. शिक्षण मंडळात या गोष्टीसाठी एक/एक वर्ग चालू केले पाहिजेत. आज कामायनी, साईसारख्या संस्था यांना १०० मुलांची मान्यता आहे. आमच्याकडे ८०० ते हजार लोक वेटींग लिस्टवर आहेत. या मुलांना  स्पीच थेरपी करावी लागते. ऐकायची थेरपी करावी लागते. वेगवेगळ्या वेळा आहेत. त्यासाठी मनपाचे युनिटस् तयार केले पाहीजेत. त्यांना शिक्षण दिले गेले पाहीजे. त्यांच्यासाठी युनिटस् तयार केले गेले पाहीजेत. या मुलांना शिक्षणाबरोबरच कलेचे शिक्षण, आपल्याकडे कला अकादमी आहे. तबला वाजवायचे प्रशिक्षण दिले गेले पाहीजे. १५,०००/- शैक्षणिक खर्च दिला जातो, त्यात काय होत नाही. ३० लाख अनुदान रकमेतून यावर खर्च केलातरी चालेल. कारण पूर्ण बजेट खर्च होतच नाही. पिंपरी चिंचवडमध्ये किती शाळा आहेत. सगळ्या शाळांची कागदपत्रे इथपर्यंत पोहचेपर्यंत, तारेवरीच कसरत होते. उपेक्षित घटकांना सांभाळायचे, ऑडीट करायचे, त्यांची कागदपत्रे सांभाळायची का काय करायचे. नक्की शाळा अस्तित्वात आहे का हे बघा. ऑडीट झाले आहे का ते बघू नका. पैशांचा गैरवापर होत नाही ना यासाठी दर महिन्याला व्हिजिट करा. चांगले काम चालू आहे का नाही. त्यात कुठे पैशांचा गैरव्यवहार होत नाही ना. दर महिना व्हिजिट असू द्या. रिमार्क बुक तयार करा. श्री.वाघमोडे यांची संस्था आहे. कशा पद्धतीने मुले शिकतात ते पाहून वाईट वाटते. अशा शाळांचे ऑडीट सुद्धा मागू नका. २/३ लाख अनुदान देतात. ५/६ संस्था आहेत. काही संस्था तर म्हणतात, महापालिकेच्या नादी लागायलाच नको. साई नावाची माझी संस्था दरवर्षी अनुदान घेते. पण कामायनीसारखी संस्था म्हणते, महापालिकेच्या नादी लागायला नको. कोण पाठपुरावा करणार. एकदा सर्टिफिकेट दिल्यानंतर अपंगत्व काय रिटर्न येते का. पेशन योजना आहेत त्याप्रमाणे दरवर्षी फक्त एकदा हयातीचा दाखला घ्या. मी त्या पालकांना घेऊन स्वतः आयुक्त साहेबांकडे गेले होते. अजूनही या पालकांना अनुदान मिळालेले नाही. इथे अनुदानाची अट घातली आहे, मुलाचे वय ५ वर्षे पूर्ण असावे. एखाद्या मुलाला जन्मजात व्यंग्य असेल, त्याचा खर्च जन्मापासून सुरु होईल का ५ वर्षापासून होईल. त्याची घरातली परिस्थिती चांगली असेलतर त्याचा खर्च वयाच्या ५ वर्षानंतर सुरु होईल. वायसीएमच्या डॉक्टरांनी शून्य वयोगटापासून या मुलांना तपासावे. त्यांचे सर्टिफिकेट घ्या. शून्य वयोगटापासून ही योजना

राबवावी. संपूर्ण योजना १८ वर्षापर्यंत करु नका. अखंड योजना करा. या योजनेत कलर ड्रॉपलरचा समावेश करावा. सातव्या महिन्यातच कळते, या बाईचे बाळ मतिमंद आहे का, तिला काही आजार आहे का नाही. महापौरांसारख्या एक महिलेने आज त्या बाईच्या बाळाची पूर्ण वाढ झाली नव्हती. अशा वेळेला तिला ससूनचा आधार घ्यावा लागला. आज त्यांच्यावर एवढा मोठा भार असेल, असे बाळ १/२ महिन्याचे डिक्लेअर झाले असेल तर प्रोसिजर फार मोठी होते. कोणतेही आई-वडील हे सहन करु शकत नाहीत. माझे बाळ अंध आहे किंवा मतिमंद आहे. खरोखर ज्याचे जळते त्याला कळते म्हणून वयाची अट शून्य करा. ते मूल जोपर्यंत हयात आहे तोपर्यंत त्या मुलाला या योजनेचा लाभ मिळावा, ही माझी उपसूचना आहे. शिक्षणासाठी जो खर्च येतो तो त्या मुलांना न देता संस्थांना दिला आहे. फार अवघड परिस्थिती आहे. संस्थांचे संस्थाचालक आपल्याकडे येतात तेव्हा आपण त्यांना फार सहकार्य करतो, यातला भाग नाही. तुम्ही फक्त सातत्याने जाऊन बघा. माझ्यासारखी महिला सुद्धा स्वतःची संस्था स्वतः चालवते. शासकीय अनुदानांच्या मागे पळत नाही. माझ्याकडे १२५ विद्यार्थी आहेत. १८ वर्षापासून ६० वर्षापर्यंत मतिमंद व्यक्ती आहेत. चांगले मूल सांभाळणे आई वडीलांना कठीण असते. आम्ही समाजासाठी काम करत असतो. आम्ही समाजकल्याण यांच्यामागे पळत नाही. संस्थेची मान्यता घेतो. फ्रि अनुदानासाठी खर्च लिहून जे खोटे काम करतात त्यांना अनुदाने मिळतात. संस्थांमध्ये व्हिजिट ठेवा. संस्थाचालकांना ज्या पद्धतीने द्यायचे असेल तसे द्या. अनाथ मुलांसाठी विसावा नावाची एक संस्था सांगवी इथे चालू झाली आहे. त्या बाई मला येऊन भेटल्या. प्राधिकरणातही अशी मुले आहेत. ही संस्था सुद्धा त्यात ॲड करुन घ्या. सांगायला वाईट वाटते, जे लोक त्यांची लहान बाळे रेल्वे स्टेशन, देवळांत सोडून देतात,मुलांवरील आपला हक्क सोडतात. यात सुद्धा मतिमंद मुलगा आहे. अशा बाळांना यु.एस.ए. तील पालकांनी ते मतिमंद बाळ दत्तक घेतले. भारतात कोणी दत्तक घेतले नाही. अशा आधार संस्थांनाही त्यात अंतर्भूत करावे अशी उपसूचना आहे. अंध, अपंग असलेली, आई-वडीलांना नकोशी असलेली अशी मुले या संस्थांमध्ये सांभाळली जातात. काही लोक अशा बाळांच्या दूधाचा खर्च करतात. काही लोक वाढदिवस साजरा करतात. त्या मुलांना कपडे लागतात, औषधे लागतात, डायपर देतात. वैद्य खडीवाले पुण्यातून इथे येऊन औषधे पुरवतात. हा विषय उपसुचनेसह मंजूर करावा.

योजना क्र.७ ला खालील प्रमाणे उपसुचना देण्यात येत आहे. सदर योजनेतील कोणत्याही योजनेसाठी उत्पन्नाची अट लागू राहणार नाही.

१) प्रस्तावात नमूद १२ वी नंतरचे वैद्यकीय / अभियांत्रिकी उच्च शिक्षणामध्ये एम.बी.ए. या पदवीचा समावेश करुन अर्थसहाय्य उच्च शिक्षणाच्या कुठल्याही शैक्षणिक वर्षात देण्यात यावे.
२) पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरातील वास्तव्य असलेल्या किमान १५ मतिमंद व्यक्ती ज्यांचे वय ५ वर्षापुढील ऐवजी ० वर्षापुढील मतिमंद व्यक्तीचा सांभाळ करणा-या नोंदणीकृत स्वंयसेवी संस्थेस प्रति मतीमंद व्यक्तीकरता वार्षिक अर्थसहाय्य र.रु. १८,०००/- ऐवजी २४,०००/- करण्यात यावे.

**३)** पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरातील वास्तव्य असलेल्या ज्यांचे वय ५ वर्षापुढील ऐवजी ० वर्षापुढील मतिमंद व्यक्तीचा सांभाळ करणा-या पालकास आपल्या पाल्याचे पालन पोषण करण्याकरीता प्रति मतीमंद व्यक्तीकरता वार्षिक अर्थसहाय्य र.रु. १८,०००/- ऐवजी २४,०००/- करण्यात यावे.

**४)** अंध अपंग,मतिमंद,अस्थिव्यंग व मूकबधिर विद्यार्थ्यांना त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी महापालिकेच्या क्रीडा सुविधा व सांस्कृतिक सुविधा मोफत पुरविण्यात याव्यात.

**५)** सदर योजनेसाठी एकदाच अर्ज घेऊन दरवर्षी हयातीचा दाखला घेण्यात यावा.

**६)** अर्थ सहाय्याची रक्कम वर्षातून एकदा एकरकमी देण्यात यावी.

**७)** आकुर्डी रेल्वे स्टेशन येथिल मतिमंदाचा सांभाळ करणारी आधार (निराधार) व अनाथ मुलांची संस्था (वयोगट ० ते ६) या संस्थेला वार्षिक अनुदान र.रु. तीन लाख दरवर्षी कायमस्वरुपी देण्यात यावे.

**८)** या योजनेअंतर्गत अर्थसहाय्य देण्याचा अथवा नाकरण्याचा अधिकार मा. आयुक्त अथवा मा. अति.आयुक्त यांना राहिल ऐवजी सदर अधिकार मा.महिला बाल कल्याण समितीस राहिल

**९)** महिला बाल कल्याण समितीला आर्थिक अधिकार असल्यामुळे महिला बाल कल्याण समितीचे विषय मा. स्थायी समितीकडे पाठविणेत येऊ नये. यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.भारती फरांदे** – मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.आर.एस.कुमार** - मा.महापौर साहेब, तुम्ही रस्त्यात बघितले असेल दोन्ही पाय नाहीत, एक पूर्ण पाय नाही, अशा व्यक्ती कुबड्या घेऊन चालतात. त्यांच्या बरोबर एक चालक लागतो. मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - नागरीविकास योजना विभागामार्फत ज्या कल्याणकारी योजना राबविल्या जातात, त्यामध्ये कर्णबधिर रुग्णांकरीता आधुनिक श्रवणयंत्राकरीता अर्थसहाय्य करणेस तसेच मतिमंद व्यक्तीच्या पालकास अर्थसहाय्य करण्याची योजना आहे. तशीच योजना तंतोतंत अपंग व्यक्तींना (४०% पेक्षा जास्त) राबविण्यात यावे म्हणजेच ४०% पेक्षा जास्त अपंगांना अथवा नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेस, अपंग व्यक्तीच्या पालकास अर्थसहाय्य देण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.विलास नांदगुडे** - मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.राजेंद्र काटे** - मा.महापौर साहेब, मा.मंगलाताई कदम यांनी खरोखरच खूप चांगल्या प्रकारची उपसूचना मांडली आहे. कृष्ठपिडीत लोकांचाही यात उल्लेख करावासा वाटते. समोर डायसवर मा.उल्हास जगताप बसले आहेत. त्यांनी कृष्ठपिडीत लोकांसाठी अनेक गोष्टी केल्या आहेत. या लोकांना दर २/३ वर्षांला कागदपत्रांची पूर्तता करावी लागते. त्यांना अनुदानाचे पैसे देण्यात येतात ते येण्याजाण्यातच त्यांचे पैसे खर्च होतात. मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो -

कुष्ठपिडित लोकांसाठी अनुदान देताना वर्षातून एकदाच हयातीचा दाखला घेण्याबाबत, इतर कोणत्याही कागदपत्रांची मागणी वारंवार करु नये यास मान्यता देणेत यावी.

**मा.दत्ता साने** - मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.धनंजय आल्हाट** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो – नागरीविकास योजना विभागामार्फत ज्या कल्याणकारी योजना राबविल्या जातात, त्यामध्ये कर्णबधिर रुग्णांकरीता आधुनिक श्रवणयंत्राकरीता अर्थसहाय्य करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.निलेश बारणे** - मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, सगळ्या उपसूचना स्विकारल्या आहेत.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक -४५४ विषय क्रमांक - ६
दिनांक - २०/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नावियो/५/कावि/१७७/२०१३, दि.२६/१२/२०१३
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.१९० दि.३/१/२०१४

नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत ज्या विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात त्यामध्ये काही योजना बंद करणे, काही योजनांमध्ये सुधारणा करणे व नविन योजना सुरु करणे प्रस्तावित असून अपंग कल्याणकारी योजनेतील विविध कल्याणकारी योजनेमध्ये सुधारित बदल करणेकामी प्रस्तावा सोबतचे प्रपत्र अ नुसार अ.क्र.१ ते २ योजनांना मान्यता देणेत येत आहे. तसेच नागरीविकास योजना विभागामार्फत ज्या कल्याणकारी योजना राबविल्या जातात, त्यामध्ये कर्णबधिर रुग्णांकरीता आधुनिक श्रवणयंत्राकरीता अर्थसहाय्य करणेस तसेच मतिमंद व्यक्तीच्या पालकास अर्थसहाय्य करण्याची योजना आहे. तशीच योजना तंतोतंत अपंग व्यक्तींना (४०% पेक्षा जास्त) राबविण्यात यावी म्हणजेच ४०% पेक्षा जास्त अपंगांना अथवा नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेस, अपंग व्यक्तीच्या पालकास अर्थसहाय्य देण्यास तसेच गतिमंद, मतिमंद, अपंगांच्या योजनांच्या अर्जाची मुदत ठराविक न ठेवता वर्षभर योजनांचे अर्ज स्विकारणेस तसेच कुष्ठपिडित लोकांसाठी अनुदान देताना वर्षातून एकदाच हयातीचा दाखला घेण्याबाबत, इतर कोणत्याही कागदपत्रांची मागणी वारंवार करु नये यास तसेच योजना क्र.७ ला खालील प्रमाणे उपसुचना देण्यात येत आहे. सदर योजनेतील कोणत्याही योजनेसाठी उत्पन्नाची अट लागू राहणार नाही.

१) प्रस्तावात नमूद १२ वी नंतरचे वैद्यकीय / अभियांत्रिकी उच्च शिक्षणामध्ये एम.बी.ए. या पदवीचा समावेश करुन अर्थसहाय्य उच्च शिक्षणाच्या कुठल्याही शैक्षणिक वर्षात देण्यात यावे.

२) पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरातील वास्तव्य असलेल्या किमान १५ मतिमंद व्यक्ती ज्यांचे वय ५ वर्षापुढील ऐवजी ० वर्षापुढील मतिमंद व्यक्तीचा सांभाळ करणा-या नोंदणीकृत स्वंयसेवी संस्थेस प्रति मतीमंद व्यक्तीकरता वार्षिक अर्थसहाय्य र.रु. १८,०००/- ऐवजी २४,०००/- करण्यात यावे.

३) पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरातील वास्तव्य असलेल्या ज्यांचे वय ५ वर्षापुढील ऐवजी ० वर्षापुढील मतिमंद व्यक्तीचा सांभाळ करणा-या पालकास आपल्या पाल्याचे पालन पोषण करण्याकरीता प्रति मतीमंद व्यक्तीकरता वार्षिक अर्थसहाय्य र.रु. १८,०००/- ऐवजी २४,०००/- करण्यात यावे.

४) अंध अपंग,मतिमंद,अस्थिव्यंग व मूकबधिर विद्यार्थ्यांना त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी महापालिकेच्या क्रीडा सुविधा व सांस्कृतिक सुविधा मोफत पुरविण्यात याव्यात.

५) सदर योजनेसाठी एकदाच अर्ज घेऊन दरवर्षी हयातीचा दाखला घेण्यात यावा.

६) अर्थ सहाय्याची रक्कम वर्षातून एकदा एकरकमी देण्यात यावी.

७) आकुर्डी रेल्वे स्टेशन येथिल मतिमंदाचा सांभाळ करणारी आधार (निराधार) व अनाथ मुलांची संस्था (वयोगट ० ते ६) या संस्थेला वार्षिक अनुदान र.रु. तीन लाख दरवर्षी कायमस्वरुपी देण्यात यावे.

८) या योजनेअंतर्गत अर्थसहाय्य देण्याचा अथवा नाकरण्याचा अधिकार मा. आयुक्त अथवा मा. अति.आयुक्त यांना राहिल ऐवजी सदर अधिकार मा.महिला बाल कल्याण समितीस राहिल.

९) महिला बाल कल्याण समितीला आर्थिक अधिकार असल्यामुळे महिला बाल कल्याण समितीचे विषय मा. स्थायी समितीकडे पाठविणेत येऊ नये. यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.महापौर** – हा विषय उपसूचनेसह मंजूर करण्यात येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -४५५ विषय क्रमांक - ७

दिनांक - २०/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.प्रशांत शितोळे, मा.निलेश बारणे यांचा प्रस्ताव -

२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.१९३ दि.३/१/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचारी श्री.संभाजी भिमा शिंदे, सफाई कामगार, विभाग – पोस्टमार्टेम वायसीएम हॉस्पिटल, पिंपरी व या विभागाच्या कर्मचा-यांबाबत मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी दिलेल्या आदेशानुसार (रिट पिटीशन क्रमांक २८८१/२०१२) कामकाज व्हावे व त्याप्रमाणे सदर व इतर पात्र कर्मचा-यांस पदाप्रमाणे नेमणूक व्हावी याकरीता सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**मा.अरुणा भालेकर** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ८

दिनांक - २०/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.शैलजा शितोळे, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -

२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.१९४ दि.३/१/२०१४

प्र.क्र.५३ मधील पश्चिम बाहयवळण मार्गावरील स.नं. १५६ पासून वाकडकर वस्तीकडे जाणारा १८.०० मी. डी.पी.रस्ता विकसित करणे या कामाच्या नावाचा महानगरपालिकेच्या मंजूर अर्थसंकल्पामध्ये समावेश नाही. सदर कामाचे सन २०१३-१४ च्या मनपाच्या सुधारित अर्थसंकल्पात व्हिजन २००५ या लेखाशिर्षाअंतर्गत समावेश करुन आवश्यक तरतूद उपलब्ध करणेच्या कार्यवाहीस अधिन राहून सदर कामाचे अंदाजपत्रकीय र.रु.३,०५,२२,०००/-(अक्षरी र.रु.तीन कोटी पाच लाख बावीस हजार फक्त) प्रशासकीय मान्यता मान्यता देणेत येत आहे.

**मा.अरुणा भालेकर** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.स्वाती कलाटे** – मा.महापौर साहेब, वाकड प्रभागातील १८ मी. रस्त्यासाठी रु.३ कोटी ५ लाखाचा प्रस्ताव ठेवला आहे. हा रस्ता सध्यातरी इतका महत्वाचा नाही की त्यासाठी ३ कोटी रक्कम देण्यात यावी. हा विषय फेटाळण्यात यावा अशी विनंती आहे.

**मा.उषा वाघेरे** – मा.महापौर साहेब, सदर सुचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** - विषय क्रमांक ८ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक -४५६ विषय क्रमांक – ८
दिनांक - २०/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.शैलजा शितोळे, मा. प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.१९४ दि.३/१/२०१४
विषय क्रमांक ८ दप्तरी दाखल करणेत येत आहे.
अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ९
दिनांक - २०/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. नावियो/०३/कावि/१६१/२०१३, दि.३०/१२/२०१३
२) मा.महिला व बालकल्याण समिती सभा ठ.क्र.१७ दि.८/१/२०१४

नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत ज्या विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात त्यामध्ये काही योजना बंद करणे, काही योजनांमध्ये सुधारणा करणे व काही नविन योजना सुरु करणे प्रस्तावित असून महिला व बालकल्याण योजनेतील विविध कल्याणकारी योजनांमध्ये सुधारित बदल करणेकामी प्रस्तावासोबतचे प्रपत्र अ नुसार अ.क्र.१ ते १० योजनांना मान्यता देणेत येत आहे**.**

**मा.भारती फरांदे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.कुलकर्णी (सहा.आयुक्त)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सदस्य, या विषयात काही योजना बंद करणार असल्याचे म्हटले असले तरी नागरवस्ती विभागाकडून विविध योजना चालविल्या जातात. यात ३ उपविभाग आहेत, एक महिला बाल कल्याण योजना, दुसरे मागासवर्गीय योजना व तिसरे अपंग कल्याणकारी योजना. यात मतिमंद नागरीकांचा समावेश आहे. आढावा बैठकीत मा.महापौर व मा.आयुक्त साहेब यांनी सूचना दिल्या होत्या. तिनही प्रकारच्या योजना चालू आहेत. एकाच प्रकारची योजना राबवतोय. त्याचा आढावा घेणे गरजेचे आहे. काही योजना आऊटडेट असतील, त्यांना रिस्पॉन्स नसेल तर काही योजनांमध्ये सुधारणा करणे, काही योजना सुधारीत करणे. आपण कोणतीही योजना बंद करणार नाही आहोत. यासाठी प्रपत्रात कोणतीही योजना बंद करायचा प्रस्ताव ठेवलेला नाही. मा.शमिम पठाण ताईंनी म्हणाल्याप्रमाणे कोणतीही योजना परस्पर बंद करणार नाही. जसे योजना सुरु करण्यासाठी सभागृहापुढे येतो तसेच धोरणात्मक फेरबदल करणे, योजना बंद

करणे याचा धोरणात्मक निर्णय सभागृहाच्या संमतीने घेण्यात्त येईल. महिला बाल कल्याण योजनांचे धोरण ठरविणे हा सर्वसाधारण सभेने हा अधिकार मा.महिला बाल कल्याण समितीला दिलेला आहे. यात महिला व बालकर्ल्याण समिती अटी शर्ती निश्चित करुन त्या मान्यतेसाठी मा.महापालिका सभेसमोर सादर करते. मा.विधी समिती, मा.स्थायी समितीकडून विषय मान्यतेसाठी मा.महापालिका सभेसमोर येतात. मागासवर्गीय कल्याणकारी योजना, झोपडपट्टी सुधार व समाजकल्याण समिती होती, या विभागाकडून चालविल्या जाणा-या योजना या विषयांना मान्यता घेण्यासाठी आता मा.शहर सुधारणा समिती बनवली आहे. त्या संदर्भातील धोरणात्मक विषय असतील तर ते मा.शहर सुधारणा समितीमार्फत ठेवण्यात येतात. त्याप्रमाणे तिनही विषय ठेवले आहेत. ६ क्रमांकाचा विषय आहे. ९ क्रमांकाचा विषय महिला व बालकल्याणसाठी आहे. असाच विषय मा.शहर सुधारणा समितीसमोर ठेवला होता. आपल्या समोर हा प्रस्ताव येणार आहे. आपला ९ क्रमांकाच्या योजनेत सुधारणा करण्याचा प्रस्ताव आहे. शेवटच्या पानावर एच.आय.व्ही. एडस् ग्रस्त मुलांसाठी नवीन योजना सुरु करतोय. सुरुवातीच्या योजना आत्ता राबवतोय, त्यात फेरबदल सूचवतोय. या योजनांबद्दल संक्षिप्त माहिती देतो. ही योजना शासनामार्फत राबविली जाते. समाजकल्याण विभागाकडून विधवा महिलांना दरमहा रु.५००/- पेन्शन म्हणून रक्कम  दिली जाते. त्यांचे ***Duplication*** आपल्याकडून होऊ नये. म्हणून या आपल्या स्वतःच्या योजना आहेत. आपल्या निधीतून या योजना राबवतोय. या योजनेत आपल्याला शासनाकडून कोणताही निधी मिळत नाही. महापालिकेमार्फत शासनाच्या ज्या योजना आहेत, त्या सर्वसामान्य नागरीकांसाठी आहेत, जसे शिवणयंत्र, सायकल वाटप, दारिद्रयरेषेखालील नागरीकांसाठी योजना. अपंग कल्याणकारी योजना, मागासवर्गीय कल्याणकारी योजना व महिला बालकल्याण योजना या तीनही योजना फक्त पिंपरी चिंचवड महापालिकेने लागू केल्या आहेत. त्यांचा खर्च महापालिका करते. विधवा महिलांना व्यवसायासाठी रु.५,०००/- अर्थसहाय्य देत होतो. त्याकरिता या महिलांकडून कोणता व्यवसाय करणार यासाठी कोणाकडून तरी कोटेशन घेतले जायचे. सन्मा.सदस्यांकडून यासंदर्भात प्रस्ताव आला होता की, अत्यंत तुटपुंजी रक्कम देतो. मग अशा प्रकारे कोटेशन मागवून घेऊन त्यांना त्रास देऊ नका. म्हणून योजनेत फेरबदल करायचा प्रस्ताव तयार केला आहे. यात म्हटले आहे, किरकोळ स्वरुपाचे घरगुती व्यवसाय करण्यासाठी कोटेशनची मागणी करणे योग्य वाटत नाही. कोणत्याही एजन्सीकाडून किंवा व्यापा-याकडून कोटेशन देण्याचे बंधन यात ठेवत नाही. सन्मा.सदस्यांसमोर दि.२३ ऑक्टोबर २०१३ रोजी याचे सादरीकरण केले होते. त्यानुसार दिलेल्या सूचनेप्रमाणे रु.५,०००/- ऐवजी रु.६,०००/- अनुदान देणार आहोत. हे अनुदान मिळण्यासाठी पतीच्या मृत्यूचा दाखला व त्या पिंपरी चिंचवडचा रहिवासी असल्याचा दाखला दिलातर त्यांना कोणत्याही प्रकारचे कोटेशन आवश्यक असणार नाही.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, या विषयात दुरुस्ती करुन घ्या की, पिवळे, केशरी रंगाचे रेशन कार्ड असावे अशी अट काढून टाकावी. विधवा योजनेत ही अट कशासाठी पाहीजे. तिचे घरचे उत्पन्न चांगले असेलतर ती तुमच्याकडे पाच हजार मागण्यासाठी मुळीच येणार नाही. म्हणून विधवा योजनेत रेशन कार्डच्या रंगाची आणि उत्पन्नाची अट वगळून टाकावी.

**मा.कुलकर्णी (सहा.आयुक्त)** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सदस्य, मी सदस्यांच्या हे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सगळ्या योजनांना जास्तीत जास्त १ लाख वार्षिक उत्पन्न असावे ही अट सर्वच योजनांमध्ये आहे. समाजात कमी उत्पन्न गटांतील दूर्लक्षित घटक आहेत त्यांना या योजनेचा लाभ मिळावा.. सुस्थितीत आहेत त्यांना महापालिकेची गरज राहणार नाही. म्हणून सन्मा.सभागृहाला विनंती आहे की, पदाधिका-यांनी सूचना केल्याप्रमाणे १ लाख रुपये पर्यंत उत्पन्न असणा-यांसाठी तहसिलदाराचा दाखला देण्याची अट घालावी. पिवळे किंवा केशरी रेशन कार्डाची अट तशीच ठेवणे योग्य होईल.

१२वी नंतर इंजिनिअरिंग किंवा उच्च शिक्षण घेण्यासाठी मेरीटवर ॲडमिशन घेतले जाते. इंजिनिअरींग व एमबीबीएस साठी अर्थसहाय्य देत होतो. मेडीकलमध्ये अनेक ब्राँचेस आहेत म्हणून बीएएमएस, बीएचएमएस, बीडीएस त्याचबरोबर मा.भाऊसाहेब भोईर यांनी सूचविल्याप्रमाणे बीयूएमएस ॲड केले आहे. बीई, बीटेक यांनाही साडेसात हजार अर्थसहाय्य देतो आहोत. सभागृहाने मान्यता दिलीतर ही रक्कम रु.१५,०००/- करणार आहोत. यासाठी उत्पन्नाची अट पाहीजे.

उच्चशिक्षणासाठी अर्थसहाय्य देताना तो विद्यार्थी किंवा विद्यार्थिनी एक आठवड्याचे किंवा एक महिन्याचे कोर्सेससाठी परदेशात जाणार असेल तर त्याला रु.२५,०००/-, ३ महिन्यांसाठी जाणार असेल तर रु.५०,०००/- व ३ महिन्यांपेक्षा जास्त काळासाठी जाणार असेल तर रु. १,००,०००/- पर्यंत देतो आहोत. परदेशातील शॉर्ट टर्म कोर्सेससाठी रिस्पॉन्स मिळत नाही म्हणून यात सुधारणा केली आहे. किमान एक वर्षासाठी सरसकट एक लाख देणार आहोत. परदेशांत उच्च शिक्षण घेणे अतिशय खर्चिक आहे. चांगल्या उत्पन्न गटांना सुद्धा त्रास होतो म्हणून हीच एक योजना आहे इथे उत्पन्न मर्यादा घेतलेली नाही.

मुलांना तांत्रिक शिक्षणासाठी अर्थसहाय्य देणे – आयटीआयमधील प्रशिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य दिले जाते. एकिकडे रु.२,०००/- अनुदान देत होतो. पदवी परीक्षेसाठी देत होतो. डिप्लोमा कोर्सेस आले नव्हते. डिप्लोमा इंजिनिअरींग त्यात ॲड केले. आयटीआय, डिप्लोमा व डिग्री यांना अनुदान मिळणार आहे. डिप्लोमासाठी रु.७,०००/- व पदवी/पदविका, कोणताही १ वर्ष किंवा ३ वर्षांचा डिप्लोमा असेल तर त्यासाठी रु.३,०००/- दिले जाते. एक वर्ष किंवा दोन वर्षाचा डिप्लोमा असो त्यांना अर्थसहाय्य देणार आहोत.

महिला बचत गटांना अर्थसहाय्य – १ वर्ष पूर्ण झालेल्या बचतगटांना अर्थसहाय्य देतो आहोत. बचत गटांची दर महिना बैठक घेतली जाते का, दर महिन्याची बचत, त्यांचे इतिवृत्त, कागदपत्रे, सामाजिक उपक्रम राबविले का याची पाहणी करुन, बँक अधिका-यांकडून करुन त्याची श्रेणी ठरवत होतो. अ श्रेणी बचतगटाला रु.२०,०००/-, ब श्रेणी बचतगटाला रु.१८,०००/-, क श्रेणी बचतगटाला रु.१५,०००/- अनुदान दिले जात होते. यात तक्रारी येत होत्या. आमचा गट चांगला असताना अशी अशी श्रेणी दिली नाही, अशा प्रकारचे वाद असू नयेत म्हणून ग्रेडेशनची अट काढायचे प्रस्तावित करतोय. सरसकट बचत गटांना अनुदान देण्याची योजना राबवतोय. आपला वाईट अनुभव असा आहे, १ वर्षांनंतर अनुदान मिळाल्यानंतर बचतगट पुढे कार्यरत राहत नाहीत. ते सतत क्रियाशील रहावेत म्हणून त्यांना अनुदान देताना उद्देश्य सफल होण्यासाठी एक वर्षाऐवजी ३ वर्ष कालावधी करणार आहोत. परंतू ग्रेडेशनप्रमाणे देणार होतो त्याऐवजी सरसकट सगळे बचतगट जे ३ वर्षांपासून व्यवस्थितपणे

काम करत आहेत, त्यांना रु.१८,०००/- अनुदान देण्याचे प्रस्तावित ठेवले आहे. महिला बाल कल्याण समितीने २०,०००/- देण्याबाबत केलेल्या सूचनेप्रमाणे योजना ठेवतोय. दुबार सदस्यांचा वाद निर्माण झाला होता. ज्या बचत गटातील महिला एका योजनेखाली दोन वेगवेगळ्या प्रकारे फायदा घेते असे बचत गट अपात्र ठरवावेत. ही अंमलबजावणी जवळपास २ वर्षांत थांबवली होती. महिला बचत गट चळवळ वाढीला लागावी असा महापालिकेचा उद्देश्य आहे. म्हणून सभासद सुधारीत योजना केली आहे. एक महिला एकापेक्षा जास्त बचत गटात सभासद असेल तर बचतगट अपात्र न ठरविता त्यांना संधी द्यावी. पर्याय द्यावा. एकतर त्यांनी कोणत्यातरी एकाच गटाचे सभासदत्व घ्यावे. दुस-या बचत गटाचा राजीनामा द्यावा. हे बचत गट पूर्नजिवीत करावेत असे बंधन घालणार आहोत. एक महिला एकाच बचत गटात राहील असे बंधन घालणार आहोत.

विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी खाजगी क्लासची फी देणे - या योजनेत एखादा विद्यार्थी खाजगी क्लासला जातोय हे कळाले तरच रु.१,०००/- अनुदान देणार आहोत. एकिकडे अपण म्हणतोय खाजगी शाळा किंवा महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांने खाजगी क्लासवर अवलंबून राहू नये. दुसरीकडे आपली योजना आहे, खाजगी क्लासमध्ये प्रवेश घेतला तरच गणवत्ता वाढीसाठी अनुदान देणार, हे धोरण विसंगत होत असल्यामुळे जर एखाद्या विद्यार्थीनी यांनी दहावीत ६० टक्यांपेक्षा जास्त गुण मिळवले असतील, जर त्या स्वअभ्यास करत असतील तर त्यांना शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यासाठी रु.२,००० देण्यात यावेत असा प्रस्ताव आहे. खाजगी क्लासेस ऐवजी शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्यात यावे.

स्वयंरोजगारासाठी संगणक प्रशिक्षण योजना – यात आय.टी.आय. मार्फत महिलांना कोर्स देतो. एम.के.सी.एल. बरोबर जो ठराव केला आहे, त्यानुसार शहरात ५ ठिकाणी ५ केंद्र करायला मान्यता दिली आहे. एका कोर्ससाठीच महिलांना प्रशिक्षण देण्यात येते. एमएससी आयटीऐवजी इतर २ कोर्सेस सुद्धा ॲड करतोय. डीटीपी व टॅली या दोन कोर्सेसला सभागृहाची मान्यता मिळाल्यानंतर एमकेसीएलची देखील मान्यता घेणार आहोत. त्यांच्या मान्यतेनंतर त्यांच्या अटी/शर्तीप्रमाणे हे दोन कोर्सेस सुरु करावेत असा प्रस्ताव आहे. आयटीआय मार्फत हे कोर्सेस राबविले जाणार आहेत. त्यासाठी प्रशिक्षण देण्यासाठी मान्यता घेणार आहोत. महाराष्ट्र ज्ञान महामंडळ यांना अधिकार दिलेले आहेत. आपण प्रस्ताव पाठवतो. त्यांच्यामार्फत प्रत्येक केंद्राची प्रवेश क्षमता ठरवून दिलेली आहे. त्याप्रमाणे आपल्याला धोरण राबवावे लागते.

सावित्रीबाई फुले पुरस्कार योजना – सामाजिक कार्य करणा-या संस्थांना रुपये १०,००० रोख व स्मृतिचिन्ह व मनपाचे सन्मानपत्र देत होतो. सन्मा. पदाधिका-यांच्या सूचनेप्रमाणे या रकमेत वाढ करतोय. रु.१०,०००/- ऐवजी रु.२५,०००/- देण्याचा प्रस्ताव आहे. वैयक्तिक पुरस्कार योजना – यात समाजात काम करणा-या महिलांना देण्यात येतो. पदाधिका-यांनी सांगितल्याप्रमाणे तीन क्षेत्रांतील, समाज कार्याबरोबर सांस्कृतिक व कला, उद्योग व व्यवसाय या क्षेत्रांतील यशस्वी महिलांना सुद्धा हा पुरस्कार देण्याचा प्रस्ताव आहे.

समाजातील मतिमंद, अपंग, मागासवर्गीय, सर्व उपेक्षित घटकांतील नागरीकांना महापालिका सहकार्य करते. ब-याचशा प्रस्तावित योजना आहेत. एचआयव्ही किंवा एडस् ग्रस्त मुले ज्यांना त्यांच्या आई-वडीलांकडून हा आजार झाला आहे, त्यांना विशिष्ट प्रकारच्या आहारासाठी, उपचारांसाठी खर्च करावा लागतो. त्यासाठी योजना राबवावी. याबाबतीत

पदाधिका-यांशी चर्चा करुन ० ते १८ या वयोगटातील एडस् ग्रस्त मुलांसाठी शारिरीक आरोग्य सुधारण्यासाठी मुलांना मदत द्यावी. दरमहिना रु.१,०००/- सहाय्य देण्याची योजना करतोय. अर्जदार व्यक्तीला एचआयव्हीग्रस्त असल्याबद्दल महापालिकेच्या वायसीएमचे सर्टिफिकेट लागेल. किंवा शासनाचे सक्षम वैद्यकीय प्रमाणपत्र लागेल.

अशा १० योजना करायचा प्रस्ताव मा.महिला बालकल्याण समितीमार्फत सभागृहापुढे सादर करतोय. आत्ता सन्मा.सदस्यांनी मुद्दा काढला होता, वारंवार अर्ज मागविले जातात. सूचना मागवली होती. अपंगांबाबतीत योजना असेल, मतिमंदांबाबतीत योजना असेल, यासाठी अपुरे अर्ज मागविता येत नाहीत. त्यांनी दरवर्षी हयातीचा दाखला द्यायचा आहे. वर्षातून दोन वेळा अनुदान देतोय. मतिमंद यांना यापूर्वी चेक दिला आहे. या योजनेअंतर्गत ज्या संस्था ही सुविधा घेत असतील तर या मुलांच्या खात्यात हे चेक डायरेक्ट जमा करणार आहोत. बरेचसे लाभार्थी मुदत संपल्यामुळे वंचित राहतात. अशीही तक्रार होती. याबाबत खालील प्रकारच्या योजनांचा कालावधी १ एप्रिलपासून काढून टाकला आहे. नागरीक केव्हाही अर्ज करु शकतील. याबाबत आदेश काढला आहे आणि सन्मा.सदस्यांनासुद्धा पत्र दिले आहे. या योजनांसाठी महापालिकेकडे अर्ज करण्यासाठी वर्तमानपत्रांत जाहीरात येण्याची, वाट पाहण्याची गरज नाही. ते वर्षभरात केव्हाही अर्ज करु शकतात असे करतोय. फक्त लाभ देताना तिमाही देणार आहोत. प्रत्येक वेळी खर्चासाठी स्थायी समितीची मान्यता घ्यावी लागेल. यात मी योजनांची नावे वाचतो.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, कुलकर्णी साहेब प्रभागांत तुमचे आदेशपत्र अजूनही गेलेले नाही. तिथे ते लोकांना स्पष्ट सांगतात. पेपरमध्ये बातमी आली होती आणि तुम्ही सांगताय, ते सभागृहातले उत्तर यात खूप मोठी तफावत आहे. प्रभागांत अजून अर्ज स्विकारत नाहीत.

**मा.कुलकर्णी (सहा.आयुक्त)** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य, बारमाही अर्ज करण्यासाठी दि. १ एप्रिलपासून सुरुवात करतोय. २६ जानेवारीनंतर सहा प्रभाग झाले. महापालिकेच्या सहाही प्रभागांमध्ये बारमाही अर्जांचे नमुने उपलब्ध राहतील, वेबसाईटवर सुद्धा उपलब्ध राहतील अशी व्यवस्था करतोय. केव्हाही अर्ज करण्याची मुभा दि.१ एप्रिल नंतर १) ३ वर्षे पूर्ण झालेल्या बचतगटांसाठी तीमाही अर्ज थेट करु शकतील, २) महिला संस्थांना पाळणाघरे सुरु करण्यासाठी केव्हाही अर्ज करता येईल, ३) परदेशातील उच्च शिक्षणासाठी निवड झालेले व्यक्ती ४) विधवा किंवा घटस्फोटीत महिलांना अर्थसहाय्य, ५) एक किंवा दोन मुलींवर कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया करणा-या महिलांना अर्थसहाय्य ६) मुलगी दत्तक घेणा-या कुटूंबाला अर्थसहाय्य, ७) अस्तित्व योजना – घरबांधणीसाठी/घरदुरुस्तीसाठी अर्थसहाय्य ८) अंध/अपंग व्यक्तींना व्यवसायासाठी अर्थसहाय्य, ९) कुष्ठपिडीत व्यक्तींना दर महिना अर्थसहाय्य, १०) ५ वर्षापुढील मतिमंद मुलांचा सांभाळ करणारे नागरीक हे केव्हाही अर्ज करु शकतील. त्यांना मनपाचे अर्ज मागवण्याची वाट पहायची गरज नाही.

**मा.आशा शेंडगे** – मा.महापौर साहेब, महिला बाल कल्याणच्या एकूण किती योजना आहेत याची माहिती मिळण्याची मला अपेक्षा आहे.

**मा.कुलकर्णी (सहा.आयुक्त)** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सदस्य, आजपर्यंत एकूण चालू असलेल्या योजनांची संख्या २२ आहे. नवीन योजना चालू करतोय. त्यांची अंमलबजावणी करतोय. महिलांना चार चाकी वाहनाचे प्रशिक्षण देण्याची योजना सुरु केली आहे. ही योजना महापालिकेमार्फत चालू असणार आहे. बालवाडीतील मुलांना सकस, पोषक आहार देण्याची योजना, महिलांना स्वसंरक्षणासाठी कराटेचे प्रशिक्षण देण्याची योजना या तीन योजना वाढीव होऊ शकतील.

**मा.आशा शेंडगे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, यात स्वयंरोजगारासाठी विविध व्यवसाय प्रशिक्षण या अंतर्गत महिलांचे कोर्सेस घेतले होते. ज्यांनी आजपर्यंत प्रशिक्षण घेतले आहे, त्यांनी पुढे काय केले आहे?

**मा.कुलकर्णी (सहा.आयुक्त)** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सदस्य, कौशल्यवाढ व्हावी म्हणून प्रशिक्षण चालू आहे. स्थायी समितीने निर्णय घेतल्यानंतर १२ कोर्सेस निश्चित केले आहेत. त्यांचा प्रशिक्षण कालावधी, अभ्यासक्रम, किमान शैक्षणिक पात्रता यास आयुक्त साहेबांची मान्यता घेतली आहे. संस्थांशी करारनामा करावा, त्याप्रमाणे कार्यालयात आदेश देण्यात येतील. या महिन्याच्या अखेरपर्यंत प्रशिक्षण सुरु होईल.

**मा.आशा शेंडगे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, महिला बाल कल्याणच्या ज्या योजना आहेत, त्यांची माहिती अधिकारात माहिती मागितली होती. मी मा.पठाण ताईंचे फार आभार मानते. त्यांनी माझे नाव घेऊन सांगितले, आमचा पाठपुरावा योग्य कसा आहे. त्यांच्यासारख्या ज्येष्ठ नगरसेविकेकडून शाबासकीची थाप मिळते. दि.२८ फेब्रुवारी २०१३ रोजी मी खरेतर महिला बालकल्याणमध्ये रक्कम भरली आहे. रक्कम भरून पाऊणे २ महिने उलटून सुद्धा मागितलेल्या माहितीपैकी सगळी माहिती मला आजपर्यंत का दिली जात नाही. रु.९४,०००/- भरल्यानंतर ४७,००० प्रती कधी येतील, त्या आजपर्यंत मला का देण्यात आल्या नाहीत. प्रत्येक वेळी आम्ही इथे यायचे, काहीतरी सांगायचे. आणि सांगायचे आम्हाला विरोध करण्यापेक्षा वेगळे काही जमत नाही, असे निश्चित नाही. महिला बालकल्याणच्या योजनांमध्ये जे बदल सुचविले आहेत, ते निश्चितच कौतुकास्पद आहेत. जिथे चोरी दिसते आहे, ती उघड करायची जबाबदारी सुद्धा आमची आहे. आमच्यावर इतके घाणेरडे आरोप होतात, शहरात उकिरडे निर्माण केले आहेत ते शोधायची आमची जबाबदारी आहे. प्रशासन स्वच्छ करायचे काम करणारे होते तर मला माहिती का दिली गेली नाही. मी अपिलात गेले असते तर मला या प्रती फुकट द्याव्या लागल्या असत्या. अपिलात जाणे म्हणजे त्यांना संधी देणे, वेळ देण. रु.९४,०००/- भरले तरी मला आजपर्यंत एकही कागद देण्यात आलेला नाही. अहिवले यांचा रुबाब पहा. ५/६ वेळा पत्रे आलीत. अतिरिक्त आयुक्त याचे साक्षीदार आहेत. स्थायी समितीच्या हॉलमध्ये मी खाली बसले होते त्यावेळी तुम्ही ३ तारखेला देतो म्हणाले होता. २३ तारीख उलटली. नंतर ७ तारखेला देतो म्हणाले. ७ तारीख देखील उलटली तरी आजपर्यंत मला माहिती दिलेली नाही. त्याऐवजी मला विभागातून पत्रे येतात, तुमची माहिती तयार आहे घेऊन जा. म्हणजे मी माहिती घेऊन जात नाही असे दाखवण्याचे प्रयत्न महिला बालकल्याण विभागाकडून केले जात आहेत. मी कोणताही

आरोप स्विकारलेला नाही. आशाताईंना ४ वेळा फोन केला. त्या घ्यायला येत नाहीत असे पत्रकारांसमोर सांगत होते. रु.९४,०००/- भरल्यानंतर निर्लज्जपणे सांगतात, तुमची माहिती घेऊन जा. तुम्हाला शक्य होत नव्हते तर त्याच वेळी सांगायचे होते, आमच्याकडे तशी व्यवस्था नाही. ४ महिने ऐवजी ६ महिने सांगायचे होते. माहिती अधिकारात पैसे भरुन घेता, तर तुम्ही त्या त्या वेळी माहिती देणे लागता. साडे सहा लाख रुपयांची माहिती घ्यावी लागेल असे सांगतात. एखाद्याने माहिती अधिकारात माहिती मागवायचा प्रयत्न केला तर आकडा दाखवून घाबरवायचे म्हणजे माहीती घेतलीच नाही पाहीजे. मधल्या कालावधीत वेगवेगळ्या प्रकारे प्रेशर आणले जाते, धमक्या दिल्या जातात, दमदाटी दिली जाते, मी कोण आहे बरे का असे अयोग्य शब्द वापरले जातात. हे ऐकून घेण्यासाठी आम्ही इथे निश्चित येत नाही. आम्ही सुद्धा निवडून आलेलो आहोत. काहीजण आमचे उंबरठे सुद्धा झिजवतात. खरेतर कुलकर्णी साहेब तुम्ही सांगताय त्या अटी मंजूर आहेत. मान्य आहे आम्ही विरोधी पक्षात आहोत. मी किती दिवसांपासून पाठपुरावा करते आहे. विषय मंजूर झाला होता, त्यांच्या अटी ठरल्या होत्या मग विरोधी पक्षाचे कोणी आलेतर वळायचे नाही. पण आम्ही स्वबळावर निवडून आलो आहोत हे सुद्धा तुम्ही लक्षात घेतला पाहीजे. सगळ्या नगरसेवकांना पक्ष आहे असे म्हटले तरी अधिका-यांना निश्चितपणे पक्ष नसावा अशी अपेक्षा आहे. जेव्हा अटी निश्चित होतील त्यावेळी पर्सनली सांगितले होते. याप्रकारे योजनांसाठी १२ वी पासची अट होती नंतर १० वी पासची अट केली असतीतर इतक्या अडचणी वाढल्या नसत्या, विषय वाढला नसता. मी आज माहिती अधिकारात जी माहिती मागितली आहे त्याचे पैसे साडेसहा लाख इतके होतील हे सांगितले गेले असते तर, निश्चितपणे आपण पाने मोजली असतील. आपल्याकडे महापालिकेत असणा-या झेरॉक्स मशीन किती प्रती एका वेळेला काढू शकतात याची आपल्याला कल्पना असणार आहे. आपल्याकडे जर प्रती द्यायची क्षमता नव्हती तर एवढे पैसे भरायला सांगायचे नव्हते. कुलकर्णी साहेब आपण एक जाणकार अधिकारी असताना तुमच्याशी विचारणा करुन, तुम्ही म्हणता माझा व माहिती अधिकाराचा काही संबंध नाही निश्चितपणे तसे असेलतर सगळ्या गोष्टी सांगितल्या होत्या. मग एवढी रक्कम भरायला लावणे योग्य नाही. एवढ्या झेरॉक्स काढायची क्षमता आपल्याकडे नाही. आयुक्त साहेबांनी तुम्हाला निर्देश दिले होते की, तुम्ही चांगल्या प्रकारची मशीन आणा. सदस्यांची माहिती ४ तारखेपर्यंत देता येईल अशी मशीन मागवा. तुम्ही कोणत्या प्रकारची मशीन मागवलीत. दीड महिना उलटून गेल्यानंतरही आपण माहिती देण्यास तत्पर नाहीत. ज्यावेळी मी माहिती अधिकारात पत्र दिले त्यावेळी सन्मा.नगरसचिव हे या विभागात माहिती अधिकारी होते. त्यांची सुदैवाने यातून सुटका झाली. इतकी वर्षे सगळा खेळ त्यांनी रचला रचला, आता मोठा गोलमाल झाला आहे. आज त्यांची त्यातून सुटका झाली आहे. हे सगळ्यांना माहित आहे, ज्यावेळी विषय येईल, त्यावेळी त्यांची काय अडचण होईल. ज्याप्रकारे माहिती दाबायचा, तोंड बंद करायचा प्रयत्न केला जातो. अतिशय निषेधार्ह गोष्ट आहे. ज्या शैक्षणिक अटी ठेवल्या आहेत, खरेतर चर्चेला या गोष्टी याव्यात. ज्यावेळी आयुक्तांनी सांगितले, जे १२ कोर्सेस आहेत. महिला प्रशिक्षण असेल, बालवाडी शिक्षक असतील, इंग्लिश स्पिकींग असेल, विविध कोर्सेस असतील, त्यांना कोणतीही शैक्षणिक अट न ठेवण्यासाठी विषय मंजूर करतो. मी हे आयुक्त साहेबांच्या निदर्शनास आणून दिले की कशा प्रकारे भ्रष्टाचार केला जातो, कसे पाणी मुरते. हे मी सांगितल्यावर आयुक्त साहेबांनी क्षणाचाही विलंब

न करता सांगितले, इथे शैक्षणिक अटी असल्या पाहीजेत. आयटीआय, बाल उद्योजक केंद्र बघा, यशवंतराव चव्हाण मुक्तविद्यापीठ बघा इथे हे कोर्सेस चालतात. आपल्या नागरीकांवर भरपूर पैसा खर्च करायची चांगली भावना असली तरी तिथे शैक्षणिक अट असणे गरजेचे आहे. हेच सांगितले होते, त्यासाठी ६ महिने कॉम्प्यूटर कोर्स करायला वेळ का लागला. पिंपरी चिंचवडमधील नागरीकांना का वंचित ठेवले हा मोठा प्रश्न आहे. आयटीआयमधील साधे गवंडी कामाचा कोर्स करणा-या व्यक्तीला सुद्धा ८वी पासची पात्रता लागते. त्या कामासाठी डोके लागत नाही. तो घेतले की सिमेंट मारतो, हातातल्या साहीत्याने प्लेन करतो. त्यासाठी सुद्धा अट ठेवतात. आम्ही मात्र इथे सांगतो, वेगवेगळ्या कोर्सेससाठी अट लागत नाही. अट ठेवू नका. याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही,आपल्याही शहरातील नागरीकांना वेगवेगळे कोर्सेस करायला मिळाले पाहीजेत. त्यांचा पैसा त्यांच्यावरच खर्च झाला पाहीजे. त्यांच्यावर खर्च होत असताना एखादी संस्था येते, २०१० पासून त्या संस्थेने महापालिकेला कारभाराला गळती लागायला सुरुवात केली. बघता बघता मोठे भगदाड करुन ठेवले आहे. एकच रेशन कार्ड त्यावर १०/१० लाभार्थ्यांना त्यात दाखवले आहे. लाभ घेत असताना ख-या अर्थाने जे गरजू घटक आहेत, ज्यांची पात्रता आहे, त्यांच्यापर्यंत या योजना गेल्या पाहीजेत. इतर संस्थांना, ठेकेदारांना मोठे करण्यासाठी महापालिका नाही याची जाण सगळ्यांमध्ये येथे असली पाहीजे. अधिका-यांना मनापासून विनंती आहे, कोणतीही गोष्ट लपवून ठेवायचे कारण नाही. आपण समाजहितासाठी येथे येतो. मला आजही माहिती दिलेली नाही. सभागृहात निश्चितपणे तुमचा निषेध करते. इतके वेळा पाठपुरावा केला. महिला बाल कल्याणच्या लोकांनी कधी विषय करुन घेतला आहे. शैक्षणिक अटी फायनल करण्यासाठी १५ दिवसांचा कालावधी पुरेसा आहे. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाशी डिल करा. मोठमोठ्या संस्थांना विचारणा करा. आपण ५/६ महिने घालवले. यात कोणत्याही प्रकारचा भ्रष्टाचार होऊ नये म्हणून तळमळ होती. आजही सांगितले होते. मला माझी माहिती कधी मिळणार आहे.

**मा.सविता साळुंके** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आपल्याला चांगले माहित आहे, प्रत्येक नागरीक व नगरसेवक यांना जोडणारा असा नागरवस्ती हा विभाग आहे. आत्ता २ वर्षे झालीतरी आयुक्त साहेब तुमच्याकडून काम होत नाही. सन्मा. सदस्यांनी सांगितले. आमच्या सारख्या सदस्यांना वॉर्डात फिरायला लाज वाटते. आम्ही कुबड्यांचा आधार घ्यावा तसे नागरवस्ती विभागाच्या विविध योजनांमार्फत लोकांसमोर जात असतो. ९० टक्के नगरसेवकांसमोर हेच प्रश्नचिन्ह आहे, आम्ही कशाला निवडून आलो आहोत. नागरवस्ती विभागाचे कामकाज पाहीलेतर प्रत्येक नगरसेवक सांगेल, किती योजना चांगल्या पद्धतीने केल्या आहेत. एकही योजना दोन वर्षांत राबवित नसाल तर अधिकारी कशाला काम करतात. नागरवस्ती विभागातून जास्तीत जास्त महिलांचे काम केले होते. या दोन वर्षांत नावे फायनल केली नव्हती. बचत गटांना अजूनही अनुदान मिळालेले नाही. स्किम राबवायचे म्हटले तर ही अट आहे, या शर्ती आहेत. आत्तापर्यंत किती नगरसेवकांच्या वॉर्डात प्रशिक्षणाचे कोर्सेस झाले आहेत, अनुदान दिले गेले आहे. कुलकर्णी साहेबांनी सगळ्याची फोड करुन सांगितले आहे. मागासवर्गीय कल्याणकारी योजनेबाबतीत पाठपुरावा केला. मा.शहर सुधारणा समितीमार्फत ज्या योजना राबवायच्या याबाबत गावडे साहेबांना विचारले तर ते टोलवाटोलवी करतात. अधिकारी

काय सांगतात, या योजना राबवतोय. महापौर साहेब आपण सुद्धा किती वेळा पाठपुरावा केला आहे. तुम्हाला चांगले माहित आहे. असे असूनही कारभार सुधारत नसेल तर नागरीकांबरोबर संबंध ठेवण्यासाठी उपयुक्त असा हा विभाग आहे. बाकी विकास कामे झालेली नसतील तर आम्ही नगरसेवकांनी नागरीकांसमोर कसे जायचे हा आमचा प्रश्न आपण सोडवावा.

**मा.शमीम पठाण** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, कोणतीही योजना बंद नाही असे कुलकर्णी साहेबांनी सांगितले आहे. सर्वांना माहित आहे, शिवण क्लास, रेडिमेड गारमेंट यांचे प्रशिक्षण बंद आहे. हे प्रशिक्षण तुम्हीच बंद करायला लावले होते. आत्ता ही योजना बंद आहे. या योजनेमुळे महिलांना खरोखरच काही कला शिकता येते, त्यांना प्रशिक्षण मिळते. ती योजनाच बंद आहे. आत्ता कुलकर्णी साहेबांनी जे सांगितले, ते खोटे आहे. कोणतीही योजना बंद करु नका. त्या चालू कराव्यात अशी उपसूचना मी पुन्हा देणार आहे. या योजनांसाठी विधवा महिला येऊ द्या किंवा कोणीही असू द्या. पिवळे व नारंगी या दोन प्रकारची रेशन कार्ड असणारे असावेत असे सांगितले आहे. पांढ-या रेशन कार्डाला एक लाखापुढील उत्पन्नाची अट आहे. एखाद्या कुटूंबात कर्ता पुरुष गेलातर त्या कुटूंबाचे उत्पन्न कमी होते. याठिकाणी १० वेळा जरी रेशन कार्डच्या ऑफिसपाशी गेलोतरी महा-ई सेवा केंद्रांत गेलोतरी हवे ते रेशन कार्ड हरवले तर ते बदलून किंवा उत्पन्न कमी करुन मिळत नाही. आम्ही तिथे जात असतो. म्हणून कर्त्या पुरुषाच्या मृत्यूचा दाखला दिलातरी आपण त्या महिलेचा अर्ज स्विकारावा असे सांगावेसे वाटते. १ लाख उत्पन्नाची मर्यादा आहे म्हणून आम्हाला नको आहे. आत्ता पक्षनेत्यांनी सांगितले, कोणाला हौस नसते. पण आमच्यासारखे काही उत्साही प्रतिनिधी असतात. कोटी कोटींच्या घरांत सुद्धा मशीन नेऊन देतात. हा भाग वेगळा. मी सँक्शन केले म्हणून नाही. १ मुलगी असेल तर रु.२५,०००/-, २ मुली असतील तर रु.१०,०००/-. ज्यांना २००७ नंतर मुली झाल्या असतील अशांसाठी ही योजना २००९ पासून सुरु केली आहे. कोण असे आहे मुलगी १/२ वर्षाची झाल्यानंतर लगेच फॅमिलि प्लॅनिंग करेल व तुमच्याकडे अर्ज करेल. केला असेल तर त्यांना रु.२५,०००/- पर्यंत अनुदान नक्की करावे. गोरगरीबांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचत नाही. एकतर त्यांची टेंडन्सी नसते. आरोग्य सेवा त्यांच्या घरापर्यंत पोहचत नसल्यामुळे एवढे लवकर फॅमिली प्लॅनिग करणार नाहीत. ही योजना तशी फसते आहे. २००७ पूर्वी ज्या महिलांना १ किंवा २ मुलींवर फॅमिलि प्लॅनिंगचे ऑपरेशन केले आहे. अशा महिलाच नाहीतर महिला व पुरुष दोघांसाठी ही योजना करावी. दोन दोन बायका असतील, मूल होत नाही म्हणून दुसरी बायको केली असेल तर त्यांच्यासाठी सुद्धा ही योजना राबवावी. मी विनंती करते, १) १२वी नंतर पदवी/पदविकेस प्रवेश घेणा-या मुलींना अर्थसहाय्य दिले जाते. या योजनेसाठी फ्रि सीटची अट घातली आहे. ज्यांना कॉलेजमध्ये फ्रि सिटमधून प्रवेश मिळाला आहे. ९० टक्क्यांपेक्षा जास्त टक्के असतील तर फ्रि सीटमध्ये प्रवेश मिळतो. मला वाटत नाही कोणाला या योजनेतून लाभ मिळत असेल. अशा मुलींना देणार असाल तर ही योजना तुम्हाला राबवायची नाही. फक्त कागदोपत्री ही योजना ठेवायची आहे असा याचा अर्थ निघतो. फ्रि सीटची ही अट न ठेवता विद्यार्थिनींना ६० टक्यांपेक्षा अधिक गुण असतील तर त्यांना या योजनेचा लाभ देण्यात यावा. योजना क्र.५ मध्ये – बचत गटांना ३ वर्षे झाल्यानंतर त्यांना अर्थसहाय्य देणार आहात. श्रीमंत महिलांना बचत गट करण्यात रस नसतो. गोरगरीब महिला बचतगट स्थापन करतात. अशा महिलांसाठी १ वर्ष खूप आहे. धुणीभांडी करणा-या महिलांना बचत करायची सवय लागते.

म्हणून पूर्वीप्रमाणे १ वर्ष मुदत झाल्यानंतर त्यांना आर्थिक अनुदान द्यावे अशी उपसूचना मांडते. योजना क्र. ७ साठी – संगणक प्रशिक्षण प्रभागातील अस्तित्वात असलेल्या महापालिकेच्या इमारती देण्यात याव्यात. मोरवाडी किंवा आकुर्डी इथे जाणे शक्य असते. आत्ता नगरसदस्या आशा शेंडगे यांनी सांगितले. काही प्रशिक्षणांसाठी शैक्षणिक अटी असाव्यात. परंतू सर्व प्रशिक्षणांसाठी शैक्षणिक अट ठेवू नका. प्रत्येकाने संगणकीयदृष्ट्या प्रशिक्षित व्हावे हाच शासनाचा उद्येश्य आहे. आपला सुद्धा हाच उद्देश्य असावा. शिलाई कामासाठी शिक्षणाची अट असावी हे योग्य नाही. पूर्वी वितावरही महिला उत्तम प्रतीचे शिवण करतात. योजना क्र.१० साठी – एचआयव्ही एडस् ग्रस्त मुलांचे वय १८ पर्यंत ठेवले आहे. ० ते १८ वयोगटातील एडस् ग्रस्त मुलांनाच फक्त अर्थसहाय्य देणार आहोत का. त्यांची फार दयनीय अवस्था आहे. हा विषय घेतला त्याबद्दल प्रशासनाचे मनापासून अभिनंदन करते. १८ वयोगटापर्यंत ही योजना आहे. त्याऐवजी जसे मतिमंदांना अर्थसहाय्य देतो आत्ता सांगितले त्याप्रमाणे या योजनेसाठी १८ वयाची मर्यादा नको. महिलांना एडस् झाल्यानंतर कळते. माझ्या प्रभागांत अशा महिला आहेत. त्यांची माणसे निघून गेली आहेत. विधवा महिला जिला भिक्षा घेतल्याशिवाय पर्याय नाही अशा महिलांना कोणतीही अट न घालता अर्थसहाय्य मिळावे. तसेच आर्थिक मदत देताना कोणत्या संस्थेत जाऊन मिळवायची. सार्वजनिक विश्वस्त कायदा १९६० अन्वये अशी संस्था अधिकृत असणे आवश्यक आहे. त्या संस्थेत ही मुले निवासी असावीत अशी अट घातली आहे. तुम्ही संस्थांना वेगळे अनुदान द्या. परंतू अशा स्त्रियांसाठी सुद्धा योजना करावी. शासकीय रुग्णालयाचे सर्टिफिकेट असेल तर अशा एडस् बाधीतांना अनुदान द्यावे अशी उपसूचना करते. कोणतीही योजना बंद केलेली नाही, याबद्दल पुन्हा एकदा धन्यवाद देते. ड्रायव्हींग प्रशिक्षणाला सुरुवात करणार आहोत, ते आचारसंहिता सुरु होण्यापूर्वी लवकर सुरु करावे.

**मा.स्वाती साने** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आपण मशीन द्यायची योजना बंद केलीत. खरेतर ही योजना पुन्हा सुरु करावी. सगळीकडे नवीन समाविष्ट गावांत खरोखरच गरज आहे. ही योजना सगळ्यांसाठी सुरु करावी. २०१२ मध्ये निवडणूका झाल्या. आचारसंहिता झाल्यानंतर शिलाई मशीन द्यायची म्हणून फॉर्म भरुन घेतला नाही. अशा महिलांना शिलाई मशीन्स देण्यास परत सुरुवात करावी अशी विनंती करतो. महिला माझ्या घरी येऊन खूप त्रास देतात. महिलांना शिलाई मशिन मिळणे बंद झाले आहे. ज्यांनी यापूर्वी फॉर्म भरले होते, त्यांचे फॉर्मस् परत घेण्यात यावेत.

**मा.अनिता तापकीर** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, शिलाई मशिनचा प्रश्न काढला आहे, त्याबद्दल अभिनंदन करते. खरोखरच शिलाई मशीन स्त्रियांसाठी गरजेच्या ठरलेल्या आहेत. जेव्हा वॉर्डात फिरतो, तेव्हा या स्त्रियांचे मत आम्हाला मिळत असते. या स्त्रियांना सर्टिफिकेट दिले आहे. साने ताईंनी सांगितले तसेच करावे. आमच्या वॉर्डातली कामे होत नाहीत. कामे तरी व्हावीत. आम्हाला ५० टक्के आरक्षण मिळाले आहे त्याचा काहीतरी फायदा आम्हाला व्हावा. आमचा टाळू कुठेतरी भरावा.

**मा.निता पाडाळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आमच्या भागात एमएससीआयटीचे कुठेही एकही केंद्र नाही. चिंचवडला केंद्र दिले आहे. महिलांचे जाण्यायेण्यातच रु.६,०००/- जात

असतील तर हा कोर्स त्या करु शकत नाहीत. मी स्थायी समितीची सभासद असताना सुद्धा याविषयी वारंवार सांगितले होते. काळेवाडी, थेरगाव, रहाटणी या भागासाठी एकतरी केंद्र सुरु करावे. च-होली इथे पण केंद्र सुरु करावे. ज्या संस्था महिलांना व्यवसाय प्रशिक्षण देतात, त्यांच्यावर महापालिकेचे अजिबात वर्चस्व नाही. ही संस्था अजिबात व्यवस्थित काम करत नाही. ज्या महिला प्रशिक्षण घेतात, त्यांना रु.४०० ते रु.५०० द्या असे म्हणतात. महिलांना ब्युटीपार्लरच्या कोर्सचे अजून सुद्धा सर्टिफिकेट मिळालेले नाही. महिला नाव देतात. कोर्ससाठी उपलब्ध नसतात. संस्था भरपूर संख्या दाखवत असतात. मी वारंवार दाखवून दिले आहे. परंतू ठराविक महिलाच प्रशिक्षण घेतात. त्याच फाईल तयार करतात. त्यामुळे चांगल्या प्रकारचे प्रशिक्षण महिलांना मिळत नाही. आपल्या अधिकारी असला पाहीजे, त्याने व्हिजिट करुन स्वतः लक्ष दिले पाहीजे. आपण काहीच पहात नाहीत. हे चुकीचे आहे. महापालिकेचा पैसा जातोय. त्याकडे आपले लक्ष पाहिजे आहे.

**मा.श्रीरंग बारणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर मी वेगळ्या गोष्टींकडे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. मा.निताताई पाडाळे यांचे अभिनंदन करेल की त्यांनी हा विषय सभागृहात मांडला. अशा योजना मुळात कोणासाठी चालू राहतात. गेल्या २/४ वर्षातील योजनांवरील तपशिल तुम्हाला सांगतो. स्वयंरोजगार योजनेसाठी गेले ४ वर्षात रु.४२,२८,८५,६००/- इतका खर्च झाला आहे. सायकल वाटपासाठी रु.३,१७,५८,०००/- खर्च झाला आहे. शिवणयंत्रासाठी रु.६,२९,०३,०००/- खर्च झाला आहे. मा.महिला बालकल्याण योजनेअंतर्गत या वर्षी अंदाजपत्रक रु.३२,४४,००,०००/-, गेल्या वर्षी रु.२४,६५,३९,०००/- खर्च केला आहे. माझा अंदाजपत्रकाला विरोध नाही. खर्च करण्याला विरोध नाही. परंतू या योजनेअंतर्गत ठेकेदार पोसण्याचे, संस्था पोसण्याचे काम अधिकारी करतात. माझा याला विरोध आहे. मा.निता पाडाळे यांनी सांगितले, प्रशिक्षण देताना ज्या नावांची लिस्ट असतात, त्या बोगस असतात. ज्या संस्था बोगस लिस्ट करुन महापालिकेकडून पैसे उकळतात, त्यांच्यावर कोणाचे तरी कंट्रोल असले पाहीजे. संगणक प्रशिक्षणाच्या नावाखाली अनेक वर्षांपासून महापालिकेची लूट चालू आहे. महिला भगिनी सभागृहात शिवण यंत्रे दिली पाहीजेत म्हणून आग्रह करतात. ज्यांचे नाव लिस्टमध्ये आहे, त्यांच्या घरी शिवणयंत्रे आहेत का ते पहा. काही महिला भगिनींनी शिवण यंत्र सुद्धा विकले आहे. आपण सभागृहात भावना व्यक्त करतो. देण्यामागे आपली भावना चांगली असते. त्या भोवनेची कदर काही मंडळीं करत नाहीत म्हणून शासकीय योजना राबवित असताना महापालिकेच्या अधिका-यांनी या योजना कागदावरच्या योजना होऊ नयेत यासाठी प्रयत्न करुन योजना राबविल्या गेल्या पाहीजेत. जो खर्च होतो तो सर्वसामान्य माणसासाठी होत नाही. कुटूंबावर खर्च होत नाहीतर, लाभार्थ्यांवर खर्च होत नाही. तो केवळ ठेकेदार, संस्था यांच्यावर खर्च होतो. यावर्षी महिलांची गुणवत्ता वाढीसाठी खाजगी क्लासची फी देण्यासाठी किती खर्च केला आहे, फक्त रु.१५,०००/- खर्च केला आहे. मागासवर्गीय कल्याणकारी योजनेअंतर्गत ज्या मुली शिकतात. त्यांच्या शिक्षणाचा खर्च द्या. क्लासची फी दिली जाते ती रक्कम वाढवा. भरीव खर्च करा. परदेशात शिक्षणासाठी दोन/चार लाख खर्च करा. ज्यांची आर्थिक परिस्थिती नाही त्यांच्यावर खर्च करा. पुढील बजेटमध्ये अधिक तरतूद करा. परंतू केवळ पाहीलेतर बजेटमध्ये जो खर्च होतो आहे तो कोणी व्यक्ती किंवा संस्था बघून होतो आहे. प्रामुख्याने ज्या व्यक्तींची

नावे लिस्टमध्ये दिली आहेत, त्यांच्यावर खर्च होत नाही. म्हणून या त्रुटी आहेत. शिवणयंत्रे दिली पाहीजेत भावनेच्या आहारी जाऊन म्हणतो. जवळपास ३ वर्षांत रु.६,२९,००,०००/- ची शिवण यंत्रे दिली आहेत, त्यांची चौकशी केली पाहीजे. याठिकाणी बसणा-या कोणाचा हा पैसा नाहीतर करदात्यांचा पैसा आहे. त्यांचादेखील विचार केला गेला पाहीजे. स्वयंरोजगार योजनेअंतर्गत जे वर्ग चालविले जातात. त्यांना महापालिका अनुदान देते. त्यांचीदेखील चौकशी केली आहे का. त्यांना कोण पाठिशी घालते. त्या संस्थांचे खरे चालक वेगळा असतो. त्यांचा मालक वेगळाच असतो. प्रत्यक्षात लाभार्थ्यांना त्याचा लाभ मिळत नाही. अशांपासून महापालिकेची लूट होते ही लूट कुठेतरी थांबवावी. यासाठी सगळ्या महिला बालकल्याण योजनेअंतर्गत योजनेसंदर्भात तुम्हाला सूचना केल्या आहेत.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आज याठिकाणी महिला बालकल्याणच्या विविध योजना राबवतोय. या विभागाकडून राबवल्या जाणा-या योजनांमध्ये एका योजनेचे नाव आहे, स्वयंरोजगार प्रशिक्षण देणे. एमकेसीएलमार्फत योजना राबवितात असे सांगितले. ५ केंद्रे आहेत हेही आपण सांगितले आहे. इथे मा.उल्हास जगताप सभागृहातच आहेत. मागील पंचवार्षीकमध्ये जे स्थानिक स्वराज्य संस्थेचे कोर्सेस राबविले. माझ्या घरापाठिमागे परम कम्प्यूटर कडून एमएससीआयटी, डिटीपी, टॅलीचे कोर्सेस मोफत न शिकविता प्रायव्हेट कम्प्यूटर इन्स्टिटट्यूटमध्ये पैसे भरुन शिकायला जाणा-या विद्यार्थ्यांच्या नाव तिथे दाखवले होते. दूर्दैवाने त्या इन्स्टिटट्युटच्या बिल्डींगमध्ये जे राहतात त्या मुलींचे नाव त्यात होते. ती मला म्हणाली आण्टी मला सर्टिफिकेट मिळाले आहे. हे कसे काय झाले. मला महापालिकेच्या कोर्सचे सर्टिफिकेट मिळाले असे तिने सांगितले.. माझे खाडकन डोळे उघडले. माझ्या घराच्या पाठिमागे परम नावाची संस्था आहे. तिथे पैसे भरुन विद्यार्थ्यांना शिकवले जाते आहे. या संस्थेवर आपण रु.५० लाखाचे बील अदा केले आहे. हा विषय समोर आल्यानंतर आजही ही संस्था आपल्याकडे काम करते आहे. डीटीपी, टॅली हे कोर्सेस ज्या ज्या ठिकाणी शिकवण्याची योजना राबविली आहे, त्याठिकाणी लाभार्थ्यांना हे कोर्सेस खरेच शिकविले जातात का याचे व्हेरिफिकेशन आपण करतो का, नाही करत. परमचे कुठलेही स्वतंत्र ऑफिस नव्हते. मागील वर्षी कोणतेही स्वतंत्र ऑफीस नव्हते. महिला सक्षमीकरण या गोंडस नावाखाली महापालिकेची लूट चालू आहे. हे कधी थांबणार आहे. खरेतर जी कोणतीही संस्था असेल तर हा कोर्स केला तरी काय हरकत आहे. स्वयंरोजगार मिळवून दिला पाहीजे. नियम, अटी शर्तींचे कसे काय काम करु शकतो. त्याच मुलींच्या करारनाम्यात अट सुद्धा घातली आहे. स्वयंरोजगार संस्थेचे काम असताना किती महिलांना रोजगार मिळवून दिला याची शहानिशा आपण कधी केली का. नुसते प्रशिक्षण देतो सांगताय. खरेतर स्पोकन इंग्लिश कोर्ससाठी आपण एकही अट ठेवली नव्हती. मा.आशा शेंडगेसारख्या नवीन सदस्या ज्या स्वतः शिक्षिका आहेत. त्या म्हणाल्या की स्पोकन इंग्लिश कोर्ससाठी काहीच अट नाही. त्यांच्याच मागणीप्रमाणे आपण ७वी पासची अट घातली आहे. मी मराठी मिडीयममधून १२ वी केले व नंतर डिप्लोमा केला तरी आजही चार ओळी इंग्लिश फटाफट बोलू शकत नाही. डिप्लोमाला सगळे विषय इंग्लिषमध्ये होते. जर मला बोलता येत नाही. बोलायला अडचण येते. पूर्णपणे बोलायला जमत नाही. ७ वी पास असलेल्यांना स्पोकन इंग्लिश कोर्स द्यायचा म्हणताय, नेमके कोणाचे हित

साधताय. लाभार्थ्याचे का संस्थेचे. माझा शिक्षणाला विरोध नाही. पुन्हा त्यामध्ये सुशिक्षित वर्ग सुद्धा चालवा. एबीसीडी शिकवले किंवा नाही शिकवाल. एखाद्या शब्दांचे प्रोनाऊनसिएशन जमणार नाही. आमच्यासारख्याला, तुमच्यासारख्याला जमणार नाही. वारंवार मागणी करतो. शब्दांची जुळवणी जमत नाही. मूळ शिक्षण दिले पाहीजे. एबीसीडी मूळ शिक्षण दिले पाहीजे. एबीसीडी लिहता आली म्हणजे स्पोकन इंग्लिश झाले का. अटी शर्ती मागितल्या पाहीजेत. ब्युटीफिकेशन व मॅनेजमेंट म्हणजे काय. पहिलीत शाळेत गेलो नंतर घरी राहीले. मला सही काढता येते म्हणजे सारे येते का. आयटीआय मध्ये ब्युटीपार्लरचा जो कोर्स चालतो, त्यात जे कॉस्मेटीक्स वापरले जातात त्यांचे नाव तरी वाचता आले पाहीजे. इंग्लिशमध्ये कैंचीला सिझर म्हणतात हे तरी कळाले पाहीजे. परत कॉन्ट्रॅक्टरचा फायदा होतो. खाद्यपदार्थ सगळ्यांना येतात त्यात शिक्षणाची अट ठेवली नाही त्याबद्दल तुमचे अभिनंदन. रुग्ण सेविका प्रशिक्षण – याबाबत शैक्षणिक अट ठेवली नव्हती. परत आमचे-तुमचे भांडण, दोन दिवस काथ्याकूट, परत आम्ही तुमच्या मागे लागायचे. एखाद्याकडे घरी सेवा करायला कोणी नाही. महिलांना प्रशिक्षित करणार असाल, अशांची गरज भागत असेल, तर हा कोर्स चांगला आहे. यासाठी शैक्षणिक अर्हता नसावी का. पण रुग्णाची सेवा करणा-याला गोळ्यांतला फरक कळाला नाहीतर त्याचा काय उपयोग? जीवन देणारे ठरायचे का जीवन घेणारे ठरायचे याकडे लक्ष असावे. त्य़ातील काही योजना बंद केल्या. आत्ता मागणी झाली, नवीन गावांत शिवण यंत्रे गेलीच पाहीजेत. मान्य आहे. पण आत्तापर्यंच जी शिवण यंत्रे वाटतील ती कुठे आहेत? साडेचार कोटी शिवण यंत्रांचे वाटप केले असेलतर २०,००० लाभार्थी असतील मग किती घरे राहीलीत, किती लोकांना प्रशिक्षण दिले. यात चायना मेड मशिन्स घेतल्या होत्या. चायना मेड काय,दिल्ली मेड काय एकूण एकच. माहिती अधिकारात तुमच्याकडे माहिती घेतली होती. तुमच्या विभागाने टेंडर कॉल केले होते. त्यात चायना मेड मशिन्स मागविल्या, काय करायचे. मशीन कशी चालवायची याचे सुद्धा प्रशिक्षण द्यायला पाहीजे. जितके अर्ज आलेत, त्यांना द्यावे लागणार आहे. आज तेवढ्या मशिन्स उपलब्ध आहेत का नाहीत. तर नाहीत. एम्ब्रॉयडरी मशिन दिली होती. चायनामेड का देता. नॉव्हेलवाला, राजेशवाला दोन्हीचा कॉन्ट्रॅक्टर एकच असताना कॉन्ट्रॅक्टर वेगवेगळा होऊ शकतो, यात तुमचे कौतुक करावे तेवढे कमी आहे. आमच्या एका नगरसेवकाने निविदा भरली. लायसन तिच्या नावावर निविदा भरणारी दुसरी. झुरे साहेबांनी त्यांना का सांगितले नाही, तुम्ही निविदा भरु शकत नाही. तुमचे नगरसेवक पद रद्द होते. कुठेतरी काहीतरी नियम असले पाहीजेत. प्रत्येक ठिकाणी माझा लाभ, पदाचा लाभ कसा करुन घेता येईल एवढेच लक्षात ठेवतो. त्याची वर्कऑर्डर आपण दिलेली आहे. मागील वेळी आपण जे शिवणयंत्र घेतो, त्याचे पेंडल तुटलेले, पाटा तुटलेला सुया गंजलेल्या, मशीन गंजलेली, वायर तुटलेली, कलर नाही एकना असंख्य तक्रारी होत्या. पण फुकट मिळते म्हणून लोकांनी मशिन्स घेतल्या होत्या. त्यात त्यांचा काय दोष? त्यांनी तुमच्याकडे कोर्स केला होता. आजही या मशिन्स बंद अवस्थेत आहेत. महिला बालकल्याण विभागाच्या वतीने जाहीर करा. किती महिला तुमच्याकडे शिवणयंत्रे घेऊन येतील. आपण याकडे दूर्लक्ष करतो. याठिकाणी सावित्रिबाई फुले पुरस्कार ठेवतो. सामाजिक, सांस्कृतिक, कला व उद्योग या क्षेत्रासाठी हा पुरस्कार देतो. राजकारणातील स्त्रियांसाठी पुरस्कार का देत नाही. महापौर साहेब, आपण किती वर्षे नगरसेवक

आहात. चांगले काम करता. त्या-त्या पदावर असणा-या महिलांना असे पुरस्कार द्या. त्यांचा सुद्धा समावेश करा. पुरस्काराने त्यांची पाठ थोपटा. माझी आपल्याला उपसूचना असणार आहे, यात वैयक्तिकमध्ये राजकारणातील महिलांचा समावेश करावा. नियम असला तरी राजकारणातील महिला जी सभागृहात खरोखर चांगले काम करते. २५ वर्षे पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून आपली भूमिका बजावतात, त्यांना सुद्धा सन्मानित करण्यात यावे. या योजनेत एचआयव्ही बाधित रुग्णांच्या मुलांचा सांभाळ करणा-या संस्थांना आपण पैसे देणार आहोत. त्यामध्ये तुम्ही स्लममध्ये जाल तर दुसरा तिसरा पेशंट एचआयव्ही बाधीत महिला असते. इथे डॉ.रॉय यांना विचारा. त्यांच्याकडून पैसे घेऊ नका. याकडे लक्ष द्या. त्यांना समाजाने वेगळे टाकलेले असते. त्यांचे औषधाचे पैसे घेऊ नका. नवरा आधीच गेलेला असतो. लहान मुले असतात. नंतर त्यांचा सांभाळ करायला कोण नसते. यांचा सुद्धा या योजनेत अंतर्भाव करावा. आज समाजात जागरुकता नाही. ज्यांना जागरुकता आहे तो अशा पेशंटला आणतो त्याला परत आणणे अशक्य असते. माझ्या वॉर्डातील फुलेनगरमधील एक अगदी जवळची महिला नर्मदा भोसले हिला ९ वर्षाची मुलगी व ६ वर्षाची एक मुलगी आहे. २००२ साली तिचा नवरा वारला. ती एचआयव्ही बाधित होऊन वारली. त्यांना समाज मदत करत नाही. सहानुभूती दाखवत नाही. असा महिलांचा या योजनेत समावेश करुन घेण्यात यावा. ज्या योजना महिला बालकल्याणच्या असतील त्यांच्या अटी शर्ती ठरवून महिला सक्षमीकरणावर भर देण्यात यावा.

**मा.अमिना पानसरे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मी विनंती करते, मला नगरसेविका होऊन २ वर्षे झाली. पूर्वी ज्या महिलांनी कोर्स केले त्यांच्या घरी मशीन व्यवस्थित बघायला मिळत होते. मी विनंती करते, ज्या महिलांना कोर्सेस केला त्यांना आधी द्या. कितीतरी करोडो रुपये खर्च करतो. विधवा महिलांना रु.५,०००/- देतो. लहान मुले असतात. अशा महिलांना कमीत कमी २१ वर्षाचे मूल होईपर्यंत तरी मदत करावी. एच.ए. मधील कर्मचारी मृत झाल्यावर त्याच्या पत्नीला तिथे कामावर घेत नाहीत. माझ्या वॉर्डात २८/२९ वयाच्या ६/७ विधवा महिला आहेत. त्यांना कंपनी काम देत नाही. त्यांची मुले लहान आहेत. त्यांना रहायला घर पण देत नाहीत. त्या आपल्या पिंपरी चिंचवडमधील रहिवासी आहेत. बाहेरच्या कोणी नाहीत. माझी विनंती आहे की, विधवा महिलांचा विचार व्हावा. मूल २१ वर्षाचे होईपर्यंत त्यांना दर महिन्याला रु.१,०००/- देण्यात यावेत.

**मा.धनंजय आल्हाट** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - विविध कल्याणकारी योजनेमध्ये वय वर्षे ६५ च्या पुढे निराधार ज्येष्ट निराधार नागरीकांना मासिक र.रु.५००/- आर्थिक अनुदान देणेस मान्यता देणेत यावी.

**मा.आशा सूर्यवंशी** – मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.शमिम पठाण** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते आहे - योजना क्र. १ – विधवा घटस्फोटीत महिलांना अर्थसहाय्य देणे या योजनेसाठी फॉर्म भरुन घेण्यासाठी ठराविक मुदत ठेवू नये. ही योजना सातत्याने चालू ठेवावी.

योजना क्र. २ – मुलींना १२वी नंतरचे वैद्यकीय व अभियांत्रिकी पदवी शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य या योजनेसाठी फ्री सीट ची अट न ठेवता विद्यार्थीनींना त्याऐवजी ६०% पेक्षा अधिक गुणांची अट ठेवावी.

योजना क्र. ५ – महिला बचत गटांना पूर्वीसारखे बचत गटास १ वर्ष पूर्ण झाल्यावर आर्थिक अनुदान देण्यात यावे.

योजना क्र. ७ – संगणक प्रशिक्षण त्याच प्रभागातील अस्तित्वात असलेल्या म.न.पा. च्या इमारतीत देण्यात यावे.

योजना क्र.१० – एच.आय.व्ही. एडस् ग्रस्त मुलांबरोबर वृद्ध व प्रौढ महिलांनाही आर्थिक सहाय्य मिळावे. वयाची अट नको. तसेच आर्थिक मदत देतांना नोंदणीकृत संस्थेमार्फत अर्ज देण्य़ाची अट रद्द करुन शासकीय व म.न.पा.च्या हॉस्पिटलचे एडसग्रस्तचे प्रमाणपत्र प्राप्त एडस् ग्रस्ताला व्यक्तिशः नियमाप्रमाणे आर्थिक मदत द्यावी.

महिलांसाठी मागील सन २०१२-२०१३ पर्यंत चालू असलेल्या सर्व प्रशिक्षण योजना यापुढेही चालू ठेवाव्यात. पुढील नवीन योजना म्हणजे ड्रायव्हिंग प्रशिक्षण लर्निंग लायसन्ससह सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.प्रतिभा भालेराव** – मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.वैशाली काळभोर –** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते -

१) सदर योजनेतील कोणत्याही योजनेसाठी उत्पन्नाची अट लागू राहणार नाही.

२) घटक योजना क्र. ४ मध्ये शिक्षणाची अट नसावी से.न.२२ साठी प्रशिक्षणाची वेळ सांयकाळची ठेवावी.

३) घटक योजना क्र. ९ महिला बचत गटाला तीन वर्षा ऐवजी दिड वर्षानंतर अनुदान द्यावे.

१) घटक योजना क्र. १० /२ इ.१० मध्ये शिकत असणा-या विद्यार्थीनीस शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी शैक्षणिक साहित्यासाठी र.रु.२००० ऐवजी र.रु.५००० करण्यात यावी.

४) **HIV**/एडसबाधित मुलांचा साभांळ करणा-या पालकांना /संस्थाना प्रति लाभार्थी प्रतिमाह आहारासाठी रु.१००० ऐवजी र.रु. २५०० किंवा महिन्यांच्या गोळ्या पुरविण्यात याव्यात. तसेच यामध्ये वयाची अट काढून टाकण्यात यावी व याचा लाभ महिलांनाही देण्यात यावा**.**

५) घटक योजना क्र. ११ मध्ये सावित्रीबाई फुले पुरस्कारासाठी राजकीय क्षेत्रातील महिलांचाही समावेश करावा.

६) घटक योजना क्र. १६ प्रस्तावात नमूद १२ वी नंतरचे वैद्यकीय/अभियांत्रिकी उच्च शिक्षणामध्ये एम.बी.ए. या पदवीचा समावेश करुन अर्थसहाय्य उच्च शिक्षणाच्या कुठल्याही शैक्षणिक वर्षात देण्यात यावे.

७) या योजनेअंतर्गंत अर्थसहाय्य देण्याचा अथवा नाकरण्याचा अधिकार मा. आयुक्त अथवा मा. अति.आयुक्त यांना राहिल ऐवजी सदर अधिकार मा.महिला बाल कल्याण समितीस राहिल

८) महिला बाल कल्याण समितीला आर्थिक अधिकार असल्यामुळे महिला बाल कल्याण समितीचे विषय मा.स्थायी समितीकडे पाठविणेत येऊ नये.

**मा.सविता साळुंके –** मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक -४५७ | विषय क्रमांक - ९ |
| दिनांक - २०/०१/२०१४ | विभाग - मा.आयुक्त |

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. नावियो/०३/कावि/१६१/२०१३, दि.३०/१२/२०१३

२) मा.महिला व बालकल्याण समिती सभा ठ.क्र.१७ दि.८/१/२०१४

नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत ज्या विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात त्यामध्ये काही योजना बंद करणे, काही योजनांमध्ये सुधारणा करणे व काही नविन योजना सुरु करणे प्रस्तावित असून महिला व बालकल्याण योजनेतील विविध कल्याणकारी योजनांमध्ये सुधारित बदल करणेकामी प्रस्तावासोबतचे प्रपत्र अ नुसार अ.क्र.१ ते १० योजनांना मान्यता देणेत येत आहे.

तसेच विविध कल्याणकारी योजनेमध्ये वय वर्षे ६५ च्या पुढे निराधार ज्येष्ट निराधार नागरीकांना मासिक र.रु.५००/- आर्थिक अनुदान देणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच योजना क्र. १ – विधवा घटस्फोटीत महिलांना अर्थसहाय्य देणे या योजनेसाठी फॉर्म भरुन घेण्यासाठी ठराविक मुदत ठेवू नये. ही योजना सातत्याने चालू ठेवावी.

योजना क्र. २ – मुलींना १२वी नंतरचे वैद्यकीय व अभियांत्रिकी पदवी शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य या योजनेसाठी फ्री सीट ची अट न ठेवता विद्यार्थीनींना त्याऐवजी ६०% पेक्षा अधिक गुणांची अट ठेवावी.

योजना क्र. ५ – महिला बचत गटांना पूर्वीसारखे बचत गटास १ वर्ष पूर्ण झाल्यावर आर्थिक अनुदान देण्यात यावे.

योजना क्र. ७ – संगणक प्रशिक्षण त्याच प्रभागातील अस्तित्वात असलेल्या म.न.पा.च्या इमारतीत देण्यात यावे.

योजना क्र.१० – एच.आय.व्ही. एडस् ग्रस्त मुलांबरोबर वृद्ध व प्रौढ महिलांनाही आर्थिक सहाय्य मिळावे. वयाची अट नको. तसेच आर्थिक मदत देतांना नोंदणीकृत संस्थेमार्फत अर्ज देण्याची अट रद्द करुन शासकीय व म.न.पा.च्या हॉस्पिटलचे एडसग्रस्तचे प्रमाणपत्र प्राप्त एडस् ग्रस्ताला व्यक्तिशः नियमाप्रमाणे आर्थिक मदत द्यावी.

महिलांसाठी मागील सन २०१२-२०१३ पर्यंत चालू असलेल्या सर्व प्रशिक्षण योजना यापुढेही चालू ठेवाव्यात. पुढील नवीन योजना म्हणजे ड्रायव्हिंग प्रशिक्षण लर्निंग लायसन्ससह सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे.

१) सदर योजनेतील कोणत्याही योजनेसाठी उत्पन्नाची अट लागू राहणार नाही.

२) घटक योजना क्र. ४ मध्ये शिक्षणाची अट नसावी से.न.२२ साठी प्रशिक्षणाची वेळ सांयकाळची ठेवावी.

३) घटक योजना क्र. ९ महिला बचत गटाला तीन वर्षा ऐवजी दिड वर्षानंतर अनुदान द्यावे.

१) घटक योजना क्र. १० /२ इ.१० मध्ये शिकत असणा-या विद्यार्थीनीस शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी शैक्षणिक साहित्यासाठी र.रु.२००० ऐवजी र.रु.५००० करण्यात यावी.

४) **HIV**/एडसबाधित मुलांचा साभांळ करणा-या पालकांना /संस्थाना प्रति लाभार्थी प्रतिमाह आहारासाठी रु.१००० ऐवजी र.रु. २५०० किंवा महिन्यांच्या गोळ्या पुरविण्यात याव्यात. तसेच यामध्ये वयाची अट काढून टाकण्यात यावी व याचा लाभ महिलांनाही देण्यात यावा

५) घटक योजना क्र. ११ मध्ये सावित्रीबाई फुले पुरस्कारासाठी राजकीय क्षेत्रातील महिलांचाही समावेश करावा..

६) घटक योजना क्र. १६ प्रस्तावात नमूद १२ वी नंतरचे वैद्यकीय / अभियांत्रिकी उच्च शिक्षणामध्ये एम.बी.ए. या पदवीचा समावेश करुन अर्थसहाय्य उच्च शिक्षणाच्या कुठल्याही शैक्षणिक वर्षात देण्यात यावे.

७) या योजनेअंतर्गंत अर्थसहाय्य देण्याचा अथवा नाकरण्याचा अधिकार मा. आयुक्त अथवा मा. अति.आयुक्त यांना राहिल ऐवजी सदर अधिकार मा.महिला बाल कल्याण समितीस राहिल

८) महिला बाल कल्याण समितीला आर्थिक अधिकार असल्यामुळे महिला बाल कल्याण समितीचे विषय मा. स्थायी समितीकडे पाठविणेत येऊ नये.

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १०

दिनांक - २०/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१०/५९२/२०१३, दि.०४/०९/२०१३

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.४७ दि.१८/१२/२०१३

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत चाकण, देहू, आळंदी, हिंजवाडी, म्हाळुंगे, मोई,मारुंजी व इतर परिसराचा समावेश करणेबाबत शासनास मनपाचे अभिप्राय सादर करणेपूर्वी सर्व पदाधिकारी यांची बैठक दि.३०/०८/२०१३ रोजी मा.आयुक्त यांचे कक्षात घेण्यात आली. सदर बैठकीत मनपा हद्दीच्या उत्तरेकडील १४ गावे आणि मनपा हद्दीच्या पश्चिमेकडील ६ गावे मनपा हद्दीत समावेश करणेबाबत सविस्तर चर्चा करणेत आली आणि सदर हद्दवाढीचा प्रस्ताव मा.शहर सुधारणा समिती मार्फत मा.महापालिका सभेपुढे सादर करणेबाबत चर्चा झाली तथापि सद्य:स्थितीत मनपा हद्दीला लागून असलेली गावे मनपा हद्दीत समाविष्ट करणे योग्य होईल. त्यानुसार खालील नमुद मनपा हद्दीच्या उत्तरेकडील आळंदी, चिंबळी, कुरुळी, मोई, निघोजे, देहू, विठ्ठलनगर आणि मनपा हद्दीच्या पश्चिमेकडील गहुंजे, जांबे, मारुंजी, हिंजवाडी, माण, नेरे, सांगवडे ही मनपा हद्दीला लागून असलेली एकूण १४ गावे मनपा हद्दीत समाविष्ट करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.अरुणा भालेकर** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.झामाबाई बारणे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मांडते.

**मा.सोनाली जम** – मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** – विषय क्रमांक १० तहकूब करणेत यावा.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक -४५८ विषय क्रमांक – १०
दिनांक - २०/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१०/५९२/२०१३, दि.०४/०९/२०१३
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.४७ दि.१८/१२/२०१३

विषय क्रमांक १० चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ११
दिनांक - २०/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. नरवि/कावि/१०/५९८/२०१३,

दि.०७/१०/२०१३.

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.४८ दि.१८/१२/२०१३.

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीच्या उत्तरेकडील आणि मनपा हद्दीला लागून असलेली ७ गावे आणि मनपा हद्दीच्या पश्चीमेकडील ७ गांवे अशी एकूण १४ गावे मनपा हद्दीत समाविष्ट करणेबाबत प्रस्ताव मान्यतेकामी पुढील प्रमाणे आहे. मनपा हद्दी समाविष्ट करावयाचे गांवे- मनपा हद्दीच्या उत्तरे कडील ७ गावे-आळंदी,चिंबळी,कुरुळी,मोई,निघोजे,देहू,विठ्ठलनगर. मनपा हद्दीच्या पश्चीमे कडील ७ गांवे-हिंजवडी,जांबे,माण,मारुंजी,नेरे,गहुंजे,सांगवडे वरीलप्रमाणे प्रस्ताव पत्रक्र.नरवि/कावि/१०/५९२/२०१३ दिनांक ४/९/२०१३ अन्वये मा.शहर सुधारणा समितीमार्फत मा.महापालिका सभेपुढे सादर केलेला आहे. प्रस्तुत विषयी मा.आमदार श्री.दिलीप मोहिते यांनी दि.१०/०९/२०१३ च्या पत्राने खेड तालुक्यातील आळंदी,चाकण,मोई,कुरुळी,निघोजे,चिंबळी, केळगांव, सालुंब्रे, महाळुंगे, खराबवाडी, नाणेकरवाडी, मेदनकरवाडी, कडाचीवाडी या गावांचा पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत समावेश होणेबाबत विरोध केला असल्याचे आणि सदर गांवे मनपा हद्दीत समावेश करु नये असे नमूद केले असून त्यासोबत ग्रामपंचायतीच्या ठरावाची प्रत जोडली आहे. प्रस्तुत विषय मा.महापालिका सभेपुढे सादर केलेला असल्याने या विषयासोबत मा.आमदार श्री.दिलीप मोहिते यांचे पत्र व त्यासोबतचे सहपत्रे मा.महापालिका सभेपुढे सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.आशा सूर्यवंशी** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मांडते.

**मा.भारती फरांदे** – मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** – विषय क्रमांक ११ तहकूब करणेत यावा.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ४५९ विषय क्रमांक – ११

दिनांक - २०/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. नरवि/कावि/१०/५९८/२०१३, दि.०७/१०/२०१३.

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.४८ दि.१८/१२/२०१३.

विषय क्रमांक ११ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.सुजाता पालांडे** -मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ४६० विषय क्रमांक – १२
दिनांक - २०/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.प्रतिभा भालेराव, मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव.
२) मा.प्रशासन अधिकारी,अ प्रभाग यांचे पत्र क्र. अप्र/स्विस/११/कावि/४१५/२०१३ दि.१९/११/२०१३
३) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.४९ दि.१८/१२/२०१३

अ प्रभाग समिती सभा दिनांक ०९/१०/२०१३ ठराव क्रमांक १९६ नुसार प्रभाग क्र.१६ मध्ये जय-गणेश व्हिजन या संस्थेने महापालिकेस ओपन स्पेसचे माध्यमातून दोन एकर जमीन ताब्यात दिली असून ती जमीन मनपाचे ताब्यात आहे. सदर जागेचा आरक्षण क्र.१७१ आहे व ती एल आकाराची आहे. प्रस्तुत जागेपैकी एक एकर जागेमध्ये खेळाचे मैदान विकसित करणेस व एक एकर जागेमध्ये गार्डन विकसीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.सुजाता पालांडे** -मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – १३
दिनांक - २०/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.शांताराम भालेकर, मा.उषा वाघेरे यांचा प्रस्ताव –
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.५० दि.१८/१२/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील मौजे दिघी येथील आ.क्र. २/१२० प्राथ.शाळा म.प्रा.व न.र.अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये रद्द करणेकामी मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने मौजे दिघी येथील आ.क्र.२/१२० प्राथ.शाळा ज्या ठिकाणी आरक्षित केलेली आहे त्यापासून ३०० मी. अंतरावर खाजगी शाळा आहे. त्यामुळे सदर आरक्षणाची आवश्यकता नसल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर आरक्षण म.प्रा.न.र.अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये रद्द करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.महेशदादा लांडगे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हा विषय फेरबदलाचा आहे. आरक्षण रद्द करण्यासंदर्भातील विषय आहे. बरेचसे विषय आम्ही आपल्याकडे दिले होते. आपण शासनाकडे पाठवलेले नाही, का पाठवले नाही. हा सुद्धा आम्ही केलेला विषय आहे. आत्ता आयुक्त साहेब रजेवर आहेत. तो विषय इतका महत्वाचा आहे. यात राहणा-या लोकांना महापालिकेकडून नोटीस गेलेली आहे. आरक्षणातील जागा आहे. हे लोक इतके घाबरलेले आहेत. तुमचा काही नेम नाही. तुम्ही काहीही करता. या विषयात आयुक्त साहेब येण्याची वाट न पाहता नगररचना विभागाने त्वरित कारवाई करावी. या विभागांसंदर्भात १३ व १४ दोन्ही विषय महत्वाचे आहेत. हे विषय शासनाकडे गेलेतर त्यांना सांगता येईल, हे विषय शासनाकडे गेले आहेत, कारवाई थांबवावी. हे लोक टॅक्स सुद्धा भरतात. आपल्याकडील एमएसईबीचे मीटर आहे. नळ कनेक्शन आहे. आरक्षण होते तर त्यावेळी का थांबवले नाही. ही ग्रामपंचायतीतील जुनी घरे आहेत. आम्ही शासनाकडे पाठवणार होतो. त्यावरील कारवाई थांबवावी. या आरक्षणातील लोक नगरपालिकेत आले होते. क प्रभागातील कार्यकारी अभियंता होते. आरक्षणातील जागा आहे हे कळाल्यावर एक वरिष्ठ नागरीक चक्कर येऊन पडले होते. या विषयाकडे गांभिर्याने लक्ष द्या. शासनाकडे त्वरित कसे जातील याचे काळजी घ्या. विषय मंजूर झाल्यानंतर लगेच नोटीस द्या.

**मा.उल्हास शेट्टी** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - प्रभाग क्र.१८ किवळे येथिल विकासनगर भागामध्ये पालिकेच्या **DP Plan** मध्ये **PG-4/110** व **PS-4/109** अशी दोन आरक्षणे टाकलेली आहेत. परंतु पूर्वीपासून सदर आरक्षणावार जुनी घरे व मंदिर आहे. तरी ही दोन्ही आरक्षणे वगळण्यास मान्यता देणेत यावी. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील मौजे सांगवी येथील आ.क्र. ३१७ प्राथ.शाळा (सर्व्हे क्र. १७,२३,२४,२६) म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये रद्द करणेकामी मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने मौजे सांगवी येथील आ.क्र. ३१७ प्राथ.शाळा ज्या ठिकाणी आरक्षित केलेली आहे, त्यापासून ३०० मी. अंतरावर खाजगी शाळा आहे. त्यामुळे सदर आरक्षणाची आवश्यकता नसल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर आरक्षण म.प्रा.न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये रद्द करणेस मान्यता देणेत यावी. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील मौजे बोपखेल आ.क्र.२/१५८ व आ.क्र. २/१६१ दाखविलेले शाळेचे आरक्षण रद्द करणेत यावेत, कारण सदर आरक्षणाच्या जवळच छत्रपती शिवाजी इंग्लिश मिडीयम शाळा,जे.जे. इंग्लिश मिडीयम शाळा व म.न.पा.ची अशा एकुण ३ शाळा आहेत. तेथील लोकवस्तीचा विचार करता एक शाळा पुरेशी आहे. त्यामुळे मौजे बोपखेल येथील दोन्ही आरक्षणे रद्द करुन सदरची जागा निवासी विभागात समाविष्ट करणेस मान्यता देणेत यावी. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील सांगवी गावठाण विभाग ममतानगर ते आनंदनगर सदर रस्ता होण्याकामी आरक्षित घरे २०११ च्या मार्कींगनुसार नागरीकांना ताब्यात दिली आहेत. सदर स्थितीतील रस्ता जो १२ मीटर आहे तो योग्य आहे. इतर कोणत्याही सुविधा करीताही योग्य आहेत. अजून रस्ता वाढविल्यास नागरीकांची घरे संपूर्णतः जात आहेत व नागरीक बेघर होतील तरी उर्वरीत ४० फूटी रस्ता रद्द करण्यास मान्यता देणेत यावी. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील मौजे सांगवी येथिल स.न. ७ पैकी जागेवर असलेले आरक्षण क्र.३२३ चे आरक्षण वगळण्यात यावे. तेथे नागरीक ८०

सालापासून वास्तव्यास आहेत. विकास आराखडा तयार होण्याआधी पासून हि घरे आहेत. तेथिल नागरीक नियमित कर भरत आले आहेत. विशेषत: महानगरपालिकेत हि (सांगवी) गावे समाविष्ठ होण्याआधीची घरे आहेत ज्यावेळेस डि.पी. रस्ता नव्हता तरी सर्व बाधित घरांचा विचार होऊन कृपया येथिल शाळेचे आरक्षण रद्द करण्यात यावे तसेच या परीसरातील अनेक जवळपास भागात ७ ते ८ शाळा आहेत तसेही शाळेच्या आरक्षणाची इतकी गरज नाही त्यामुळे सदरचे आरक्षण वगळण्यास मान्यता देणेत यावी. पिं.चिं.म.न.पा. विकास आराखड्यातील मौजे चिंचवड येथील सर्व्हे नं. १ अ **+** १ ब (१**+**२**+**३**+**४)या क्षेत्रामध्ये म.न.पा.चे **Municipal purpose** असे आरक्षण क्र. २२६ असे आहे. सदरच्या जागेवर मंदीर व शेतक-यांची घरे असल्याने त्याठिकाणी सदर आरक्षणाची आवश्यकता नाही. तरी म.प्रा.न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कारवाई करण्यात येवून सदरचे आरक्षण रद्द करण्यास मान्यता देणेत यावी. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील आकुर्डी दत्तवाडी येथिल स.न. ३५/३/१ आ.क्र.५४८ शाळेचे आरक्षण आहे परंतु या आरक्षित जागेपासून ३०० मी. अंतरावर खाजगी शाळा आहे. त्यामुळे सदर आरक्षणाची आवश्यकता नसल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर आरक्षण म.प्रा.न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये रद्द करणेस मान्यता देणेत यावी. मौजे पिंपळे सौदागर येथील स.नं.७० पैकी जागेतील मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र. ३६५ भाजी मंडई व आरक्षण क्र. ३६६ बेघरांसाठी घरे या आरक्षणाचे जागेवर डि.पी. मंजूर होण्यापुर्वीची  ब-याच प्रमाणात घरे आहेत. तरी सदरचे आरक्षणाची जागा निवासी विभागात समाविष्ट करणेकामी म.प्रा. अधिनियम व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करणेस व सदरची जागा निवासी विभागात समाविष्ट करुन तसा प्रस्ताव शासनास पाठविणेस मा.महापालिका आयुक्त यांना सर्वाधिकार प्रदान करणेस मान्यता देणेत यावी. मोशी प्रभाग-६ मधील गट–४५२ मधील टीटीपी/२०२ हे आरक्षण रिजनल प्लॅनमधील पुढे विकास आराखड्यातील समाविष्ट करण्यात आले आहे. जवळील वखार मंडळ (महाराष्ट्र राज्य) असून सध्या वखार मंडळाचे गोदाम बंद आहे. तसेच १९९५ पासुन आजपर्यंत हे आरक्षण विकसित करण्यात आले असुन सदर आरक्षण आता उपयोग नाही. पिंपरी चिंचवड मनपा विकास आराखड्यातील मौजे आकुर्डी येथील सर्व्हे नं. १७८,१७९ या क्षेत्रामध्ये आरक्षण क्र.२७३ हे महानगरपालिकेचे प्राथमिक शाळेचे आरक्षण आहे. सदरच्या जागेवर जुनी घरे आहेत. सदर आरक्षणाशेजारी जवळपास अर्धा ते एक किलोमीटर परिसरामध्ये १० ते १२ शाळा असल्यामुळे सदरील प्राथमिक शाळेचे आरक्षण रद्द करावे. सदरचे आरक्षण म.प्रा.न.र. अधिनियम १९६६ च्या कलम ३७ अन्वये रद्द करण्यास मान्यता देणेत यावी. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील मौजे रहाटणी येथिल आरक्षण क्र. ६४४ (स.न.७५) हे आरक्षण रद्द करण्यास मान्यता देणेत यावी. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीच्या भागश:मंजुर विकास योजनेत मौजे वडमुखवाडी येथे स.न. २१६ व २१७ मध्ये आरक्षण क्र.२/२७ अन्वये टाऊन हॉलचे आरक्षण प्रस्तावित करणेत आले आहे. त्याचप्रमाणे सदर स.न.मधून आळंदी-पुणे ६० मी.रस्ता व १८ मी. रस्त्याने बाधित आहे सदर स.न. मध्ये जमिन मालकांची राहती घरे असून ती ६० मी. रस्त्याने पूर्णता बाधीत होत आहेत. त्यामुळे त्यांना रहायला जागा/घर नाही म्हणून त्यांच्याच जागेतील आ.क्र.२/२७ टॉऊन हॉलचे

आरक्षण रद्द करुन तो रहिवासी विभागात समावेश करणेबाबत म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.राजू मिसाळ** – मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक -४६१ विषय क्रमांक - १३
दिनांक - २०/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त
संदर्भ:-१) मा.शांताराम भालेकर, मा.उषा वाघेरे यांचा प्रस्ताव -
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.५० दि.१८/१२/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील मौजे दिघी येथील आ.क्र. २/१२० प्राथ.शाळा म.प्रा.व न.र.अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये रद्द करणेकामी मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने मौजे दिघी येथील आ.क्र.२/१२० प्राथ.शाळा ज्या ठिकाणी आरक्षित केलेली आहे त्यापासून ३०० मी. अंतरावर खाजगी शाळा आहे. त्यामुळे सदर आरक्षणाची आवश्यकता नसल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर आरक्षण म.प्रा.न.र.अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये रद्द करणेस तसेच प्रभाग क्र.१८ किवळे येथिल विकासनगर भागामध्ये पालिकेच्या **DP Plan** मध्ये **PG-4/110** व **PS-4/109** अशी दोन आरक्षणे टाकलेली आहेत. परंतु पूर्वीपासून सदर आरक्षणावार जुनी घरे व मंदिर आहे. तरी ही दोन्ही आरक्षणे वगळण्यास तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील मौजे सांगवी येथील आ.क्र. ३१७ प्राथ.शाळा (सर्व्हे क्र. १७,२३,२४,२६) म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये रद्द करणेकामी मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने मौजे सांगवी येथील आ.क्र. ३१७ प्राथ.शाळा ज्या ठिकाणी आरक्षित केलेली आहे, त्यापासून ३०० मी. अंतरावर खाजगी शाळा आहे. त्यामुळे सदर आरक्षणाची आवश्यकता नसल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर आरक्षण म.प्रा.न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये रद्द करणेस तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील मौजे बोपखेल आ.क्र.२/१५८ व आ.क्र. २/१६१ दाखविलेले शाळेचे आरक्षण रद्द करणेत यावेत, कारण सदर आरक्षणाच्या जवळच छत्रपती शिवाजी इंग्लिश मिडीयम शाळा,जे.जे. इंग्लिश मिडीयम शाळा व म.न.पा.ची अशा एकुण ३ शाळा आहेत. तेथील लोकवस्तीचा विचार करता एक शाळा पुरेशी आहे. त्यामुळे मौजे बोपखेल येथील दोन्ही आरक्षणे रद्द करुन सदरची जागा निवासी विभागात समाविष्ट करणेस तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील सांगवी गावठाण विभाग ममतानगर ते आनंदनगर सदर रस्ता होण्याकामी आरक्षित घरे २०११ च्या मार्कींगनुसार नागरीकांना ताब्यात दिली आहेत. सदर स्थितीतील रस्ता जो १२ मीटर आहे तो योग्य आहे. इतर कोणत्याही सुविधा करीताही योग्य आहेत. अजून रस्ता वाढविल्यास नागरीकांची घरे संपूर्णतः जात आहेत व नागरीक बेघर होतील तरी उर्वरीत ४० फूटी रस्ता रद्द करण्यास तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील मौजे सांगवी येथिल स.न. ७ पैकी जागेवर

असलेले आरक्षण क्र.३२३ चे आरक्षण वगळण्यात यावे. तेथे नागरीक ८० सालापासून वास्तव्यास आहेत. विकास आराखडा तयार होण्याआधी पासून हि घरे आहेत. तेथिल नागरीक नियमित कर भरत आले आहेत. विशेषत: महानगरपालिकेत हि (सांगवी) गावे समाविष्ठ होण्याआधीची घरे आहेत ज्यावेळेस डि.पी. रस्ता नव्हता तरी सर्व बाधित घरांचा विचार होऊन कृपया येथिल शाळेचे आरक्षण रद्द करण्यात यावे तसेच या परीसरातील अनेक जवळपास भागात ७ ते ८ शाळा आहेत तसेही शाळेच्या आरक्षणाची इतकी गरज नाही त्यामुळे सदरचे आरक्षण वगळण्यास तसेच पिं.चिं.म.न.पा. विकास आराखड्यातील मौजे चिंचवड येथील सर्व्हे नं. १ अ **+** १ ब (१**+**२**+**३**+**४)या क्षेत्रामध्ये म.न.पा.चे **Municipal purpose** असे आरक्षण क्र. २२६ असे आहे. सदरच्या जागेवर मंदीर व शेतक-यांची घरे असल्याने त्याठिकाणी सदर आरक्षणाची आवश्यकता नाही. तरी म.प्रा.न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कारवाई करण्यात येवून सदरचे आरक्षण रद्द करण्यास तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील आकुर्डी दत्तवाडी येथिल स.न. ३५/३/१ आ.क्र.५४८ शाळेचे आरक्षण आहे परंतु या आरक्षित जागेपासून ३०० मी. अंतरावर खाजगी शाळा आहे. त्यामुळे सदर आरक्षणाची आवश्यकता नसल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर आरक्षण म.प्रा.न.र. अधिनियम १९९६६ चे कलम ३७ अन्वये रद्द करणेस तसेच मौजे पिंपळे सौदागर येथील स.नं.७० पैकी जागेतील मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र. ३६५ भाजी मंडई व आरक्षण क्र. ३६६ बेघरांसाठी घरे या आरक्षणाचे जागेवर डि.पी. मंजूर होण्यापुर्वीची ब-याच प्रमाणात घरे आहेत. तरी सदरचे आरक्षणाची जागा निवासी विभागात समाविष्ट करणेकामी म.प्रा. अधिनियम व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करणेस व सदरची जागा निवासी विभागात समाविष्ट करुन तसा प्रस्ताव शासनास पाठविणेस मा.महापालिका आयुक्त यांना सर्वाधिकार प्रदान करणेस तसेच मोशी प्रभाग-६ मधील गट–४५२ मधील टीटीपी/२०२ हे आरक्षण रिजनल प्लॅनमधील पुढे विकास आराखड्यातील समाविष्ट करण्यात आले आहे. जवळील वखार मंडळ (महाराष्ट्र राज्य) असून सध्या वखार मंडळाचे गोदाम बंद आहे. तसेच १९९५ पासुन आजपर्यंत हे आरक्षण विकसित करण्यात आले असुन सदर आरक्षण आता उपयोग नाही. तसेच पिंपरी चिंचवड मनपा विकास आराखड्यातील मौजे आकुर्डी येथील सर्व्हे नं. १७८,१७९ या क्षेत्रामध्ये आरक्षण क्र.२७३ हे महानगरपालिकेचे प्राथमिक शाळेचे आरक्षण आहे. सदरच्या जागेवर जुनी घरे आहेत. सदर आरक्षणाशेजारी जवळपास अर्धा ते एक किलोमीटर परिसरामध्ये १० ते १२ शाळा असल्यामुळे सदरील प्राथमिक शाळेचे आरक्षण रद्द करावे. सदरचे आरक्षण म.प्रा.न.र. अधिनियम १९६६ च्या कलम ३७ अन्वये रद्द करण्यास तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील मौजे रहाटणी येथिल आरक्षण क्र. ६४४ (स.न.७५) हे आरक्षण रद्द करण्यास तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीच्या भागश:मंजुर विकास योजनेत मौजे वडमुखवाडी येथे स.न. २१६ व २१७ मध्ये आरक्षण क्र.२/२७ अन्वये टाऊन हॉलचे आरक्षण प्रस्तावित करणेत आले आहे. त्याचप्रमाणे सदर स.न.मधून आळंदी-पुणे ६० मी.रस्ता व १८ मी. रस्त्याने बाधित आहे सदर स.न. मध्ये जमिन मालकांची राहती घरे असून ती ६० मी. रस्त्याने पूर्णता बाधीत होत आहेत. त्यामुळे त्यांना रहायला जागा/घर नाही म्हणून त्यांच्याच जागेतील आ.क्र.२/२७ टॉऊन हॉलचे आरक्षण रद्द

करुन तो रहिवासी विभागात समावेश करणेबाबत म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.महापौर – उपसुचनेसह हा विषय मंजूर करण्यात यावा.

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** -मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – १४

दिनांक - २०/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.शांताराम भालेकर, मा.उषा वाघेरे यांचा प्रस्ताव –
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.५१ दि.१८/१२/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील मौजे दिघी येथील आरक्षण क्र.२/११६ प्राथ.शाळा व आरक्षण क्र.२/११९ खेळाचे मैदान म.प्रा.न.र.अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये बदलणेकामी मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने प्रस्तावीत दोन्ही आरक्षण म.प्रा.न.र.अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.अरुणा भालेकर** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.शत्रुघ्न काटे** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास आराखड्यातील मौजे नवी सांगवी येथिल स.न.८१ व ८२ चे क्षेत्र हे आरक्षण क्रमांक ३३८ अन्वये शाळा व खेळाचे मैदान या प्रयोजनासाठी आरक्षीत करण्यात आले आहे. सदर आरक्षण अद्यापही विकसीत करण्यात आलेली नाही. सदर आरक्षणाच्या लगत स.न.८३ व ८४ चे क्षेत्र हे आरक्षण क्रमांक ३३६ प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान या प्रयोजनासाठी आरक्षीत करण्यात आले आहे. तसेच उक्त आरक्षण क्रमांक ३३८ च्या लगत रस्त्याच्या उत्तरेकडे स.न.७७ व ७८चे क्षेत्र हे आरक्षण क्रमांक ३३९ अन्वये प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान या प्रयोजनासाठी आरक्षीत करण्यात आले आहे आणि त्यालगत असलेल्या स.न.७९ च्या क्षेत्रात जनता शिक्षण संस्थेची शाळा कार्यरत आहे. तरी एकाच ठिकाणी १०० मी. च्या अंतरामध्ये ४ शाळा असल्याने मौजे नवी सांगवी येथिल स.न.८१ व ८२ चे क्षेत्रावरील आरक्षण क्रमांक ३३८ हे शाळा व खेळाचे मैदान या प्रयोजनासाठी आरक्षीत असलेले क्षेत्र आरक्षणातून वगळुन आरक्षणाखालील क्षेत्र हे निवासी विभागात समाविष्ट करणेकामी महाराष्ट्र

प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वयेची कार्यवाही करण्यासाठी तसेच नागरीकांकडून हरकती/सुचना मागवून शासनाच्या मंजूरीसाठी अंतीम प्रस्ताव शासनास सादर करण्याचे सर्व अधिकार आयुक्तांना प्रदान करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.राजू मिसाळ** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.राजेंद्र जगताप** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास आराखड्यातील मौजे नवी सांगवी येथिल स.न.७१ व ७२ चे क्षेत्र हे आरक्षण क्रमांक ३४० अन्वये खेळाचे मैदान या प्रयोजनासाठी आरक्षीत करण्यात आले आहे. सदर आरक्षण अद्यापही विकसीत करण्यात आलेली नाही. तथापि आरक्षण क्रमांक ३३५ च्या लगत रस्त्याच्या पूर्वेकडे निळ्या पूररेषेतील क्षेत्रात खुल्या स्वरुपाचे आरक्षण अनुज्ञेय असल्याने आरक्षण क्रमांक ३४० हे त्या ठिकाणी स्थलांतरीत करुन स.न. ७१ व ७२ चे आरक्षणाखालील क्षेत्र हे निवासी विभागात समाविष्ट करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वयेची कार्यवाही करण्यास तसेच नागरीकांकडून हरकती/सुचना मागवून शासनाच्या मंजूरीसाठी अंतीम प्रस्ताव शासनास सादर करण्याचे सर्व अधिकार आयुक्तांना प्रदान करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.निलेश पांढरकर** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, सर्व उपसूचना स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक -४६२ | विषय क्रमांक - १४ |
| दिनांक - २०/०१/२०१४ | विभाग - मा.आयुक्त |

संदर्भः- १) मा.शांताराम भालेकर, मा.उषा वाघेरे यांचा प्रस्ताव -
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.५१ दि.१८/१२/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील मौजे दिघी येथील आरक्षण क्र.२/११६ प्राथ.शाळा व आरक्षण क्र.२/११९ खेळाचे मैदान म.प्रा.न.र.अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये बदलणेकामी मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने प्रस्तावीत दोन्ही आरक्षण म.प्रा.न.र.अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास आराखड्यातील मौजे नवी सांगवी येथिल स.न.८१ व ८२ चे क्षेत्र हे आरक्षण क्रमांक ३३८ अन्वये शाळा व खेळाचे मैदान या प्रयोजनासाठी आरक्षीत करण्यात आले आहे. सदर आरक्षण अद्यापही विकसीत करण्यात आलेली नाही. सदर आरक्षणाच्या लगत स.न.८३ व ८४ चे क्षेत्र हे आरक्षण क्रमांक ३३६ प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान या प्रयोजनासाठी आरक्षीत करण्यात आले आहे. तसेच उक्त आरक्षण क्रमांक ३३८ च्या लगत रस्त्याच्या उत्तरेकडे स.न.७७ व ७८चे क्षेत्र हे आरक्षण क्रमांक ३३९

अन्वये प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान या प्रयोजनासाठी आरक्षीत करण्यात आले आहे आणि त्यालगत असलेल्या स.न.७९ च्या क्षेत्रात जनता शिक्षण संस्थेची शाळा कार्यरत आहे. तरी एकाच ठिकाणी १०० मी. च्या अंतरामध्ये ४ शाळा असल्याने मौजे नवी सांगवी येथिल स.न.८१ व ८२ चे क्षेत्रावरील आरक्षण क्रमांक ३३८ हे शाळा व खेळाचे मैदान या प्रयोजनासाठी आरक्षीत असलेले क्षेत्र आरक्षणातून वगळुन आरक्षणाखालील क्षेत्र हे निवासी विभागात समाविष्ट करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वयेची कार्यवाही करण्यासाठी तसेच नागरीकांकडून हरकती/सुचना मागवून शासनाच्या मंजूरीसाठी अंतीम प्रस्ताव शासनास सादर करण्याचे सर्व अधिकार आयुक्तांना प्रदान करण्यास तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास आराखड्यातील मौजे नवी सांगवी येथिल स.न.७१ व ७२ चे क्षेत्र हे आरक्षण क्रमांक ३४० अन्वये खेळाचे मैदान या प्रयोजनासाठी आरक्षीत करण्यात आले आहे. सदर आरक्षण अद्यापही विकसीत करण्यात आलेली नाही. तथापि आरक्षण क्रमांक ३३५ च्या लगत रस्त्याच्या पूर्वेकडे निळ्या पूररेषेतील क्षेत्रात खुल्या स्वरुपाचे आरक्षण अनुज्ञेय असल्याने आरक्षण क्रमांक ३४० हे त्या ठिकाणी स्थलांतरीत करुन स.न. ७१ व ७२ चे आरक्षणाखालील क्षेत्र हे निवासी विभागात समाविष्ट करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वयेची कार्यवाही करण्यासाठी तसेच नागरीकांकडून हरकती / सुचना मागवून शासनाच्या मंजूरीसाठी अंतीम प्रस्ताव शासनास सादर करण्याचे सर्व अधिकार आयुक्तांना प्रदान करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.महापौर** – उपसुचनेसह हा विषय मंजूर करण्यात यावा.

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.निलेश पांढरकर**-मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

<u>मा.विधी समिती</u>

ठराव क्रमांक -४६३ विषय क्रमांक – १५

दिनांक - २०/०१/२०१४ विभाग - मा.नगरसचिव

**अ)** दिनांक १५/११/१३, ६/१२/१३ व ९/१२/१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे

**ब)** दिनांक ६/१२/१३ व ९/१२/१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे

**मा.संदिप चिंचवडे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.निलेश पांढरकर** -मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

ठराव क्रमांक -४६४ विषय क्रमांक – १६
दिनांक - २०/०१/२०१४ विभाग - मा.नगरसचिव

अ) दिनांक २३/१०/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) दिनांक १३/११/२०१३, २२/११/२०१३, २७/११/२०१३, ११/१२/२०१३ व २६/१२/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.संदिप चिंचवडे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.निलेश पांढरकर** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

**मा.शहर सुधारणा समिती**

ठराव क्रमांक -४६५ विषय क्रमांक – १७
दिनांक - २०/०१/२०१४ विभाग - मा.नगरसचिव

अ) दिनांक २०/११/१३ व २२/११/१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) दिनांक ४/१२/१३ व १०/१२/१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.संदिप चिंचवडे -** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.निलेश पांढरकर** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

**मा.क्रिडा समिती**

ठराव क्रमांक -४६६ विषय क्रमांक – १८
दिनांक - २०/०१/२०१४ विभाग - मा.नगरसचिव

**अ)** दिनांक २०/११/२०१३, २६/११/२०१३, ४/१२/२०१३ व ६/१२/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे..

**ब)** दिनांक ४/१२/१३ व ६/१२/१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.संदिप चिंचवडे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल – ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.सुजाता पालांडे** -मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक - ४६७ | विषय क्रमांक – १९ |
| दिनांक - २०/०१/२०१४ | विभाग - मा.आयुक्त |

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/बीआरटीएस/४३/२०१४, दि.१८/०१/२०१४

नाशिक फाटा येथे उभारण्यात आलेल्या दुमजली उड्डाणपूलाचे काम पुर्णत्वास असून उड्डाणपुलाच्या नामकरणासाठी मा.महापौर कार्यालय, मा.आयुक्त कार्यालय तसेच विविध संघटनेची पत्रे प्राप्त झालेली आहेत. सदर पत्रांपैकी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर नामकरणाचे ९ निवेदन, श्री.छत्रपती शिवाजी महाराज २ निवेदन, जे.आर.डी.टाटा २ निवेदन, छत्रपती संभाजी महाराज व उपपुलास संताजी घोरपडे व धनाजी जाधव ३ निवेदन, राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर २ निवेदन, मा.बाळासाहेब ठाकरे २ निवेदन, महात्मा ज्योतिबा फुले २ निवेदन, श्री.तुकाराम महाराज, डॉ.नरेंद्र दाभोळकर, हुतात्मा शिवराम हरी राजगुरू, भारतरत्न सचिन तेंडूलकर, मा.आण्णासाहेब उर्फ मार्तंड धोंडीबा मगर, शंकर आण्णा गावडे, महात्मा बसेश्वर, कै.अनंतराव गोविंद पवार, छत्रपती संभाजी राजे, लोकमान्य टिळक प्रत्येकी एक निवेदन प्राप्त झालेले आहेत.

मा.उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी, पिंपरी चिंचवड शहराच्या जडण-घडणी मध्ये मोठे योगदान असलेले व औद्योगिक व आधुनिक भारताचे शिल्पकार भारतरत्न या सर्वोच्च बहुमानाने सन्मानित जे.आर.डी.टाटा यांचे नाव नाशिक फाटा येथील दुमजली उड्डाणपुलास देणेबाबत दि.०३।०१।२०१३ रोजी थेरगाव येथील उड्डाणपुलाचे उदघाटन समारंभात सुचविलेले आहे. त्यास अनुसरून प्रस्ताव सादर केलेला आहे.

नाशिक फाटा येथील उड्डाणपूलास जे.आर.डी.टाटा असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, जे.आर.डी. टाटा यांचे नाव कासारवाडी उड्डाणपुलाला देतोय. त्याप्रमाणे शासकीय इतमामात आदरणीय बाळासाहेब ठाकरे यांना मानवंदना दिलेली आहे हे सुद्धा विसरायला नाही पाहीजे. आम्ही ज्यांना पंतप्रधान पदाचे दावेदर मानतो अशा मा.शरद पवार यांच्याकडून त्यांचा अवमान होणे हे योग्य नाही. एकिकडे आपल्या सदस्यांकडून त्यांचे तैलचित्र लावायची मागणी होते. आपण सुद्धा होकार दिला होता. चौकशी केली असता निदर्शनास आले की आपण तैलचित्र तयार करायला सुद्धा दिले नाही. मी पुढीलप्रमाणे सूचना मांडते. मा.शरद पवार साहेब पुतळा समितीचे अध्यक्ष असताना इतका विरोध का? स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांना सुद्धा शासकीय इतमामात मानवंदना दिली होती. म्हणून माझी आपल्याला नम्र विनंती आहे की, नाशिक फाटा ते पिंपळे गुरव पुलाला स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्यात यावे. माझी उपसूचना आहे.

**मा.आशा शेंडगे** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, माझ्या सहकारी भगिनी मा.सिमा सावळे यांनी आत्ता सूचना मांडली. आदरणीय बाळासाहेब ठाकरे यांच्या कामामुळे, त्यांच्या असणा-या महाराष्ट्रातील त्यागासाठी आजपर्यंत त्यांनी शिवसेनेच्या वतीने जे चांगले काम केले आहे. त्यांचा आवाज बुलंद आहे, त्यासाठी मी सुद्धा आदरणीय, सन्माननीय बाळासाहेब ठाकरे यांना श्रद्धांजली वाहते. मला जय महाराष्ट्र म्हणताना कधीही कमीपणा वाटला नाही. त्यांना श्रद्धांजली वाहताना कधीही दुखवायचे नाही. मला कोणाचाही अवमान करायचा नाही. समाजात विविध प्रकारची नावे देतो. त्यावेळी वेगवेगळे नामकरणाचे विषय असतात. महापालिकेचे मोठमोठे प्रोजेक्ट असतात. त्या प्रोजक्टसना नाव देण्यासाठी आज पिंपरी चिंचवड शहरात टेल्को नावाची संस्था आहे. खरेतर या विषयावर खूप चर्चा करणे गरजेचे आहे. जे.आर.डी. टाटा हे भारताचे भूषण, रत्न आहेत. अक्षरशः मी फॉरेनमध्येसुद्धा त्यांच्या कंपन्या पाहिल्या आहेत. आज पिंपरी चिंचवड शहर हे कामगार नगरी म्हणून जेव्हा ओळखली जाते. या शहरात त्यांचे योगदान एवढे मोठे आहे. त्यांच्या कंपन्यांमध्ये कामगार कामाला लागल्यावर कितीतरी कुटूंबे मोठी झालीत. महापालिकेच्या एका प्रोजेक्टला त्यांचे नाव द्यायचे म्हणून हा विषय आला आहे. माझ्या सहकारी भगिनी मा.सिमा सावळे यांना सांगते, त्यांनी सूचना केल्याप्रमाणे आदरणीय बाळासाहेब ठाकरे यांचे नाव दुस-या चांगल्या मोठ्या प्रोजेक्टला देऊ. इथे कुठेही वाद न करता भारतरत्न जे.आर.डी.टाटा यांचे नाव नाशिक फाटा येथील दुमजली उड्डाणपुलास देण्यात यावे अशी विनंती करते. स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचे महाराष्ट्रातील योगदान मोठे आहे. मैत्री कशी असावी तर आदरणीय शरद पवार साहेब व बाळासाहेब ठाकरे यांच्यासारखी. त्यांची घनिष्ठ मैत्री होती. या ठरावाला समर्थन देण्यामागे कोणतेही राजकारण नाही. जे.आर.डी. टाटा यांच्या नावाला संमती द्यावी व मूळ विषय मंजूर करण्यात यावा अशी विनंती करते.

**मा.महापौर** - मूळ विषय मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.सुजाता पालांडे** -मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – २०

दिनांक - २०/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/बीआरटीएस/४०/२०१४, दि.१८/०१/२०१४.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत शहरातील नागरिकांना सार्वजनिक वाहतूक सेवा पुरविणेअंतर्गत बीआरटीएस बस सेवा चालू करणेचे नियोजन हाती घेतले आहे. यामध्ये दापोडी ते निगडी कॉरीडॉर, सांगवी ते किवळे कॉरीडॉर, नाशिक फाटा ते वाकड कॉरीडॉर, काळेवाडी फाटा ते देहू-आळंदी कॉरीडॉर व देहू आळंदी रस्ता या बीआऱटीएस कॉरीडॉरचा समावेश आहे.

सदर रस्त्याचा वापर करणा-या नागरिकांचे सुरक्षिततेच्या व बीआरटीएस बस सेवा विना अडथळा पुरविणेकामी विषयांकीत कामाची निविदा काढणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत शहरातील नागरिकांना सार्वजनिक वाहतूक सेवा पुरविणेअंतर्गत बीआरटीएस बस सेवा चालू करणेचे नियोजन हाती घेतले आहे. यामध्ये दापोडी ते निगडी कॉरीडॉर, सांगवी ते किवळे कॉरीडॉर, नाशिक फाटा ते वाकड कॉरीडॉर, काळेवाडी फाटा ते देहू-आळंदी रस्ता या बीआऱटीएस कॉरीडॉरचा समावेश आहे.

पिंपरी चिंचवड शहर ही एक औद्योगीक नगरी आहे. या शहरालगत चाकण एम.आय.डी.सी., तळेगाव एम.आय.डी.सी., हिंजवडी आय.टी.पार्क इ. यांचा विकास मोठया प्रमाणात होत आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड शहाराची लोकसंख्या झपाटयाने वाढत आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड शहर मध्यवर्ती शहर म्हणुन विकसीत होत आहे. लोकसंख्या वाढीमुळे शहरातील सर्व भागात मोठमोठे गृहप्रकल्प उभारण्यात आले आहेत व येत आहेत. शहरातुन एका भागाकडून दुस-या भागाकडे दळणवळणासाठी रस्त्यांचे नेटवर्क असणे आवश्यक आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड शहरातील विकास आराखडयानुसार रस्ता व चौकामध्ये उड्डाणपुल बांधणे आवश्यक आहे.

काळेवाडी फाटा ते देहु आळंदी रस्त्यापर्यंतचा रस्ता जे.एन.एन.यु.आर.एम अंतर्गत बी.आर.टी.एस.कॉरीडॉर म्हणुन विकसीत करण्यात येत आहे.निगडी ते भोसरी (टेल्को रस्ता) हा जुना मुंबई पुणे रस्ता व काळेवाडी फाटा ते देहु आळंदी रस्ता हे दोन्ही बी.आर.टी.एस.कॉरीडॉर मधील मुख्य रस्ते के.एस.बी.चौकात एकमेकांना छेदतात. तसेच या चौकात चिंचवड स्टेशन कडून एम.डी.आर. ३१ हा देखील एक रस्ता येऊन मिळतो. अशा त-हेने या चौकात एकुण ५ रस्ते मिळतात. सदरचा चौक हा पिंपरी चिंचवड शहरातील औद्योगीक क्षेत्रातील महत्वाचा चौक आहे. या चौकातुन टाटा मोटर्स, मर्सिडीज बेंज, मोशी येथील आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्र तसेच एम.आय.डी.सी.चा रहीवासी जी ब्लॉक चा परीसर, पुणे नाशीक महामार्ग इ. भागाकडील दळणवळणासाठी उपयोग होत आहे. तसेच भविष्यात प्राधीकरण सेक्टर क्र ४ ते १६ मधील

दळणवळण/रहदारी वाढणार आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने २००८ मध्ये शहारातील वाहतुकीचे सर्वेक्षण करून CMP (Comprehensive Mobility Plan) मे क्रिसील या नामांकीत संस्थेकडून तयार करून घेतला आहे. सदर अहवालामध्ये के.एस.बी. चौक येथील वाहतुकीची तिव्रता पाहता त्या ठिकाणी उड्डाणपुल करणेबाबत शिफारस केली आहे. काळेवाडी फाटा ते देहु आळंदी रस्ता या बी.आर.टी.एस.कॉरीडॉर चा मुळ आराखडा मे.सी.व्ही.कांड कन्सलटंट प्रा.लि. या सल्लागारांनी तयार केला आहे.

सदर आराखड्यामध्ये के.एस.बी. चौक येथील उड्डाणपूलाची शिफारस केलेली आहे.JnNURM अंतर्गत प्रकल्पाच्या मान्यतेचे वेळी D.P.R. Cost ची मर्यादा असल्याने त्यांनी सदर बी.आर.टी.एस.कॉरीडॉर च्या रस्त्याचे कामातुन पुलाचे काम वगळलेले होते. त्यानुसार के.एस.बी. येथील चौकात उड्डाण पुल बांधणेचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खाते यांचेकडील सन १२-१३च्या दरसुची नुसार तयार केले असून सदर कामाची अंदाजपत्रकीय र.रू.९८,४२,००,०००/- (अक्षरी र.रू अठ्ठ्यान्नव कोटी बेचाळीस लाख फक्त) इतकी आहे.

काळेवाडी फाटा ते देहु आळंदी या बीआरटीएस कॉरीडॉरवर डिसेंबर २०१४ मध्ये बीआरटीएस बससेवा सुरू करणेचे मनपाचे नियोजन असून निविदा प्रसिध्द करणे व प्रत्यक्ष पूलाचे काम करणे यासाठी लागणारा कालावधी याचा विचार करता सदरच्या विषयास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १ के अंतर्गत मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.नारायण बहिरवाडे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - के.एस.बी. चौकात उड्डानपुल बांधणेच्या कामास सदर कामाची अंदाजपत्रकीय र.रू.९८,४२,००,०००/- (अक्षरी र.रू अठ्ठ्यान्नव कोटी बेचाळीस लाख फक्त) चे खर्चाऐवजी भविष्यकालिन गरज लक्षात घेऊन प्रशासकीय मान्यतेच्या रकमेमध्ये र.रु.१७० कोटीचे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

**मा.भारती फरांदे** – मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक – ४६८ | विषय क्रमांक – २० |
| दिनांक - २०/०१/२०१४ | विभाग - मा.आयुक्त |

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/बीआरटीएस/४०/२०१४, दि.१८/०१/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत शहरातील नागरिकांना सार्वजनिक वाहतूक सेवा पुरविणेअंतर्गत बीआरटीएस बस सेवा चालू करणेचे नियोजन हाती घेतले आहे. यामध्ये दापोडी

ते निगडी कॉरीडॉर, सांगवी ते किवळे कॉरीडॉर, नाशिक फाटा ते वाकड कॉरीडॉर, काळेवाडी फाटा ते देहू-आळंदी कॉरीडॉर व देहू आळंदी रस्ता या बीआऱटीएस कॉरीडॉरचा समावेश आहे.

सदर रस्त्याचा वापर करणा-या नागरिकांचे सुरक्षिततेच्या व बीआरटीएस बस सेवा विना अडथळा पुरविणेकामी विषयांकीत कामाची निविदा काढणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत शहरातील नागरिकांना सार्वजनिक वाहतूक सेवा पुरविणेअंतर्गत बीआरटीएस बस सेवा चालू करणेचे नियोजन हाती घेतले आहे. यामध्ये दापोडी ते निगडी कॉरीडॉर, सांगवी ते किवळे कॉरीडॉर, नाशिक फाटा ते वाकड कॉरीडॉर, काळेवाडी फाटा ते देहू-आळंदी रस्ता या बीआऱटीएस कॉरीडॉरचा समावेश आहे.

पिंपरी चिंचवड शहर ही एक औद्योगीक नगरी आहे. या शहरालगत चाकण एम.आय.डी.सी., तळेगाव एम.आय.डी.सी., हिंजवडी आय.टी.पार्क इ. यांचा विकास मोठया प्रमाणात होत आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड शहाराची लोकसंख्या झपाटयाने वाढत आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड शहर मध्यवर्ती शहर म्हणुन विकसीत होत आहे. लोकसंख्या वाढीमुळे शहरातील सर्व भागात मोठमोठे गृहप्रकल्प उभारण्यात आले आहेत व येत आहेत. शहरातुन एका भागाकडून दुस-या भागाकडे दळणवळणासाठी रस्त्यांचे नेटवर्क असणे आवश्यक आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड शहरातील विकास आराखडयानुसार रस्ता व चौकामध्ये उड्डाणपुल बांधणे आवश्यक आहे.

काळेवाडी फाटा ते देहु आळंदी रस्त्यापर्यंतचा रस्ता जे.एन.एन.यु.आर.एम अंतर्गत बी.आर.टी.एस.कॉरीडॉर म्हणुन विकसीत करण्यात येत आहे.निगडी ते भोसरी (टेल्को रस्ता) हा जुना मुंबई पुणे रस्ता व काळेवाडी फाटा ते देहु आळंदी रस्ता हे दोन्ही बी.आर.टी.एस.कॉरीडॉर मधील मुख्य रस्ते के.एस.बी.चौकात एकमेकांना छेदतात. तसेच या चौकात चिंचवड स्टेशन कडून एम.डी.आर. ३१ हा देखील एक रस्ता येऊन मिळतो. अशा त-हेने या चौकात एकुण ५ रस्ते मिळतात. सदरचा चौक हा पिंपरी चिंचवड शहरातील औद्योगीक क्षेत्रातील महत्वाचा चौक आहे. या चौकातुन टाटा मोटर्स, मर्सिडीज बेंज, मोशी येथील आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्र तसेच एम.आय.डी.सी.चा रहीवासी जी ब्लॉक चा परीसर, पुणे नाशीक महामार्ग इ. भागाकडील दळणवळणासाठी उपयोग होत आहे. तसेच भविष्यात प्राधीकरण सेक्टर क्र ४ ते १६ मधील दळणवळण/रहदारी वाढणार आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने २००८ मध्ये शहारातील वाहतुकीचे सर्वेक्षण करून CMP (Comprehensive Mobility Plan) मे क्रिसील या नामांकीत संस्थेकडून तयार करून घेतला आहे. सदर अहवालामध्ये के.एस.बी. चौक येथील वाहतुकीची तिव्रता पाहता त्या ठिकाणी उड्डाणपुल करणेबाबत शिफारस केली आहे. काळेवाडी फाटा ते देहु आळंदी रस्ता या बी.आर.टी.एस.कॉरीडॉर चा मुळ आराखडा मे.सी.व्ही.कांड कन्सलटंट प्रा.लि. या सल्लागारांनी तयार केला आहे.

सदर आराखड्यामध्ये के.एस.बी. चौक येथील उड्डाणपूलाची शिफारस केलेली आहे.JnNURM अंतर्गत प्रकल्पाच्या मान्यतेचे वेळी D.P.R. Cost ची मर्यादा असल्याने त्यांनी सदर बी.आर.टी.एस.कॉरीडॉर च्या रस्त्याचे कामातुन पुलाचे काम वगळलेले होते. त्यानुसार के.एस.बी. येथील चौकात उड्डाण पुल बांधणेचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खाते यांचेकडील सन १२-१३च्या दरसुची नुसार तयार केले असून सदर कामाची अंदाजपत्रकीय र.रू.९८,४२,००,०००/- (अक्षरी र.रू अठ्ठ्यान्नव कोटी बेचाळीस लाख फक्त) इतकी आहे.

काळेवाडी फाटा ते देहु आळंदी या बीआरटीएस कॉरीडॉरवर डिसेंबर २०१४ मध्ये बीआरटीएस बससेवा सुरू करणेचे मनपाचे नियोजन असून निविदा प्रसिध्द करणे व प्रत्यक्ष पूलाचे काम करणे यासाठी लागणारा कालावधी याचा विचार करता सदरच्या विषयास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १ के अंतर्गत मान्यता घेणे आवश्यक आहे.

के.एस.बी. चौकात उड्डानपुल बांधणेच्या कामास सदर कामाची अंदाजपत्रकीय र.रू.९८,४२,००,०००/- (अक्षरी र.रू अठ्ठ्यान्नव कोटी बेचाळीस लाख फक्त) चे खर्चाऐवजी भविष्यकालिन गरज लक्षात घेऊन प्रशासकीय मान्यतेच्या रकमेमध्ये र.रु.१७० कोटीचे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.सुजाता पालांडे** -मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २१ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ४६९ विषय क्रमांक – २१
दिनांक - २०/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/बीआरटीएस/४१/२०१४, दि.१८/०१/२०१४

पिंपरी चिंचवड शहर ही एक औद्योगिक नगरी आहे. या शहरालगत चाकण एम.आय.डी.सी., तळेगाव एम.आय.डी.सी., हिंजवडी आय.टी. पार्क इ. यांचा विकास मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. पिंपरी चिंचवड शहर मध्यवर्ती शहर म्हणून विकसित होत आहे. लोकसंख्या वाढीमुळे शहरातील सर्व भागात मोठमोठे गृहप्रकल्प उभारण्यात आले आहेत व येत आहेत. शहरातून एका भागातून दुस-या भागाकडे दळणवळणासाठी रस्त्यांचे नेटवर्क असणे आवश्यक आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड शहरातील विकास आराखड्यानुसार रस्ता विकसित करणे आवश्यक आहे.

पिंपरी चिंचवड शहरातून मुंबई पुणे एक्सप्रेस वे कडे रावेत/किवळे भागातून जावे लागते. रावेत/किवळे येथील नियोजित मुकाई चौक ते भक्ति शक्ति चौक यांना जोडणारा विकास आराखड्यातील ४५ मी. रूंदीचा रस्ता मुख्य रस्ता आहे. सदर रस्त्याच्या पिंपरी चिंचवड भोसरी एम.आय.डी.सी., चाकण एम.आय.डी.सी., हिंजवडी आय.टी. पार्क, नाशिक महामार्ग, प्राधिकरण से.क्र. ४ ते १६ व से.क्र.१८ ते २१, चिखली – कुदळवाडी इ. भागातील दळणवळणासाठी उपयोग होणार आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सन २००८ मध्ये वाहतूकीचे सर्वेक्षण करून CMP (Comprehensive Mobility Plan) मे.क्रिसील या नामांकित संस्थेकडून तयार करून घेतला आहे. सदर अहवालामध्ये विषयांकित रस्त्याच्या बी.आर.टी. कॉरीडॉर मध्ये समावेश केलेला आहे. त्यामुळे रावेत/किवळे येथील मुकाई चौकापासून भक्ति शक्ती चौकापर्यंतचा विकास आराखड्यातील ४५ मी. रूंदीचा रस्ता विकसित करणे आवश्यक आहे.त्यापैकी भक्ति शक्ति चौक ते मुकाई चौक ४५ मी.रस्त्यावर निसर्ग दर्शन

सोसायटीजवळ रेल्वे लाईनवर उड्डाणपूल बांधणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खाते यांचेकडील सन १२ – १३ च्या दरसुचीनुसार तयार केले आहे.

सदर कामाची अंदाजपत्रकीय र.रू.७३,९१,३७,०००/- (अक्षरी र.रू. त्र्याहत्तर कोटी एक्यान्नव लाख सदोतीस हजार रूपये फक्त) इतकी आहे. सदरचे काम पूर्ण कऱणेस एकूण ३० महिन्यांचा कालावधी लागणार आहे.

भक्ति शक्ति चौक ते मुकाई चौक ४५ मी.रस्त्यावर निसर्ग दर्शन सोसायटीजवळ रेल्वे लाईनवर उड्डाणपूल बांधणेचेकामाची निविदा प्रसिध्द करणे व प्रत्यक्ष उड्डाणपूलाचे काम करणे यासाठी लागणारा कालावधी याचा विचार करता सदर कामाची अंदाजपत्रकीय र.रू.७३,९१,३७,०००/- (अक्षरी र.रू. त्र्याहत्तर कोटी एक्यान्नव लाख सदोतीस हजार रूपये फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.सविता साळुंके** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.सुजाता पालांडे** -मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – २२

दिनांक - २०/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/बीआरटीएस/२९/२०१४, दि.१५/०१/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत शहरातील नागरिकांना सार्वजनिक वाहतूक सेवा पुरविणेअंतर्गत बीआरटीएस बस सेवा चालू करणेचे नियोजन हाती घेतले आहे. यामध्ये दापोडी ते निगडी कॉरीडॉर, सांगवी ते किवळे कॉरीडॉर, नाशिक फाटा ते वाकड कॉरीडॉर, काळेवाडी फाटा ते देहू-आळंदी कॉरीडॉर व देहू आळंदी रस्ता या बीआऱटीएस कॉरीडॉरचा समावेश आहे.

सदर रस्त्याचा वापर करणा-या नागरिकांचे सुरक्षिततेच्या व बीआरटीएस बस सेवा विना अडथळा पुरविणेकामी खालील नमुद केलेल्या कामांच्या निविदा काढणे आवश्यक आहे.

**१)** मुंबई-पुणे महामार्गावर नाशिक फाटा येथे वाहतूक सिग्नल विरहीत सुरक्षित व सुरळीत राहण्याच्या दृष्टीने उड्डाणपूल बांधण्यात आला असून तो पुर्ण झालेला आहे. परंतु, पहिल्या मजल्यावरील उड्डाणपूलावरून बीआरटीएस स्टॉपकडे येण्या-जाण्यासाठी व मुंबई-पुणे ६१.०० मी. रूंद व पुणे-नाशिक ६०.०० मी. रूंद रस्ता पादचा-यांना सुरक्षित ओलांडणेसाठी FOB बांधणे आवश्यक आहे व याकामी र.रू.११.५० कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

**२)** मनपा मुख्य इमारतीसमोरील ६१.०० मी.रस्त्याचे रूंदीकरण मुंबई-पुणे महामार्ग विकसीत करताना करण्यात आलेले नाही. तरी, बीआरटीएस बस सेवा सुरू करण्यासाठी

सदर ठिकाणचे रूंदीकरण करणे अत्यावश्यक आहे व याकामी शिल्पाकृती रिटेनिंग वॉल बांधणे, बीआरटीएस अंतर्गत सायकल ट्रॅक, पादचारी मार्गाचे विकसन करणे, मनपा भवनात येणारा रस्ता विकसीत कऱणे, फायरफायटींग साठी नविन पंप रूम कऱणे इ. कामे करावी लागणार आहे व याकामी अंदाजे र.रू.४.५० कोटी इतका खर्च येणार आहे.

**३)** **व ४)** नाशिक फाटा ते वाकड काळेवाडी फाटा तेदेहू आळंदी रस्त्यावर सुरक्षिततेच्या दृष्टीने बीआरटी बस मार्गाच्या बाजूने लोखंडी रेलिंग उभारणे आवश्यक आहे. अशा प्रकारचे रेलिंग उभारणेचे काम मुंबई-पुणे व औंध-रावेत रस्त्यावर चालू आहे. त्याच धर्तीवर हे काम नाशिक फाटा वाकड व काळेवाडी फाटा ते देहू आळंदी रस्त्यावर वाहतूक सुरक्षिततेच्या दृ-ष्टीने बीआरटी मार्गासाठी करणे आवश्यक आहे व याकामी र.रू.१० कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

**५)** औंध-रावेत रस्त्यावर डांगे चौक येथे बांधण्यात आलेल्या उड्डाणपूलाच्या जोडरस्त्यात असणारे ५.०० मी. रूंदीचे दुभाजक काढून बीआरटी बस साठी मार्ग सदर जागेतून जात असल्याने तो दुरूस्त करून त्याचे डांबरीकरण कऱणे आवश्यक आहे व याकामी र.रू. ५ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

**६)** एम्पायर इस्टेट पूलाचे काम चालू आहे व सदर पूलावरून चिंचवड येथील नागरिकांना उतरण्यासाठी व चढण्यासाठी उपयोग होणार आहे व याकामी र.रू. २० कोटीइतका खर्च अपेक्षित आहे दापोडी ते निगडी व सांगवी ते किवळे या बीआरटीएस कॉरीडॉरवर मार्च-एप्रिल २०१४ मध्ये बीआरटीएस बससेवा सुरू करणेचे मनपाचे नियोजन असून निविदा प्रसिध्द करणे व प्रत्यक्ष कामे करणे यासाठी लागणारा कालावधी याचा विचार करता सदरच्या विषयास महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम १ के अंतर्गत खालीलप्रमाणे मान्यता घेणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | प्रशासकीय मान्यता (र.रू.) |
|---|---|---|
| १ | नाशिकफाटा फ्लायओव्हर येथे पादचा-यांसाठी FOB तयार करणे व इतर अनुषंगिक कामे करणे | ११,५०,००,००० |
| २ | दापोडीते निगडी या रस्त्य़ाचे मनपा मुख्य इमारतीसमोरील रस्त्याचे रूंदीकरण करणे | ४,५०,००,००० |
| ३ | नाशिकफाटा ते वाकड या रस्त्यावरबीआरटीएस साठी Dedicated Lane तयार करणे | ५,००,००,००० |
| ४ | काळेवाडीफाटा ते देहू-आळंदी या रस्त्यावर बीआरटीएस साठी Dedicated Lane तयार करणे | ५,००,००,००० |
| ५ | औंध रावेत रस्त्यावर थेरगाव डांगे चौक उड्डाणपूलाखालील रस्त्यामधील मिडीअन काढून रस्ता दुरूस्ती कऱणे | २,००,००,००० |
| ६ | एम्पायर इस्टेट उड्डाणपूलास चिंचवड बाजूकडे उतरणेस व चढणेस | २०,००,००,००० |

| | | |
|---|---|---|
| | लूप/रॅम्प बांधणे | |
| | **एकूण अंदाजपत्रकीय रक्कम** | **४८,००,००,०००** |

तरी दापोडी ते निगडी व सांगवी ते किवळे या बीआरटीएस रस्त्यांवर बीआरटी बस सेवा सुरू करणेसाठी उपरोक्त उल्लेख केलेल्या अ.नं.१ ते ६ या कामांना एकूण र.रू.४८,००,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.नारायण बहिरवाडे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो – दाखल प्रशासकीय मान्यता र.रु.६५ कोटी ऐवजी भविष्यकालिन गरज लक्षात घेऊन प्रशासकीय मान्यतेच्या रकमेमध्ये र.रु.८० कोटीचे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

**मा.भारती फरांदे** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.राजेंद्र काटे** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो – दापोडी येथे मुंबई-पुणे रस्त्यावर F.O.B. (फूट ओव्हर ब्रीज) करण्यास र.रु.दहा कोटी प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

**मा.दत्तात्रय साने** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारल्या आहेत.

**मा.महापौर** - हा विषय उपसुचनेसह मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक -४७० विषय क्रमांक – २२
दिनांक - २०/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/बीआरटीएस/२९/२०१४, दि.१५/०१/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत शहरातील नागरिकांना सार्वजनिक वाहतूक सेवा पुरविणेअंतर्गत बीआरटीएस बस सेवा चालू करणेचे नियोजन हाती घेतले आहे. यामध्ये दापोडी ते निगडी कॉरीडॉर, सांगवी ते किवळे कॉरीडॉर, नाशिक फाटा ते वाकड कॉरीडॉर, काळेवाडी फाटा ते देहू-आळंदी कॉरीडॉर व देहू आळंदी रस्ता या बीआरटीएस कॉरीडॉरचा समावेश आहे.

सदर रस्त्याचा वापर करणा-या नागरिकांचे सुरक्षिततेच्या व बीआरटीएस बस सेवा विना अडथळा पुरविणेकामी खालील नमुद केलेल्या कामांच्या निविदा काढणे आवश्यक आहे.

१) मुंबई-पुणे महामार्गावर नाशिक फाटा येथे वाहतूक सिग्नल विरहीत सुरक्षित व सुरळीत राहण्याच्या दृष्टीने उड्डाणपूल बांधण्यात आला असून तो पुर्ण झालेला आहे. परंतु, पहिल्या मजल्यावरील उड्डाणपूलावरून बीआरटीएस स्टॉपकडे येण्या-जाण्यासाठी व मुंबई-पुणे ६१.०० मी. रूंद व पुणे-नाशिक ६०.०० मी. रूंद रस्ता पादचा-यांना सुरक्षित ओलांडणेसाठी FOB बांधणे आवश्यक आहे व याकामी र.रू.११.५० कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

२) मनपा मुख्य इमारतीसमोरील ६१.०० मी.रस्त्याचे रूंदीकरण मुंबई-पुणे महामार्ग विकसीत करताना करण्यात आलेले नाही. तरी, बीआरटीएस बस सेवा सुरू करण्यासाठी सदर ठिकाणचे रूंदीकरण करणे अत्यावश्यक आहे व याकामी शिल्पाकृती रिटेनिंग वॉल बांधणे, बीआरटीएस अंतर्गत सायकल ट्रॅक, पादचारी मार्गाचे विकसन करणे, मनपा भवनात येणारा रस्ता विकसीत कऱणे, फायरफायटींग साठी नविन पंप रूम कऱणे इ. कामे करावी लागणार आहे व याकामी अंदाजे र.रू.४.५० कोटी इतका खर्च येणार आहे.

३) **व ४)** नाशिक फाटा ते वाकड काळेवाडी फाटा तेदेहू आळंदी रस्त्यावर सुरक्षिततेच्या दृष्टीने बीआरटी बस मार्गाच्या बाजूने लोखंडी रेलिंग उभारणे आवश्यक आहे. अशा प्रकारचे रेलिंग उभारणेचे काम मुंबई-पुणे व औंध-रावेत रस्त्यावर चालू आहे. त्याच धर्तीवर हे काम नाशिक फाटा वाकड व काळेवाडी फाटा ते देहू आळंदी रस्त्यावर वाहतूक सुरक्षिततेच्या दृ-ष्टीने बीआरटी मार्गासाठी करणे आवश्यक आहे व याकामी र.रू.१० कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

**५)** औंध-रावेत रस्त्यावर डांगे चौक येथे बांधण्यात आलेल्या उड्डाणपूलाच्या जोडरस्त्यात असणारे ५.०० मी. रूंदीचे दुभाजक काढून बीआरटी बस साठी मार्ग सदर जागेतून जात असल्याने तो दुरूस्त करून त्याचे डांबरीकरण कऱणे आवश्यक आहे व याकामी र.रू. ५ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

**६)** एम्पायर इस्टेट पूलाचे काम चालू आहे व सदर पूलावरून चिंचवड येथील नागरिकांना उतरण्यासाठी व चढण्यासाठी उपयोग होणार आहे व याकामी र.रू. २० कोटीइतका खर्च अपेक्षित आहे. दापोडी ते निगडी व सांगवी ते किवळे या बीआरटीएस कॉरीडॉरवर मार्च-एप्रिल २०१४ मध्ये बीआरटीएस बससेवा सुरू करणेचे मनपाचे नियोजन असून निविदा प्रसिध्द करणे व प्रत्यक्ष कामे करणे यासाठी लागणारा कालावधी याचा विचार करता सदरच्या विषयास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १ के अंतर्गत खालीलप्रमाणे मान्यता घेणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | प्रशासकीय मान्यता (र.रू.) |
|---|---|---|
| १ | नाशिकफाटा फ्लायओव्हर येथे पादचा-यांसाठी FOB तयार करणे व इतर अनुषंगिक कामे करणे | ११,५०,००,००० |
| २ | दापोडीते निगडी या रस्त्य़ाचे मनपा मुख्य इमारतीसमोरील रस्त्याचे रूंदीकरण करणे | ४,५०,००,००० |
| ३ | नाशिकफाटा ते वाकड या रस्त्यावरबीआरटीएस साठी Dedicated Lane तयार | ५,००,००,००० |

| | | |
|---|---|---|
| | करणे | |
| ४ | काळेवाडीफाटा ते देहू-आळंदी या रस्त्यावर बीआरटीएस साठी Dedicated Lane तयार करणे | ५,००,००,००० |
| ५ | औंध रावेत रस्त्यावर थेरगाव डांगे चौक उड्डाणपूलाखालील रस्त्यामधील मिडीअन काढून रस्ता दुरूस्ती करणे | २,००,००,००० |
| ६ | एम्पायर इस्टेट उड्डाणपूलास चिंचवड बाजूकडे उतरणेस व चढणेस लूप/रॅम्प बांधणे | २०,००,००,००० |
| | **एकूण अंदाजपत्रकीय रक्कम** | **४८००००००** |

तरी दापोडी ते निगडी व सांगवी ते किवळे या बीआरटीएस रस्त्यांवर बीआरटी बस सेवा सुरू करणेसाठी उपरोक्त उल्लेख केलेल्या अ.नं.१ ते ६ या कामांना एकूण र.रू.४८,००,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच दाखल प्रशासकीय मान्यता र.रु.६५ कोटी ऐवजी भविष्यकालिन गरज लक्षात घेऊन प्रशासकीय मान्यतेच्या रकमेमध्ये र.रु.८० कोटीचे खर्चास तसेच दापोडी येथे मुंबई-पुणे रस्त्यावर F.O.B. (फूट ओव्हर ब्रीज) करण्यास र.रु.दहा कोटी प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.सुजाता पालांडे** -मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ४७१ विषय क्रमांक – २३

दिनांक - २०/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/बीआरटीएस/४६/२०१४, दि.२०/०१/२०१४

औंध-रावेत या १४.५० कि.मी. लांबीच्या बी.आर.टी.एस. मार्गाचा विकास करणेचे काम जे.एन.एन.यु.आर.एम. प्रकल्पाअंतर्गत प्रगतीत आहे. औंध-पुणे येथून या रस्त्याने सांगवी फाटा मार्गे सांगवी गावठाण, नवी सांगवी, पिंपळे गुरव या ठिकाणी जाणेकरीता स्थानिक नागरीक तसेच स्कूल बस, पी.एम.पी.एल. बसेस, खाजगी बसेस, व अवजड वाहनांची वाहतूक असते. हिंजवडी एम.आय.डी.सी. व पश्चिम बाह्यवळण मार्ग वाकड येथून सांगवी, पिंपळे गुरव या ठिकाणी जाणारी वाहने औंध-रावेत रस्त्याचा वापर करुन सांगवी फाटा येथून जातात. औंध-रावेत या बी.आर.टी.एस. मार्गाची वाहतूक अखंडीत व सुरक्षित होणेसाठी या रस्त्यावरील सांगवी फाटा या ठिकाणी ग्रेड सेपरेटर व फ्लाय ओव्हर बांधणेची आवश्यकता लक्षात घेऊन सन २०१३-१४ च्या मंजूर अर्थसंकल्पात रक्कम रुपये ५,००,००,०००/- ची तरतुद करणेत आलेली आहे.

औंध-रावेत रस्त्याचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.एस.एन.भोबे अॅन्ड असोसिएट्स यांनी सांगवी फाटा येथे ग्रेड सेपरेटर व फ्लाय ओव्हर बांधणेचे प्राथमिक स्वरूपाचे आराखडे, नकाशे तयार करुन ढोबळ अंदाजपत्रक तयार केले आहे.मा.आयुक्त, पिं.चिं मनपा, मा.महापौर,

मा.स्थायी समिती अध्यक्ष व सर्व मा.पदाधिकारी पि.चिं.मनपा यांना विषयांकित प्रकल्पाचे सादरीकरण दि.२५।०७।२०१३ व दि.१०।०१।२०१४ रोजी करण्यात आले आहे. सदर सादरीकरणात मा.पदाधिकारी यांनी सुचविलेल्या सुचनांचा समावेश करून नव्याने अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकामध्ये मुख्यत: खालील कामांचे नियोजन केले आहे.

| अ. क्र | कामाचे वर्णन | लांबी (मी.) | रूंदी (मी.) | उंची (मी.) | खर्च र.रू. (कोटी) |
|---|---|---|---|---|---|
| १ | सांगवी फाटा येथे अंडरपास बांधणे | ५६४.०० | ८.४० | ५.५० | १८.०४ |
| २ | सांगवी फाटा येथे प्लायओव्हर बांधणे | ४९२.०० | ७.५० | ५.५० | १६.५९ |
| ३ | सांगवी फाटा येथे सबवे बांधणे | ३४५.०० | १५.७० | ५.५० | ५.५० |
| ४ | सांगवी फाटा येथे पादचारी भुयारी मार्ग बांधणे<br>अ) CQA जवळ<br>ब) औंध हॉस्पिटल जवळ | <br>२४.००<br>३७.०० | <br>६.००<br>६.०० | <br>३.००<br>३.०० | <br>३.९४ |
| ५ | औंध रोड डेव्हलोपमेंट वर्क्स (डांबरीकरण)<br>अ) CQA जवळ<br>ब) औंध हॉस्पिटल जवळ | <br>३७०.००<br>५४०.०० | <br>७.५०<br>१५.०० | - | <br><br>१.२५ |
| ६ | स्वागत/दिशादर्शक कमान (Gantry) सुशोभिकरण इ. | - | - | - | २.२० |
| ७ | विद्युतीकरण | | | | १.५० |
| ८ | औंध हॉस्पीटल जवळ रस्त्यामध्ये असणारे बांधकाम काढणे व नव्याने बांधणे | | | | १.९६ |
| ९ | औंध हॉस्पीटल जवळ सिमाभिंत काढणे व नव्याने बांधणे | | | | ०.१८ |
| | एकूण | | | | ५१.१६ |
| | आकस्मित निधी ५% | | | | २.५६ |
| | | | | | ५३.७२ |
| | आस्थापना खर्च २% | | | | १.०७ |
| | अंदाजपत्रकीय रक्कम | | | | ५४.७९ |

या कामाचा सा.बां.दरसूची सन २०१२-१३ नुसार अंदाजपत्रकीय खर्च र.रू.५४.७९ कोटी एवढा येत आहे.

औंध रावेत या ४५ मी.बीआरटीएस मार्गापासून सांगवी गावाकडे जाणा-या रस्त्याची रूंदी १८ मी. आहे. सदर रस्त्यास लागून औंध हॉस्पिटलच्या अखत्यारितील सुमारे ३०० मी. लांब व १५.१० मी. रूंद असा एकूण ४५३० चौ.मी. जागा मनपास ताब्यात घ्यावी लागेल त्यासाठी शासनाच्या धोरणानुसार जागेचा व असणारे बांधकाम यांचा योग्य तो मोबदला अदा

करावा लागणार आहे. सदर कामास वर्क ऑर्डर दिल्यानंतर काम पुर्ण होण्यास ३० महिन्यांचा कालावधी लागणार असल्याने सन २०१४-१५, सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात तरतूद कऱण्यात येईल.

सांगवी फाटा येथे ग्रेड सेपरेटर व फ्लाय ओव्हर बांधणेचेकामाची निविदा प्रसिध्द करणे व प्रत्यक्ष उड्डाणपूलाचे काम करणे यासाठी लागणारा कालावधी याचा विचार करता सदरच्या विषयास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १ के अंतर्गत मान्यता घेणे आवश्यक आहे.

सदर कामाची अंदाजपत्रकीय र.रू.५४,७९,००,०००/- (अक्षरी र.रू.चोपन्न कोटी एकोणऐंशी लाख रूपये फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.सविता साळुंके** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** - हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.महापौर** – ही सभा संपल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक – नस/४/कावि/४००/१४
दिनांक – ०७/०५/२०१४

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.